

मासिक वार्तापत्र • अंक 10 • जानेवारी 2019 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

प्रवासी कामगारांवर हल्ले आणि प्रांतवाद 3

तुमच्या समाजाचा ऱ्हास 10

रिझर्व बँक व सरकार : आपापसातील तणावाचे कारण काय? 12

# पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची हार

## ही निश्चिंत होण्याची नाही, तर फॅसिझमच्या विरोधातील लढाईला अजून व्यापक आणि धारदार बनवण्याची वेळ आहे!

संपादक मंडळ

भाजप आणि त्याच्या विकाऊ मीडियाचा जोरदार प्रचार, नरेंद्र मोदीच्या अडीच डझन रॅली आणि हजारो कोटींचा निवडणूक खर्च करूनही पाच विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपला पराजयाचे तोंड पाहावे लागले. मध्यप्रदेश, राजस्थान आणि छत्तीसगड ही तीन मोठी राज्यं त्यांच्या हातातून निघून गेली आणि तेलंगणा व मिझोरम मध्ये सुद्धा काहीच हाताला लागले नाही. सर्व हायटेक प्रचार, अमित शहाचे निवडणूक मॅनेजमेंट आणि मीडिया मॅनेजमेंट अयशस्वी झाले. **राजस्थानमध्ये बऱ्याच काळापासून सुरू असणारे धर्मवादी ध्रुवीकरण, प्रशासनाच्या नग्न समर्थनाने गाईच्या नावावर केल्या गेलेल्या अनेक हत्या आणि ठिकठिकाणी दंगली भडकवण्याचा सुद्धा उपयोग झाला नाही.** मध्यप्रदेश मध्ये सुद्धा जातीय-धार्मिक ध्रुवीकरणाचे सर्व प्रयत्न बेकार झाले. छत्तीसगडमध्ये बसपा-अजित जोगी यांच्या युतीद्वारे काँग्रेसची मत खाण्याची आशा सुद्धा फोल ठरली. **लोकांच्या बदललेल्या मनोदिशेचा अनुमान भाजप अगोदरच लावत होता आणि त्याच प्रमाणात त्यांच्या नेत्यांची वाढलेली चीडचीड स्वच्छ दिसत होती.** निवडणूक प्रचाराचा शेवटचा टप्पा येता-येता नरेंद्र मोदी स्वतः बुर्झ्वा शालिनतेच्या दिखाव्याला सोडून नीचतेचे सगळे रेकॉर्ड तोडताना नजरेस पडले. या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या विजयासोबत बुद्धिजीवी आणि तमाम प्रगतशील लोकांचा एक मोठा हिस्सा या गोष्टीमुळेच खुश आहे की भारतीय जनता पक्षाच्या रूपात धर्मवादी फॅसिझमचा पराजय झाला आहे आणि फॅसिस्ट संघटनांच्या देशामधील वाढत्या उत्पाताला लगाम लागला आहे. ते आता हे मान्य करून चालत आहेत की 2019 च्या लोकसभा निवडणुकांमध्ये भाजप केंद्राच्या सत्तेतून बाहेर जाईल आणि फॅसिझमच्या आपत्तीपासुन देशाला मुक्ती मिळेल.

**या गोष्टीमध्ये शंका नाही की भाजपला ह्या पराभवामुळे मोठे नुकसान झाले आहे आणि भाजपमधे आंतरिक कलह आणि गुद्दागुद्दी सुद्धा होईल.** मोदी आणि शहा यांच्या जोडीने ज्याप्रकारे पक्षाच्या अन्य नेत्यांना बाजूला सारले आहे त्यामुळे त्यांच्यातील आतल्या आत नाराज असलेले नेते आता बोलू लागतील. वास्तव आहे की मत गोळा करणाऱ्या नेत्याच्या रुपामध्ये मोदीच्या प्रतिमेची हवा निघून गेली आहे. परंतु ह्या देशामध्ये फॅसिस्ट शक्तींचा पराजय किंवा त्यांच्या घसरणीची सुरूवात झाली आहे असे म्हटले जाऊ शकते का? **फॅसिझम, धार्मिक उन्माद आणि मागास कट्टरवादी शक्तींच्या विरोधात लढाईमध्ये आपण थोडे तरी निश्चिंत होऊ शकतो काय?** या सर्व प्रश्नांचे ठाम उत्तर आहे —’नाही’! निवडणुकांचे परिणाम हे सुद्धा दाखवतात की **साडेचार वर्षापासून मोदी सरकारपासून असंतुष्ट जनतेला त्याच्यापासून सुटका तर पाहिजे परंतु काँग्रेसच्या जुन्या पापांना सुद्धा ते विसरलेले नाहीत.** सर्व ठिकाणी समोरा-समोरच्या लढाईमध्ये दोघांच्या मतांची टक्केवारी जवळपास सारखीच आहे.

हे योग्य आहे की जनप्रतिनिधींच्या निवडणुकांच्या आत्ताच्या भांडवली पद्धतीमध्ये निवडणूक निकाल खऱ्या जनभावनेला समोर आणत नाहीत; परंतु तरीसुद्धा एका मर्यादेपर्यंत यातून जनतेचे मत दिसून येतेच. **निवडणूक निर्णयाच्या आधारावर एवढे तर नक्कीच म्हटल्या जाऊ शकते की मतदारांच्या बहुसंख्येने भाजप युतीच्या विरोधामध्ये आपली नाराजी जाहीर केली आहे.** हे साफ आहे की लोकांनी मोदी सरकारचे पूर्ण भांडवलवादी

पान 5 वर

# बुलंदशहर मधील हिंसा, कोणाचे षडयंत्र?

## संपूर्ण समाज माथेफिरू बनवलेल्या गर्दीच्या स्वाधीन होईल, त्या अगोदर, आतातरी तरी भानावर या!

✍ *नवमीत*

अपेक्षेप्रमाणेच सर्वसाधारण निवडणुकांच्या अगोदर देशामध्ये वातावरण बिघडवण्याच्या प्रयत्नांना आता वेग आला आहे. काही काळापासूनच अयोध्येत राम मंदीर बनवण्याच्या मुद्यावरुन परत एकदा वातावरण तापवले जात होते. लव्ह-जिहाद आणि गोहत्ये सारखे मुद्दे तर तेव्हापासूनच तापवले जात आहेत जेव्हापासून केंद्रात भाजपचे सरकार सत्तेत आले आहे. मध्ये-मध्ये राज्यांच्या निवडणुका झाल्या तेव्हा तर हे सर्वच मुद्दे आणखीच आग भडकावत राहिले. गोरक्षेच्या नावाखाली जमावाद्वारे हत्येच्या घटना सुद्धा सातत्याने घडत आहेत. ताजं उदाहरण हे उत्तर प्रदेश मधील बुलंदशहर येथील आहे. तेथे **योजनाबद्ध पद्धतीने गोहत्येच्या नावावर गर्दीला भडकवण्यात आले आणि मग हिंसा, जाळपोळ आणि उच्छाद माजविला गेला. गर्दीला नियंत्रित करण्यासाठी ड्युटीवर असलेल्या एका पोलिस अधिकाऱ्याची जमावाद्वारे हत्या केली गेली. सोबतच नेहमी प्रमाणेच सोशल मिडीयावर सुद्धा नाना प्रकारच्या अफवा पसरवून परिस्थितीला आणखी चिघळवण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केला जात राहिला.** हिंसेमध्ये सुमित नावाचा एक तरूणही मारला गेला. नंतर फोटो आणि व्हिडीयोतून हे उघड झाले की तो सुद्धा दंगल घडविणाऱ्यांमध्ये सामील होता. प्रत्येक निवडणुकी अगोदर अशा प्रकारच्या घटना घडणे ही सामान्य बाब झाली आहे. परंतु नेहमी प्रमाणेच इथेही काही गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत ज्यांच्याविषयी बोलणे गरजेचे आहे.

3 डिसेंबर रोजी बुलंदशहरच्या महाव गावाच्या एका शेतात गायीच्या मांसाचे तुकडे मिळाले. हे तुकडे जाणूनबुजून उसाच्या शेतात असे लटकवण्यात आले होते की ते लांबूनच नजरेस पडावेत. नंतर हे सुद्धा उघड झाले की जनावराला कमीत कमी 48 तास अगोदर मारून तिथे आणले गेले होते. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी की याच्या ठीक 3 दिवसानंतर म्हणजे 6 डिसेंबर रोजी बाबरी मशिद विध्वंसाचा स्मृतीदिवस येणार होता आणि राम मंदिराचा मुद्दा अगोदर पासूनच तापलेला होता. याच दिवशी घटनास्थळापासून 50 किलोमीटर लांब मुस्लिमांचा धार्मिक समागम, इज्तेमा, सुरू होता ज्यात लाखो मुसलमान सहभागी झाले होते. अफवा अशी सुद्धा पसरवण्यात आली होती की गोहत्येच्या घटनेला इज्तिमामध्ये सहभागी असलेल्या लोकांनी घडवले आहे. **सुदर्शन न्यूज नावाच्या संघी न्यूज चॅनेलचा मालक सुरेश चव्हाणकेने तर अधिकृतपणे याची खोटी बातमी सुद्धा प्रसारित केली होती ज्याचे उत्तरप्रदेश पोलिसांनी ट्वीट करून खंडन केले.** इथे आणखी एक गोष्ट पाहण्यासारखी आहे की महाव गाव हे बुलंदशहर-गढमुक्तेश्वर राज्य महामार्गावर पडते आणि इज्तिमाच्या समापनानंतर या मार्गावरून लाखो मुस्लिमांना जायचे होते. 'दैनिक जागरण' च्या बातमीनुसार महाव गावामध्ये गोवंशाचे अवशेष मिळाल्यानंतर संघ परिवाराच्या बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनी चिरगांवठी गावाच्या जवळ बुलंदशहर-गढमुक्तेश्वर राज्य महामार्गावर मांसाच्या तुकड्यांना ट्रॅक्टर-ट्रॉलीमध्ये ठेवून रास्तारोको केला होता. ज्या वेळेला रास्ता रोको केला होता त्याच्या ठीक एक तास अगोदर म्हणजे 11 वाजता इज्तिमाचं समापन झाले होते आणि याच मार्गावरून इज्तिमामध्ये सहभागी मुस्लिमांना आपल्या वाहनांवरून परतायचे होते. ***दंगलीसाठी यापेक्षा चांगलं ठिकाण आणि वेळ काय असू शकली असती?*** पोलिसांनी वेळ पाहून मुसलमानांना घटनास्थळाच्या दुसऱ्या मार्गाने पाठवून दिले होते, परंतु घटना स्थळावर दंगल उसळली. बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांच्या नेतृत्वातील जमाव आणि पोलिसांमध्ये झडप झाली ज्यामध्ये एक व्यक्ती सुमित आणि एक पोलिस अधिकारी सुबोध कुमार सिंह हे गोळी लागल्याने मृत्यूमुखी पडले. सुबोध कुमारला गोळी मारण्याच्या अगोदर अतिशय वाईट पद्धतीने मारले आणि फरफटवले सुद्धा होते.

पोलिसांनी या प्रकरणात बजरंग दलाचा कार्यकर्ता योगेश राज आणि हिंदु संघटनांच्या इतर कार्यकर्त्यांसहीत

पान 9 वर

# तुमच्या समाजाचा ऱ्हास

पान 10 वरून

आणि संयमाची आशा ठेवणे फक्त दुराशा आहे? काय त्याने आपल्या आजूबाजूला प्रतिवर्षी एक-दोन गर्भ पाडताना पाहिले नाहीत? इतक्या वर सुद्धा तो समजू शकत नाही कि जर त्या मुलीला उघड-उघड समागमाचे स्वातंत्र्य दिले नाही तर ती लपून छपून तसेच करेल? उघड-उघड करत असतांना कदाचित तिने नाती आणि जातीचा ही विचार केला असता, परंतु लपून करताना ती सर्वात जवळच्या नातेवाईका सोबत सुद्धा नातं जोडू शकते. एखाद्या जातीचा पुरुष जो तिला सोयीस्कर आहे, तो तिच्या प्रेमाच्या लायक ठरू शकतो. या गुप्त प्रणयाचा परिणाम तिला माहित आहे, तिच्यासाठी तो मृत्यू दंडापेक्षा पेक्षा कमी नाही. जर गर्भ पाडण्यात येऊ शकला नाही तर तिला सर्वात मोठी शिक्षा ही मिळेल की तिचे आई-वडील, भाऊबंद, रक्ताचे अत्यंत जवळचे नातेवाइक तिला एखाद्या अनोळखी शहरात एखाद्या जागेत सोडतील, तिथे तिला आयुष्यभर वेश्या व्यवसाय अथवा त्याच प्रकारे काम करावे लागेल. समाजाच्या दबावात तिचे भाऊबंद तिला विषही देऊ शकतात, शस्त्राने मारू शकतात. जर गुप्त संबंधांना लपविता आले तर निश्चितच एक-दोन गर्भ पाडले जाऊ शकतील. जो समाज या सर्व गोष्टींना आपल्या डोळ्यांनी पाहतो आणि त्याच्या परिणामांना सुद्धा बऱ्यापैकी समजतो, तो कसे काय इतके अशक्य नियम अभागी व्यक्ती समोर सादर करू शकतो? काय यातून त्यांची संवेदनहीनता स्पष्ट होत नाही का? प्रत्येक पिढीच्या कोट्यवधी माणसांच्या आयुष्याला या प्रकारे कलुषित, पीडित आणि कष्टदायक करून तो आपल्या नरपिशाचतेची ओळख देत नाही का? अशा समाजाप्रती आमच्या हृदयात काय सन्मान असू शकतो? काय सहानुभूती असू शकते? बाहेरून धर्माचे ढोंग, सदाचरणाचा अभिनय, ज्ञान-विज्ञानाचे नाटक केले जाते आणि आतून अतिशय जघन्य आणि किसळवाणे काम. धिक्कार असो अशा समाजाचा! सर्वनाश हो अशा समाजाचा!!

**ज्या समाजाने प्रतिभांना, कौशल्यांना जिवंतपणीच गाडून टाकणे कर्तव्य समजले आहे आणि गाढवांसमोर द्राक्ष पसरविण्यात ज्याला आनंद वाटतो अशा समाजाच्या अस्तित्वाला आपण क्षणभर सुद्धा स्विकारले नाही पाहिजे.** एक गरीब आई-वडील आहेत. त्यांचा स्वतःच्याच खाण्यापिण्याचा आणि कपड्यांचा ठिकाणा नाही. त्यांच्या घरी एक असाधारण प्रतिभावंत जन्म घेतो. बालपणापासून त्याला एका श्रीमंताच्या मुलाला खेळवावे लागते, शेळ्या-मेंढ्या चरवून पोट भरण्यास बाध्य व्हावे लागते. आई वडिलांना माहितच नाही कि मुलांना लिहायला वाचायला शिकवणे हे सुद्धा त्यांचे कर्तव्य आहे. जरी त्यांना माहीत असले तरी त्यांच्याकडे ना फी भरण्याचे पैसे, ना पुस्तक घेण्यासाठी रक्कम. मुलगा मोठा होतो, म्हातारा होतो, मरून जातो, आणि आपल्या प्रतिभेला, कौशल्याला सोबत घेऊन जातो, जिच्याद्वारे तो देशाला एक चाणक्य, एक कालिदास, आर्यभट्ट, एक रवींद्र, एक रमण देऊ शकला असता. मी खेड्यातील एका अभिनेत्याला पहिले आहे. जर तो एखाद्या अशा देशांमध्ये जन्माला आला असता जिथे पुढे जाण्याचे सर्व मार्ग खुले आहेत, तर तिथे प्रथम श्रेणीचा जगप्रसिद्ध अभिनेता असता. परंतु आज साठ वर्षाच्या अवस्थेत या अशिक्षित व्यक्तीची ती महान प्रतिभा ग्रामीण जीवनातील काही स्त्री-पुरुष जीवनांच्या जिवंत चित्रणाद्वारे आपल्याला ओळखणाऱ्या काही जणांचेच फक्त मनोरंजन करू शकते. मी असे स्वाभाविक कवी पाहिले आहेत ज्यांना अक्षराचे काहीच ज्ञान नाही. ते ज्या भाषेत बोलतात तिच्यामध्ये कोणतेही लिखित साहित्य नाही, कोणतीही गुरुपरंपरा नाही, छंद आणि अलंकाराची माहिती होण्याचे कोणतेही साधन नाही, तरीसुद्धा आपल्या भाषेत ते अतिशय भावपूर्ण, रसपूर्ण कविता करु शकतात. शिकलेली माणसं त्यांच्या कवितेला गावठी किंवा अडाणी म्हणून अनादर करतात आणि या कारणाने ते स्वतः सुद्धा तिला तसेच समजतात. कवित्वासाठी बाहेरून त्यांना न कोणती प्रेरणा मिळते ना प्रोत्साहन; केवळ अंत:करणातून व्याकूळ होत ते कधी-कधी काहीतरी गातात. मी खेड्यातील एका मुलाला ओळखतो, त्याची आई विधवा आहे. नावापुरती थोडी शेती आहे जी आई आणि मुलाच्या जीविकेचे साधन आहे. गावातील शाळेत शिकायला गेला. असाधारण बुद्धिमत्ता आणि गणितात विशेष नैपुण्य. त्याला प्राथमिक शाळेत शिष्यवृत्ती भेटली व त्याच आधारे त्यांने माध्यमिक पर्यंतचे शिक्षण घेतले. तिथेही त्याने शिष्यवृत्ती मिळवली, जी पुरेशी नव्हती. तरीसुद्धा तो कसे तरी आपले शिक्षण सुरू ठेवू शकला. मॅट्रिकमध्ये सदर विभागातून उत्तीर्ण होणाऱ्या मुलांमध्ये त्याचा क्रमांक दुसरा किंवा तिसरा होता. परंतु एक किंवा दोन विद्यार्थी जे त्याच्यापेक्षा जास्त गुण आणि क्रमांकाने पास झाले होते ती श्रीमंताची लाडावलेली पोरं होती. त्यांच्यासाठी दोन-दोन तीन-तीन शिक्षक घरी ठेवले होते. त्यांना इतर तरुणांसारखी खाण्याची-पिण्याची चिंता नव्हती. यावेळेस पुन्हा त्याला शिष्यवृत्ती मिळाली. तो महाविद्यालयात शिकू लागला. फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणित हे त्याचे विषय होते. शिष्यवृत्ती पुरेशी नव्हती. इकडे त्याची तब्येतही बिघडली. याउपरही एका खेड्याच्या ठिकाणाहून येऊन खूप गुणवंत विद्यार्थ्यांसाठी प्रसिद्ध एका महाविद्यालयामध्ये त्याने नाव दाखल केले होते. तेथे शिष्यवृत्ती कमी होती. योगायोगाने एकाच शिष्यवृत्तीसाठी तीन विद्यार्थ्यांचे मार्क सारखेच आले. शिष्यवृत्ती कोणाला मिळाली पाहिजे याचा निर्णय करतेवेळी विश्वविद्यालयाने असे दोन विषय पाहिले ज्यामध्ये एक दुसराच विद्यार्थी —जो पैसे वाल्याचा मुलगा होता व ज्याला त्या विषयात एक-दोन गुण जास्त होते—निवडला. याची कोणीही त्याची पर्वा केली नाही की त्या तरुणाच्या—जो अतिशय दारिद्र्यात जन्म घेऊन, कितीतरी अडचणींना पार करत, इथपर्यंत पोहोचला होता—प्रतिभेचे भविष्य काय होईल. मला त्या तरुणाला वर्षभरानंतर भेटण्याचा योग आला. मी पाहिले त्याचा चेहरा थायसिसच्या रोग्यासारखा झाला आहे. शरीर अतिशय अशक्त. मी कारण विचारले. तो तरुण बहाणा बनवून निघून गेला. तो निघून गेल्यानंतर दुसऱ्या मित्राने सांगितले की "त्याला या वर्षी शिष्यवृत्ती मिळाली नाही. खूप विनवण्यांनंतर फी माफ झाली. खाण्यापिण्यासाठी त्याने शिकवणी घेण्याचा प्रयत्न केला परंतु विद्यार्थी मिळाले नाहीत. एक-दोन मित्र आपल्या सोबत राहण्याचा आग्रह करत होते, परंतु त्याला तो आपल्या स्वाभिमानाविरुद्ध समजत होता." दुसऱ्या दिवशी ही माहिती सांगत मी जेव्हा त्या तरुणाला विचारले तर त्याने उत्तरादाखल म्हटले, "होय, ठीक आहे. मी शिकवणीसाठी खूप प्रयत्न केले. कॉलेजचे तास संपवून मी तासन-तास याच साठी भटकत राहिलो. परंतु पुढे काही होताना दिसत नसल्यामुळे मी आता सोडून दिले आहे." ज्यावेळी या प्रतिभावंत तरुणाच्या या उपेक्षेला पाहण्याची संधी मिळाली आणि हे सुद्धा ऐकले की तो फक्त एक वेळेस थोडीशी खिचडी खाऊन गुजराण करत आला आहे, तेव्हा खरं सांगू, माझ्या डोळ्यात रक्त उतरले. मला वाटत होते की अशा समाजाला जगू देणे पाप आहे. या पाखंडी, धुर्त, बेईमान, क्रूर आणि नृशंस समाजाला पेट्रोल टाकून जाळून टाकले पाहिजे.

**एकीकडे प्रतिभांची अशी अवहेलना आणि दुसरीकडे श्रीमंतांच्या गाढव मुलावर अर्धा डझन खाजगी शिक्षक लावून-लावून, त्यांना मारून मुटकून पुढे ढकलणे.** मी एका अशा व्यक्तीला ओळखतो ज्याच्या डोक्यात सोळा आणे शेण भरलेले होते; परंतु तो एका करोडपतीच्या घरी जन्माला होता. त्याच्यासाठी मॅट्रिक पास करणे सुद्धा दुरापास्त होते परंतु तो आज एम. ए. च नाही तर डॉक्टर आहे. त्याच्या नावाने डझनभर पुस्तकं छापलेली आहेत. दूरवरचं जग त्याला मोठा विद्वान समजते. एकदा "त्याचे" एक पुस्तक वाचून एक सज्जन म्हणाले, "मी याचे अमुक पुस्तक वाचले होते. त्याचे इंग्रजी अतिशय चांगले होते आणि या पुस्तकाची भाषा तर अतिशय रद्दी आहे." त्यांना काय माहित होते की त्या पुस्तकाचा लेखक दुसरा होता आणि या पुस्तकाचा दुसरा.

**प्रतिभांच्या गळ्यावर याप्रकारे सुरी चालताना पाहून जो समाज खिन्न होत नाही, त्या समाजाचा "ऱ्हास होवो" हे सोडून आणखी काय म्हणता येऊ शकते.**

अनुवाद - प्रवीण सोनवणे

---

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


•रुम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9145332849

• अहमदनगर - 9156323976, 9657590491

• पुणे - 9422308125


---

## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**

---


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | सोमनाथ केंजळे, सत्यनारायण |
| संपादकीय कार्यालय | : | रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 9156323976, 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |


---



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

# गुजरातमधे उत्तरप्रदेश- बिहार मधील प्रवासी कामगारांवर हल्ले आणि प्रांतवाद

✍ निखिल एकडे

***बिहारी, उत्तरप्रदेशी नागरिकांविरोधातील राजकारण महाराष्ट्रात तर शिवसेना, मनसे सारखे पक्ष सतत करत आले आहेत. पूर्वी दक्षिण भारतीयांविरोधात असलेला त्यांचा रोख आता उत्तर भारतीय नागरिकांकडे वळवल्याचे आता दिसून येते आहे. अशाच प्रकारच्या विचारांचे राजकारण देशातील इतर राज्यांमध्ये सुद्धा वाढताना दिसून येते आहे. काँग्रेसच्या मध्य प्रदेशातील नुकत्याच सत्तेवर आलेल्या सरकारने सुद्धा भूमीपुत्रांचा राग आळवला आहे. एका गुजराती मुलीवर बलात्काराच्या घटनेनंतर, सप्टेंबर महिन्यात गुजरात मध्ये बिहार-उत्तरप्रदेशातून आलेल्या कामगारांवर स्थानिकांनी हल्ले केले आणि अनेकांना गुजरात सोडणे भाग पाडले. अशाप्रकारे 'परप्रांतीयां'वरचे हल्ले भारतातील अनेक राज्यांमध्ये दिसून आले आहेत. या घटनांच्या मूळाशी जाऊन या तथाकथित 'प्रांतवादाचे' खरे कष्टकरी विरोधी राजकारण समजून घेतले पाहिजे. - संपादक***

साबरकांठा जिल्ह्यातील हिंमतनगर जवळ, 28 सप्टेंबरला, 14 महिन्याच्या मुलीवर बलात्काराच्या आरोपावरून एका प्रवासी बिहारी मजुराला अटक केल्यानंतर उत्तर गुजरात मधील बनासकाठा, साबरकाठा, पाटण, मेहसाना, अहमदाबाद, गांधीनगर जिल्ह्यांमध्ये आणि इतर औद्योगिक शहरामधे उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेशमधून आपली श्रमशक्ती विकून उदरनिर्वाह करायला, रक्त-घाम आटवत मजूरी गुलाम बनून आलेल्या प्रवासी, 'स्थलांतरित'(विस्थापित) कामगारांविरुद्ध द्वेषपूर्ण प्रचार, 'भैय्या भगाओ' अभियान, हिंसाचार सुरु झाला. काही ठिकाणी हातगाडीवर, कारखान्यामध्ये, कष्टकरी कामगारांच्या वस्त्यांमध्ये हल्ले झाले. गुजराती अस्मितेची झिंग चढलेल्या तरुण टोळ्यांनी प्रवासी कामगारांवर गुजरात सोडून जाण्यासाठी दमदाटी-गुंडगिरी सुरु केली. भीती आणि तणावपूर्ण वातावरणामुळे एका अंदाजानुसार 5-7 दिवसात 50,000-60,000 कामगार आपल्या गृहराज्यात मिळेल त्या साधनाने, बस-रेल्वे-इत्यादी मार्गांनी पळाले. सामाजिक माध्यमांवर द्वेषपूर्ण प्रचार आणि गुजरातमधील 80% रोजगार हा गुजराती लोकांनाच मिळावा, प्रवासी मजुरांमुळे गुजरात मधील युवकांना काम मिळत नाही, 'परप्रांतीय' लोकांचं ओझ आपल्या राज्याला कशाला अशा पद्धतीचा द्वेषपूर्ण आणि मिथ्या प्रचार जोरात सुरु झाला. भाजपा-कांग्रेसमधे हल्यामागे असल्याच्या कारणाने ढोंगी तू-तू मैं-मैं सुरु झाली. कांग्रेसचा आमदार आणि ठाकोर सेनेचा संस्थापक-कार्यवाहक अल्पेश ठाकोर एका पत्रकार परिषदेमध्ये म्हणाला: "जर पोलिसांनी कारवाई केली नाही तर आम्ही बदला घेऊ, परप्रांतीयांना इथे ठेवायचे की नाही हे आम्हाला ठरवावं लागेल, 'हे लोक' जिथे काम करतात ते कारखाने आम्ही बंद करु, हल्लाबोल करु." त्यामुळे तात्कालिक हिंसा भडकवण्यात अल्पेश ठाकूर आणि ठाकूर सेनेचा हात आहे हे निश्चित आहे.

आपल्याला समजून घ्यावं लागेल की कधीही अशा प्रकारची कुठलीही घटना जसं गुजरात मधील 14 महिन्याच्या निरागस मुलीवर बलात्कार, आग भडकवू शकते. खरे तर बलात्काराचा आणि व्यक्ती बिहारी असण्याचा काहीही संबंध नाही, पण या प्रसंगाचे निमित्त करून गुजराती कामगारांना बिहारी कामगारांविरोधात भडकावण्याचे राजकारण साध्य करण्यात आले. **ह्या प्रकारच्या कामगार वर्गात फुट पाडणाऱ्या आणि कामगार वर्गातील सुषुप्त क्रांतिकारी शक्तींना एकमेकांच्या विरोधात पेटवून क्षीण करणाऱ्या, भांडवल आणि श्रमातील मुख्य अंतर्विरोधाला झाकणाऱ्या, आणि कामगारांमध्ये एकमेकाविरोधातील हिंसेला जन्माला घालणाऱ्या पोषक वातावरणाची निर्मिती भाजप-आर. एस.एस.च्या गुजरात मॉडेलने आणि नेतृत्वकारी क्रांतिकारी कामगार वर्गीय शक्तीच्या अभावाने करून ठेवलेली आहे. पटेल आरक्षण आंदोलन, गौरक्षकांची झुंडशाही, दलितांवरील हिंसाचार, गुजराती अस्मिता आणि प्रांतवाद हे सर्व जनतेला त्यांच्या खऱ्या प्रश्नांपासून, योग्य संघर्षाच्या मैदानापासून दूर नेऊन एकमेकांच्या विरोधात उभे करत आहेत.**

सत्य वीर सिंह यांनी एका लेखात म्हटल्याप्रमाणे, गुजरात मधील अंदाजे 1कोटी स्थलांतरीत कामगारांपैकी 70% उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल ह्या राज्यामधील आहेत. ह्यापैकी बिहार आणि उत्तर प्रदेशमधील मजबूर कामगारांना दमदाटी आणि मारहाण करून पळवून लावणारे गुजराती मालक नव्हते, तर ते तेथील शोषित कामगार होते. खरंतर सर्वहारा वर्गातील बंधूघाती वैर वसाहतिक काळात गुलामराष्ट्र आणि मालकराष्ट्र असे समीकरण तयार करत असे. युरोपमधील लुटखोर राष्ट्रांमधील कामगार स्वतःला शासक मालकाप्रमाणे भारतासारख्या गुलाम देशातील कामगारांचे मालक समजत. तसेच समीकरण आज भांडवलशाही मध्ये अंतर्निहित असलेली क्षेत्रीय असमानता प्रांतवादाच्या रूपाने उत्पन्न करत आहे. शासक वर्गातील वेगवेगळे गट आणि पक्ष आपल्या स्वार्थासाठी अशा आगीमध्ये तेल ओतण्याचं काम करणारच. ह्याला थांबवण्यासाठी गरज आहे कामगार वर्गात व्यापक प्रचार-प्रसार करून हे स्थापित करण्याची की सर्व कामगारांचे हित एक आहे आणि सर्व कामगारांचा संघटीत शत्रू ते रक्तपिपासू दरोडेखोर आहेत जे देशभरातील तमाम कामगारांचे शोषण करत आहेत. 19व्या शतकात इंग्लंडचे शेजारील आयर्लंड या देशावर राज्य होते आणि आयरिश लोक आपला स्वातंत्र्यलढा लढत होते. या दोन्ही देशांमधील कामगारांमधील आपापसातील संघर्षाचे वर्णन करताना कामगार वर्गाचे शिक्षक कार्ल मार्क्स यांनी ह्या मुद्द्याला तत्कालीन संदर्भामध्ये समर्पकपणे समजावताना म्हटले आहे की : "इंग्लंडमधील प्रत्येक औद्योगिक आणि व्यापारी केंद्रांमध्ये ह्यावेळी असे कामगार आहेत जे आपापसात शत्रुत्व ठेऊन दोन गटांमध्ये विभागले गेलेले आहेत, इंग्रज सर्वहारा आणि आयरिश (आयर्लंडचे प्रवासी कामगार) सर्वहारा. सामान्य इंग्रज कामगार आयरिश कामगाराला असा प्रतिस्पर्धी समजतो ज्याच्यामुळे त्याचा जीवनस्तर उंचावत नाही आणि त्याचा द्वेष करतो. तो, आयरिश कामगारांच्या तुलनेत स्वतःला शासक राष्ट्राच्या सदस्याच्या रूपात बघतो आणि त्यायोगे तो स्वतःला आयर्लंडच्या विरोधात कुलीन आणि भांडवलदारांच्या हातातील एका अवजारामध्ये रूपांतरित करून टाकतो आणि आपल्यावरील शोषकांचे वर्चस्व पूर्वीपेक्षाही जास्त मजबूत बनवतो. तो आयरिश कामगारांच्या विरोधात धार्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय पूर्वग्रहाने भरलेला आहे. आयरिश व्यक्ती याचा बदला व्याजासहित फेडतो. तो मानतो की 'इंग्रज कामगार' आयर्लंडवरील इंग्लंडच्या प्रभुत्वाच्या अपराधामध्ये भागीदार आहे आणि त्याच्या हातातील एक अवजार बनलेला आहे. ह्या शत्रुत्वाला प्रेस, धर्मगुरु आणि विनोदी पत्रिका, थोडक्यात शासक वर्गाच्या हातातील तमाम साधनांच्या वापराने कृत्रिमरित्या जिवंत ठेवण्यात येते आणि तीव्र करण्यात येते. संघटित असूनही इंग्रज कामगार काहीही करण्यामध्ये अयशस्वी होण्यामागे हेच गुपित आहे. हेच गुपित आहे ज्यायोगे भांडवलदार वर्ग आपली ताकद कायम ठेवतो आणि तो वर्ग ह्याला उत्तमरित्या समजतो." - (कार्ल मार्क्स, सीगफ्रीड मेयर आणि कार्ल वोग्ट ह्यांना लिहिलेल्या पत्रामध्ये, 9 एप्रिल 1870)

**क्षेत्रीय असमानता, स्थलांतरण, प्रवासी मजूर आणि भांडवलशाही**

खरं तर भांडवलशाही व्यवस्था सतत गरीब-श्रीमंत दरी, क्षेत्रीय असमानता, शेती आणि उद्योगातील अंतर, गाव आणि शहरातील अंतर वाढवतच जाते. जास्त नफ्यासाठी उद्योग काही भागांमध्येच केंद्रीत होतात, आणि इतर भाग अविकसित राहतात. खाजगी जमिन मालकी आणि नफ्याची व्यवस्था जमिनींचे भाव काही ठिकाणी प्रचंड वाढवते. **भांडवलशाहीत शिखरांवर जी समृद्धी वाढत जाते आणि भांडवलाचा जो ढिग जमा होतो तो खालच्या कष्टकरी कामगारांच्या अतिरिक्त श्रमाच्या शोषणातूनच होतो. ह्यामुळे जोपर्यंत भांडवलशाही टिकेल तोपर्यंत गरीब-श्रीमंत दरी वाढत जाईल, क्षेत्रीय असमानता वाढत जाईल. क्षेत्रीय असमानतेमुळे शिक्षण-आरोग्य आणि मुख्यतः कामासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी, दुसऱ्या देशात, राज्यात, जिल्ह्यात, गावातून शहरात स्थलांतरण आणि एवढंच काय एकाच ठिकाणी राहणाऱ्या लोकांचा दररोजचा लांब पल्ल्याचा प्रवास सुद्धा मोठ्या प्रमाणात होत राहील.**

2001च्या जनगणनेच्या आकडेवारीकडेच नजर टाका. शेवटच्या मुक्कामाच्या (ह्यात जन्म आधारित स्थलांतरा ऐवजी मागील मुक्कामाच्या आधारावरील स्थलांतराचे आकडे ध्यानात घेतले तर) आधारावर 31.4 कोटी स्थलांतरीत लोक होते. त्यातील 26.8कोटी (85%) राज्यांतर्गत स्थलांतरीत होते, ज्यांचे राज्यातील एका भागातून दुसऱ्या भागात कुठल्याही कारणाने उदा-काम, शिक्षण, आरोग्य, लग्न होऊन (विशेषतः महिलाचे) स्थलांतरण झाले होते. 4.1कोटी (13टक्के) आंतरराज्य (एका राज्यातून दुसऱ्या राज्यात ) स्थलांतरण झाले आणि 51लाख (1.6टक्के) देशाच्या बाहेरून स्थलांतरित होऊन आलेले होते.

2011च्या सरकारी जनगणनेची आकडेवारी बघून सुद्धा हे स्पष्ट होईल की स्थलांतराचा रीघ अंतर्गत गरीब-अविकसित क्षेत्राकडून श्रीमंत-विकसित क्षेत्राकडे आहे. एका अभ्यासानुसार (कोहोर्ट माइग्रेशन मैट्रिक) 2001-2011 दरम्यान वार्षिक सरासरी आंतरराज्य श्रम स्थलांतर 50-60 लाख इतके होते. परिणामी आंतरराज्य स्थलांतरीत कामगारांची संख्या 6 कोटी आणि आंतरजिल्हा स्थलांतरीत कामगारांची संख्या 8 कोटी च्या घरात जाते. पहिल्यांदाच रेल्वे खात्याकडील माहिती वापरून केलेल्या अभ्यासात दिसून आले की 2011-2016 ह्या कालावधीत कामाशी निगडित वार्षिक आंतरराज्य स्थलांतर सरासरी जवळपास 90लाख इतके प्रचंड होते आणि स्थलांतराचे हे प्रमाण वाढत आहे. 2001 ते 2011 ह्या कालावधीत वार्षिक श्रम स्थलांतर वृद्धी दर मागील दशकाच्या तुलनेत दुप्पट झाला—हा दर 1991-2001 काळातील 2.4 टक्क्यावरुन 2001-2011 ह्या कालावधीत 4.5 टक्क्यांवर गेला. तसेच फक्त 20-29 ह्याच वयोगटातील स्थलांतरित मजूरांची संख्या दुपटीने वाढून 1.12कोटी झाली.

**जमिनींचे भाव प्रचंड वाढल्यामुळे आणि नफ्यासाठी कंपन्या एकाच भागात केंद्रित होत असल्यामुळे शहरांमधील लाखो लोकांना सुद्धा दररोज बराच प्रवास करत कामाच्या ठिकाणी जावे लागते. बहुतेक ठिकाणी कामाचे तास आठ नसतातच आणि असले तरी शेवटी प्रवासाचा वेळ मिळून 12 तास होतातच. प्रश्न अशा अतार्किक व्यवस्थेचा सुद्धा आहे जिच्यात लाखो लोकांचा बहुमोल वेळ अतिशय घाणेरड्या प्रवासात वाया जातो.**

उदाहरणा दाखल मुंबईत 70 लाख लोक रोज लोकलने प्रवास करतात, आपल्या कामावर जातात व घरी परत येतात. बहुतेक लोक 50 किलोमीटर पेक्षा जास्त प्रवास करतात. चेंगराचेंगरी होते कारण गर्दी होते. एलफिन्स्टन चेंगराचेंगरी सारख्या घटना होतात, मुंबई लोकलने होणाऱ्या दुर्घटनांमध्ये रोज जवळपास दहा लोकांचा जीव जातो. जमिनीचे भाव बिल्डर आणि धनिकांनी मिळून इतके वाढवून ठेवले आहेत की गरीब माणसाला कामाच्या ठिकाणी, ऑफिस जवळ घर घेणे शक्यच होत नाही. त्यामुळे कामगारांना कामाच्या ठिकाणापासून आणि धनकुबेरांच्या मध्यवर्ती वस्त्यांपासून दूर गलिच्छ वस्त्या, शहराबाहेर रहावं लागतं आणि दररोज कामाच्या 10-12 तासानंतर 2-4तास प्रवासात घालवावे लागतात.

ह्याच प्रकारे महाराष्ट्रात सुद्धा कामगार आंदोलना समोर स्थलांतर आणि प्रांतवाद या फार जुन्या समस्या आहेत. 1960च्या दशकाच्या मध्यात मुंबईतील शिवसेनेच्या गुंडानी दक्षिण भारतीयांवर 'बाहेरचे' असे लेबल लावून आणि ते मुंबईतील कामगारांच्या समस्यांना कारणीभूत आहेत असा ढोंगी प्रचार करुन हल्ले सुरु केले. उडपी होटेल-खानावळींना आगी लावण्यात आल्या, ऑफिस आणि कारखान्यांत दक्षिण भारतीयांना न ठेवण्याबद्दल ताकीद देण्यात आली. शिवसेनेचा खरा इतिहास तिचे वर्ग चरित्र समजल्यावरच लक्षात येतो. **मुंबईतील सूत गिरण्या बंद झाल्यामुळे 2-3लाख कामगार बेकार झाले, त्यात मुख्यतः मराठी मजूर होते. पण यात शिवसेनेने कामगारांना नाही तर मालकांना पूर्ण साथ दिली. मालकांच्या बाजूने ठिकठिकाणी संप तोडले, युनियन तोडल्या, कृष्णा देसाई सारख्या कामगार नेत्यांचे खून पाडले आणि कामगारांच्या विरोधातील एक आक्रमक शक्ती म्हणून नेहमीच काम केले.** 1991 सालापासून खाउजा च्या नवीन आर्थिक नीतिमुळे भांडवलाचा हल्ला वाढल्यानंतर शोषित-शोषक अंतर्विरोध तीव्र होऊन संघर्षाची परिस्थिति तयार होत असतांना कष्टकऱ्यांनी एकत्र येऊ नये म्हणून हीच शिवसेना हिन्दु-मुस्लिम दंगली भडकवत होती. सामान्य युवक, कामगार, बेरोजगार ह्यांच्यात विखारी हिंदुत्वाचा सघन प्रचार करुन माथी भडकावण्याचे काम करत होती आणि आजही करत आहे. डिसेंबर 1991 ते जानेवारी 1992 या काळात त्यांनी हजारो मुस्लिमांची घरे, दुकाने, हॉटेल फोडली-जाळली, कित्येकांचे खून केले. नंतरच्या काळात ह्याच विखारी हत्याराचा वापर बंगाली-बिहारी प्रवासी-स्थलांतरीत लोकांच्या विरोधात करण्यात आला. मनसेने तर यूपी-बिहार मधील स्थलांतरीत लोकांना 'घुसखोर', राज्यातील अनागोंदी आणि समस्यांना कारणीभूत म्हणून टॅक्सीवाले, हातगाडी आणि इतर अत्यंत असहाय कामगारांवर हल्ले सुरु केले. मागील अनेक वर्षात निवडणूक पूर्व राजकारणाचा भाग म्हणून हाच खेळ ते खेळत आहेत. कष्टकरी-कामगारांच्या खऱ्या प्रश्नांना दूर ठेवण्यासाठी प्रांतवादाच्या नावावर कामगारांना आपापसात लढवत आहेत. यूपी-बिहार मधून रोजीरोटी कमवायला आलेल्या कष्टकऱ्यांवर हे हल्ले करतात. **बेरोजगारीच्या प्रश्नावर सगळे कष्टकरी एकत्र येऊ नयेत आणि शोषक भांडवलदारांच्या विरोधात हल्लाबोल करु नये म्हणून ते मराठी युवकांना भडकावत आहेत. मराठी माणसाचा नारा देणारे हे लोक खरेतर प्रत्येक कष्ट करणाऱ्या माणसाच्या विरोधात काम करतात. 'परप्रांतीय कामगारांवर' हल्ले करणारे हे लोक 'परप्रांतीय मालकांना' (अंबानी, टाटा, बिर्ला सारखे) आणि विदेशी कंपन्यांना साधन संपत्तीची लूट आणि कामगारांचे आत्यंतिक शोषण करण्यात पूर्ण साथ देतात संकट काळात त्याची ढाल बनतात. ते संप, बंद आणि कामगार आंदोलनात बिल्डर-भांडवलदारांची लाठी म्हणून काम करतात.**

फक्त गुजरात आणि महाराष्ट्रच नाही तर इतर राज्यांमध्ये सुद्धा अशा प्रकारे प्रवासी मजूरांवर हल्ले होण्याचे प्रकार दिसून आले आहेत. प्रवासी मजूरांवर आसाम मधे उल्फा द्वारे, पंजाब मध्ये खलिस्तानी अतिरेकी, काश्मिर मधे मुजाहिद्दीन ह्यांनी जहरी प्रचार केल्याचा आणि हल्ले केल्याचा इतिहास आहे. भारतात कुठेही काम करण्याचा भारतीय राज्यघटनेने दिलेला कागदी अधिकार सुद्धा अशा प्रकारे फक्त कागदावरच अस्तित्वात आहे.

अशा वेळी अत्यंत असुरक्षिततेच्या वातावरणात राहणारे प्रवासी कामगार आपले साथीदार आहेत

पान 4 वर

# देशभरात गरीब वस्त्यांवर संकट

## प्रधानमंत्री आवास योजनेचे सत्य: दिल्लीतील शहाबाद डेरी येथील 300 झोपडपट्ट्यांना केलं जमीनदोस्त

*सिमरन*

2019 च्या निवडणुकांच्या पहिले, जिथे एकीकडून "मंदिर वही बनायेंगे" सारख्या धर्मवादी फॅसिस्ट नाऱ्यांचा आवाज ऐकू येत आहे, तिथेच 2014 मध्ये आलेल्या निवडून आलेल्या मोदी सरकारच्या विकास आणि "अच्छे दिना" चे सत्य आपल्या समोर आहे. **विकासाचा फुगा आता फूस्स झाल्यावर, मोदी सरकार धर्माच्या नावावर निवडणुका जिंकण्याचा आपला जुना संघी फॉर्म्युला घेऊन निवडणुकीत उतरण्याची तयारी करत आहे. ना तर मोदी सरकार बेरोजगारांना रोजगार देऊ शकले आहे, ना जनसामान्यांना महागाई पासुन सुटका आणि ना झोपडपट्ट्यांत राहणाऱ्यांना पक्की घरे. त्यामुळे आता या महत्त्वाच्या मुद्द्यांपासून लक्ष विचलित करण्यासाठी "मंदिरा" चा वापर केल्या जात आहे.** मोदी सरकारने 2014 मध्ये निवडणुकांच्या अगोदर आपल्या घोषणापत्रात झोपडपट्ट्यांच्या ऐवजी पक्की घरं देण्याची खात्री दिली होती, ती तर पूर्ण झालीच नाही, उलट 2014 नंतर दिल्ली व सोबतच देशभरातील कामगार वर्गाच्या घरांना निर्दयीपणे उखडून टाकण्यात आले आहे. नुकतेच 5 नोव्हेंबर 2018 ला दिल्लीच्या शहाबाद डेरी प्रभागात शेकडो झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांची घरं जमीनदोस्त केली गेली. तीनशेहून अधिक झोपडपट्ट्यांना काही तासातच विना नोटीस किंवा पूर्वसूचना पाडण्यात आलं. अनेक वर्षांपासून डेअरीच्या 'मुलानी कॅम्प' झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांना रस्त्यावर आणलं गेलं. केंद्र सरकार किंवा राज्य सरकार ह्या दोन्हींकडून झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्यांचा काही दुसरा बंदोबस्त केला गेलेला नाहीये. आज सुद्धा सरकारने 'मुलानी कॅम्प' मध्ये राहणाऱ्यांची कोणत्याच प्रकारची राहण्याची सोय केलेली नाही. दिल्ली सारख्या महानगरात मागच्या बऱ्याच वर्षांपासून हिवाळा सुरू झाल्यावर झोपडपट्ट्या तुटण्याच्या बातम्या ऐकायला मिळतात. आवास व भूमी अधिकार नेटवर्क (हाउसिंग अँड लँड राइट्स नेटवर्क) च्या फेब्रुवारी 2018 च्या एका रिपोर्टनुसार भारतात फक्त 2017 मध्ये राज्य व केंद्र सरकारांद्वारे 53,700 झोपडपट्ट्या काढण्यात आल्या आहेत, ज्यामुळे 2.6 लाखांहून अधिक लोक बेघर झाले आहेत. या रिपोर्टनुसार भारतात तासाला 6 घरं तोडण्यात आली आहेत. आवास व भूमी अधिकार नेटवर्क ह्यांचा स्वतःचा रिपोर्ट असे सांगतो की हे आकडे फक्त त्या घटनांपासून मिळाले आहेत ज्या संशोधनात त्यांच्या समोर आल्या आहेत. म्हणजे हे आकडे फक्त प्रातिनिधीक आहेत, झोपडपट्ट्या तोडण्याच्या कित्येक घटनांचा उल्लेखच आला नसेल. ह्या समस्येच्या गांभीर्याबद्दल प्रशासन किती उदासीन आहे याचा अंदाज ह्या गोष्टी वरूनच लागतो की झोपडपट्ट्या जमीनदोस्त करण्याच्या आधी किंवा झाल्यानंतरही झोपड्यांमध्ये राहणाऱ्यांच्या पुनर्वसनासाठी काहीच पाऊल टाकले जात नाही. **2016 च्या तुलनेत 2017 मध्ये झोपडपट्ट्या तोडण्याच्या कारवाईला अधिक जोर आला आहे आणि हे सगळं तेव्हा बघायला मिळत आहेत जेव्हा मोदी सरकार 2022 पर्यंत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सगळ्यांना घर देण्याचे खोटे स्वप्न रंगवत आहे. सगळ्यांना पक्क घर देणे तर दूरची गोष्ट, लोकांनी पै-पै गोळा करून बांधलेल्या झोपड्या पाडण्याचे काम अजून जोरात केलं जात आहे.** अनेक दशकांपासून झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांची घरं मातीत मिळवली जातात, आणि सरकार त्याला कधी अतिक्रमण हटाव तर कधी सौंदरीकरण करण्याच्या नावाखाली न्याय्य ठरवते. शहाबाद डेअरीतील मुलानी कॅम्पचे उदाहरण असो किंवा मागच्या काही वर्षात शकुर बस्ती, शास्त्री पार्क, वजीरपुर, कठपुतली कॉलनी सारख्या अन्य झोपड्या-वस्त्यांची उदाहरणे असोत. दिल्लीच्या थंडीत कामगार गरीब वर्गाच्या डोक्यावरचा आश्रय काढून त्यांना रस्त्यावर जगण्यासाठी भाग पाडले जाते. आणि सगळ्यात आश्चर्यजनक गोष्ट तर ही आहे कि कामगार गरीब वर्गाच्या घरांना शहरांचे सौंदर्यीकरण आणि झोपडीमुक्त शहर बनविण्याच्या नावावर पाडल्या जाते. 2017 मध्ये उजाडल्या गेलेल्या झोपड्यांपैकी 46 टक्के सौंदर्यीकरणाच्या नावावर जमीनदोस्त केल्या गेल्या आहेत. शहराची गती ज्यांच्या खांद्यांवर टिकून आहे, त्याच कामगार वर्गांच्या घरांना शहराच्या सौंदर्यावर डाग समजला जातो. ज्या कष्टकरी वर्गाच्या बळावर दिल्ली सारख्या महानगरातील चकाकत्या इमारती व फॅक्टऱ्यांमध्ये काम चालते, बस पासून तर मोटर गाड्यांपर्यंत, रस्त्यांची सफाई, घरांच्या सफाई पासून ते नाल्यांच्या सफाई पर्यंत, भाजीपाल्यापासून जीवनाच्या प्रत्येक आवश्यकतेची गोष्ट घरी पोहोचवण्याचे काम जो वर्ग करतो त्यांच्या घराला ही व्यवस्था एक घाण म्हणते. सुईपासून जहाज बनवण्यापर्यंत जो कामगार वर्ग राबतो त्यांच्या मुलांच्या डोक्यावरचे छप्परच सगळ्यात पहिले काढून घेतले जाते. याहून जास्त विरोधाभासाचा दुर्गंध अजून कोणत्या गोष्टीत येऊ शकतो, मग ती कॉमनवेल्थ खेळांच्या वेळी उजाडल्या गेलेल्या झोपडपट्ट्यांची गोष्ट असो की कामगार वर्गाच्या राहणाच्या परिसराला निळ्या रंगाचे टीन लावून लपवण्याचा भित्रेपणा असो.

या देशाची सरकारं, ती कोणत्याही पक्षाची असोत, त्यांनी नेहमीच कामगार वर्गाच्या पाठीत सुरा खुपसला आहे. या देशाचे संविधान सगळ्यांना समानतेचा हक्क देतो, ही गोष्ट कागदावर नक्की वाचायला मिळते. पण सत्य समोर आल्यावर, ही फक्त कागदी बोंब आहे, हे लक्षात येते आणि याचे सर्वात मोठे प्रमाण गरिबांच्या झोपड्यांवर चालवण्यात येणारे बुलडोझर आहेत. मुंबईच्या कँपाकोला सोसायटीबद्दल तुम्ही वाचले असेल. ही मुंबईमध्ये बेकायदेशीर रुपात बांधली गेलेली एक इमारत आहे जिला मुंबई महानगरपालिका 2002 पासून तोडू शकली नाहीये. या इमारतीत राहणाऱ्या लोकांनी कोर्टात जाऊन आपल्या मुलांचे भविष्य धोक्यात येईल हे सांगून अर्ज दिला आहे., ही केस अजूनही कोर्टात चालू आहे आणि या इमारतीत राहणारे लोक आज सुद्धा आपल्या घराच्या आत आरामात जीवन जगत आहेत. पण झोपड्या बेकायदेशीर असल्यावरून फक्त मुंबईच नाही तर दिल्ली, चेन्नई, कलकत्ता आणि भारतातल्या अनेक अनेक शहरांमध्ये कामगार वर्गीयांना बेघर करण्यात आले आहे. असं करताना हायकोर्टापासून सुप्रीम कोर्टापर्यंत सगळ्यांच्या आदेशांची खिल्ली उडवण्यात आली आहे. संविधानाच्या एकविसाव्या कलमानुसार घराच्या हक्काला जीवनाच्या हक्काचा (राईट टू लाइफ) एक अभिन्न भाग समजले जाते. असे असतांनाही कामगार वर्गाच्या घरांना खुलेआम तोडण्यात येत आहे. मार्च 2017 पासून सप्टेंबर 2017 पर्यंत डी.डी.ए. ने दिल्लीत किशनगड, बलजीत नगर व शास्त्री पार्क मध्ये कोणतीही पूर्वसूचना न देता झोपड्यांना अतिक्रमणाच्या नावावर तोडले. लक्षात घेण्याची बाब ही आहे की दिल्ली हायकोर्टाच्या आदेशानुसार राहण्याच्या पर्यायाशिवाय झोपडपट्ट्या तोडण्याची परवानगी नाही. पण या सगळ्या आदेशांना धाब्यावर बसवून कडक थंडीत लोकांना उघड्यावर सोडून दिले जात आहे. एवढेच नाही तर झोपड्या तोडायच्या अगोदरही झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांना त्यांचे सामान व जपून ठेवलेले पैसे गोळा करण्याचा वेळ सुद्धा दिला जात नाही. ऑक्टोबर 2017 मध्ये डी.डी.ए.ने कठपुतली कॉलनीमध्ये 2000 घरं तोडण्यासाठी निर्दयतेने पोलीस बळाचा व अश्रुधुराचा वापर केला. कित्येक दशकांपासून तिथे राहणाऱ्या लोकांची जन्मभराची कमाई बुलडोझरने मातीत मिळवली आणि आपले घर तोडण्याला विरोध करणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना अश्रुधुराच्या कांड्या व पोलिसांच्या लाठ्या भोगाव्या लागल्या. गेल्यावर्षी फ्लायओवरांच्या सौंदर्यीकरण्याच्या नावावर त्याखाली राहाणाऱ्या लोकांना सुद्धा तिथून हटविण्यात आलं.

फक्त दिल्लीच नाही तर देशाच्या बाकी शहरांमध्येसुद्धा अशीच स्थिती आहे. कलकत्त्यात ऑक्टोबर 2017 मध्ये 17 वर्षांखालील फिफा वर्ल्ड कप टूर्नामेंटच्या तयारीसाठी शहराच्या सौंदर्यीकरणाच्या नावाने पश्चिम बंगाल सरकारने 88 गरिबांच्या घरांना तोडले. यासोबतच 5,000 फेरीवाल्यांना व 18,000 रिक्षा चालकांनाही हटविण्यात आले. इतकेच नाही तर कलकत्ता पुस्तक मेळाव्यासाठी मंडप बनवण्यासाठी 1,200 कुटुंबांची घरं उजाडली गेली. रस्ते रुंद करण्यासाठी सुद्धा झोपड्यांना निर्दयपणे पाडण्यात आलं. सगळ्यात आश्चर्याची गोष्ट ही आहे कि लोकांना घर देण्याच्या नावावर बडोदा आणि इंदोर येथे तयार घरांना पाडण्यात आलं. 2017 मध्ये प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लोकांना घर देण्यासाठी जमीन सुरक्षित करण्याच्या नावावर वडोदरा मध्ये 3600 आणि इंदोर मध्ये 550 घरांना तोडण्यात आलं. ही सगळी घरं गरीब वर्गाची होती. स्वच्छ भारत मिशनच्या अंतर्गत जानेवारी व फेब्रुवारी 2017 मध्ये इंदोर मध्ये 112 अशा घरांना तोडण्यात आलं जिथे शौचालय नव्हते! चेन्नईमध्ये सप्टेंबर ते डिसेंबर 2017 मध्ये तामिळनाडु सरकारने 4684 घरांना पाणीपुरवठा नीट करण्याच्या नावाने बेघर केलं. लक्षात घेण्याची गोष्ट ही आहे की तोडण्यात आलेल्या घरांपैकी सगळी शहरी गरीब लोकांची घरं होती. पण पाण्याच्या स्त्रोतांजवळ बसलेल्या व्यावसायिक संस्थांना हात सुद्धा लावण्यात आला नाही.

या सगळ्या घटनांवरून जो प्रश्न निर्माण होतो तो हा आहे की शहरं नेमकी बनतात कशी? शहरातील झोपड्यांमध्ये राहणाऱ्या बहुसंख्य लोकांचा या शहरावर कोणताच अधिकार नाही काय? जे लोक मेहनत करून या शहराला चालवतात त्यांना राहण्यासाठी, कच्चेच असुद्या, एक घरही देणं या व्यवस्थेला शक्य नाही? झोपडपट्टी मुक्त शहर बनविण्यासाठी, झोपडपट्ट्यांमध्ये राहणाऱ्यांचे घर हिसकावून घेणे एक कृर थट्टा नाही का? प्रत्येक निवडणुकीआधी झोपडपट्टीवाल्यांच्या त्याच वस्त्यांमध्ये जाऊन मत मागणाऱ्या नेत्यांना, निवडणुका जिंकल्यानंतर मात्र त्या वस्त्या शहरावर एक कलंक वाटू लागतात. अतिक्रमणाच्या नावाने 40 ते 50 वर्षांपासून एकाच झोपडवस्तीत राहिलेल्या लोकांना, ज्यांच्याकडे तिथले मतदान कार्ड, वीज बिलापासून सर्व आहे, त्यांना अचानक त्या घरांमधुन काढून टाकण्यात येतं, याहून मोठा अन्याय काय असु शकतो? जर खरंच सरकारला झोपडपट्टीवाल्यांची काळजी असती तर त्यांना रस्त्यावर आणण्याऐवजी, त्यांना पक्क घर देऊन त्यांचा राहण्याचा बंदोबस्त केला असता. पण पब्लिक लँड, म्हणजेच सार्वजनिक जमिनीला अतिक्रमण मुक्त करून आणि नंतर मोठ-मोठ्या बिल्डरांच्या उंच इमारती व मॉल बनविण्यासाठी विकण्यात कोणतीच लाज न बाळगणाऱ्या सरकारला कामगार वर्गाची काय फिकीर? खरं तर ज्या भांडवली व्यवस्थेत आपण आज जगत आहोत, त्यात कामगार वर्गाचे शोषण फक्त त्यांच्या कामाच्याच ठिकाणी होतं असं नाही, तर कारखान्यांमधून, फॅक्ट्र्यांमधून निघून ज्या फाटक्या झोपड्यांमध्ये राहणं त्यांना भाग पडतं, तिथे सतत त्यांच्या मानवीय प्रतिष्ठेवर आघात केला जातो. ह्या व्यवस्थेत कामगारांची व कष्टकरी वर्गाची लूट कागदावर बेकायदेशीर असुनही ती ठीक मानली जाते. त्याच प्रकारे, ज्याप्रकारे त्यांच्या घरांना बेकायदेशीर किंवा अतिक्रमण ठरवून कधीही जमीनदोस्त केल्याची कारवाई योग्य समजली जाते. स्वत:ला कामगार नंबर एक म्हणवणारे प्रधानमंत्री मोदी आणि स्वत:ला आम आदमी म्हणवणाऱ्या दिल्ली सरकारचे मुख्यमंत्री ह्यांना दिल्लीच्या कामगार जनतेला हे उत्तर द्यावंच लागेल कि जेव्हा त्यांची घरं तोडण्यात आली, तेव्हा ते चुप्प का होते. मोदी सरकारच्या प्रधानमंत्री आवास योजनेचे सत्य हेच आहे. हेच कामगार वर्गाच्या जीवनाचे कटु सत्य आहे की आपल्या मेहनतीनं शहरे चालविणाऱ्या व शहराला चमकत ठेवणाऱ्या हातांची घरंच या भांडवली व्यवस्थेला, आणि तिच्या सेवेत लागलेल्या सरकारला शहराची घाण वाटतात.

**अनुवाद: अभिलाष**

# गुजरातमधे उत्तरप्रदेश- बिहार मधील प्रवासी कामगारांवर हल्ले आणि प्रांतवाद

**पान 3 वरून**

हे मराठी कामगार-बेरोजगाराला ह्या निवडणुक़बाज गुंड शक्तींना ठणकावून सांगावे लागेल, हल्ले रोखण्यासाठी रस्त्यावर यावे लागेल, लोकशाही नागरी हक्क विरोधी शक्ती म्हणून ठाकोरसेना, शिवसेना-मनसे आणि ह्यांच्या सारख्या इतर शक्तींविरोधात बंदीची मागणी करावी लागेल.

### 'परप्रांतीय' विरोधातील राजकारणाची खरी पार्श्वभूमी

जगात 1960-1970च्या भांडवली संकटा नंतर नवउदारवादी जागतिकीकरणाचं धोरण सुरु झाले. भांडवलशाही आतापर्यंत संकटातून बाहेर येऊ शकलेली नाही. उदारीकरणाच्या चार दशकात खाजगीकरण, अनियंत्रण, असमानता, साधन संपत्तीची आणि श्रमाची खुली लूट मोठ्या प्रमाणात वाढली आहे. दीर्घ काळापासून भांडवलशाही स्थायी मंदीत आहे आणि 1960 नंतर जागतिक अर्थव्यवस्थेत एकदाही तेजी आलेली नाही. भारतात 1990च्या उदारीकरणाच्या धोरणानंतर संरचनात्मक-व्यवस्थात्मक संकट अजून गडद झाले आहे. ह्या प्रक्रियेत कामाचे खाजगीकरण, अनौपचारीकीकरण, कंत्राटीकरण, प्रासंगिकीकरण, आणि कामगारांचे विस्थापन, स्थलांतर, परिघीकरण अभूतपूर्व वाढले आहे. गरीब राष्ट्रांमध्ये सुद्धा अनौपचारिक-प्रचंड मेहनतीच्या, प्रचंड असुरक्षित कामात लागलेल्या कामगारांपैकी बहुसंख्य कामगार हे तुलनेने मागासलेल्या भागातून आलेले प्रवासी मजूर आहेत. भांडवलशाही प्रवासी मजूर आणि स्थलांतरांचा दुहेरी वापर करत आहे. पहिले तर प्रवासी कामगारांची वाढीव असुरक्षितता भांडवलदारांना जास्त शोषणाची संधी वाटते आणि श्रमाच्या शोषणा व्यतिरिक्त भाषा, संस्कृती, प्रांतवादाच्या समस्यांना प्रवासी कामगारांना तोंड द्यावं लागतं. 'बाहेरील' या ओळखीच्या आधारावर भांडवलाला त्यांच्या विरोधात स्थानिक गरीब, कामगार, बेरोजगार, मध्यमवर्गात परकीयद्वेष आणि विस्थापित विरोधी मुलतत्ववाद पसरवता येतो व लोकांची बंधुघाती वैराकडे घेऊन जाणारी दिशाभूल करता येते. प्रवासी-स्थलांतरीत कामगार हे स्थानिक लोकांसाठी अशा प्रकारचे स्तोम बनते ज्यायोगे त्यांना स्वत:च्या भांडवलाकडून होणाऱ्या शोषणाबद्दल अंधत्व येते. गुजरात मधे झालेल्या कामगारांवरील हल्ल्यातून हेच आपल्या समोर येते.

प्रत्येक न्यायप्रिय व्यक्तीने ह्या दमन-अत्याच्याराच्या विरोधात उभं राहीलं पाहिजे. भांडवली निवडणुकीच्या राजकारणातील कुठल्याही निवडणुकबाज पार्टी आणि संघटनेकडून ह्या समस्येचे निवारण होणे शक्य नाही. ह्याचं उत्तर फक्त जनतेला तिच्या मूलभूत समस्यांवर संघटित करणे हेच आहे ज्यामुळे जनतेला आपापसात फूट पाडणाऱ्या-लढ़वणाऱ्या लढ्यांऐवजी, देश-धर्म-जाती-वर्ण-भाषा-लिंग-प्रांताच्या नावावर लढण्याऐवजी भांडवलशाही शोषणाच्या विरोधात मुलभूत प्रश्नावर लढता येईल.

# पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची हार

पान 1 वरून

आर्थिक धोरण, हिंदुत्ववादी फॅसिस्ट राजकारण आणि सामाजिक सांस्कृतिक धोरणांच्या विरोधात आपले मत दिले आहे. 'विकासाच्या' लांबलचक दाव्यांमधली कुठलीच गोष्ट पूर्ण होणे दुरची गोष्ट आहे, उलट **मागील साडे चार वर्षांमध्ये वर्षांमधे खाणे-पिणे, औषध-इलाज आणि शिक्षणा सारख्या मुलभूत गोष्टींमध्ये प्रचंड महागाई, मनरेगा आणि विविध कल्याणकारी योजनांच्या खर्चामध्ये प्रचंड घटीने सामान्य लोकांना प्रचंड त्रस्त केले आहे. बेरोजगारीने अगोदर कधी नाही असे विक्राळ रूप धारण केले आहे.** नोटाबंदी आणि जीएसटीचा सगळ्यात वाईट मार गरिबांवर पडला. नुकत्याच आलेल्या एका रिपोर्टनुसार नोटबंदी आणि जीएसटीमुळे देशभरात 55 लाख छोटे-मोठे रोजगार गेले. उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना आपल्या अनुभवाने ही गोष्ट माहिती होत आहे की मोदी सरकार आल्यानंतर कामगारांची काम करण्याची आणि जगण्याची परिस्थिती किती कठीण झालेली आहे. हे सुद्धा एक मान्य सत्य आहे की समाजाच्या वरच्या संपन्न हिश्श्याला लोकशाहीच्या ह्या तमाशामध्ये कमीच रस आहे आणि बहुधा तो मत द्यायला जातच नाही. सामान्य गरीब कष्टकरी व मध्यमवर्गीय लोकच मत टाकण्यासाठी जास्त उत्साह दाखवतात. पाचही राज्यांमध्ये सामान्य कष्टकरी मतदारांनी संघ परिवाराच्या धोरणांना नकार दिला आहे, यातून हाच संकेत मिळतो.

हा तर्क दिला जाऊ शकतो आणि तो निराधार सुद्धा नाही की सामान्य मतदाता कुठल्या पक्षाच्या धोरणांच्या योग्य-अयोग्यतेची पारख करुन मत देत नाही. जातिगत आणि धार्मिक आधारावर होणाऱ्या ध्रुवीकरणाच्या व्यतिरिक्त पैसे आणि ताकदीचा जोर सुद्धा यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावतो. परंतु असे असून सुद्धा हे ध्रुवीकरण भाजप युतीच्या बाजूने का झाले नाही, जेव्हा की भाजपच्या निवडणूक मॅनेजर्सनी प्रत्येक हातखंडा वापरण्यामध्ये कुठलीच कसर सोडली नव्हती? पैशाच्या ताकदी सोबतच समाजाच्या बलशाली आणि प्रभुत्वशाली स्तरांचे आणि स्थानिक प्रशासनाचे सुद्धा मोठे समर्थन त्यांच्यासोबत होते आणि ईवीएम च्या घोटाळ्याबाबत तर काही बोलण्याची गरज नाही.

जर मतदारांच्या बहुसंख्येने भाजपला नकार दिला आहे तर त्याने काँग्रेसला वास्तविक समर्थन दिले आहे का आणि ह्याने आपल्या जीवनामध्ये बदल होण्याची आशा आहे का? नाही, हा विचार करणेसुद्धा चूक होईल. खरंतर ***ही विकल्पहिनतेची निवडणूक होती.*** मतदार ह्या गोष्टीबद्दल कुठल्याही भ्रमाचा शिकार नाही. अर्धशतकापेक्षा जास्त काळातील अनुभवाने त्यांच्यासमोर हे बिलकुल साफ केले आहे की **कुठलाही भांडवली निवडणूकबाज पक्ष त्यांच्या आकांक्षावर खरा उतरू शकत नाही. काँग्रेस शासनाला सुद्धा लोक चांगल्या प्रकारे ओळखतात.** परंतु तरीसुद्धा निवडणुकीच्या काळामध्ये मतदारांचा विचार हा असतो की जेव्हा असा पर्याय समोर नाही जो त्यांच्या आकांक्षेला खरोखरच पूर्ण करेल तर का न वाईटांमधील कमी वाईटाला निवडावं? काँग्रेसची निवड याच प्रकारे कमी वाईटाची निवड म्हटल्या जाऊ शकते. असे नाही की लोकांना काँग्रेस सुधारेल यावर विश्वास आहे आणि ते त्यांच्या धोरणांचे समर्थक झाले आहेत.

या निवडणुकीमधील अपयशाने हिंदुत्ववादी फॅसिस्ट आपल्या कारवाया थांबवतील असा विचार करणे एक आत्मघाती गोड गैरसमजूत होईल. निवडणूक परिणाम आल्यानंतर सुद्धा ज्याप्रकारे उत्तर प्रदेश सरकार बुलंदशहर हिंसेच्या आरोपींना वाचवत आहे आणि संघ परिवाराच्या संघटना तिथे तणाव भडकवण्यामध्ये लागल्या आहेत त्यातून साफ आहे की यांच्याजवळ अजून कुठला दुसरा रस्ताच नाही. **येणाऱ्या काळामध्ये हे गाय, मंदिर, दहशतवाद, पाकिस्तान अशा मुद्यांवर अजून जास्त गोंधळ घालतील. युद्धोन्माद तयार करण्याचे प्रयत्न करतील. सर्व प्रकारच्या प्रयत्नानंतर मंदिराचा मुद्दा तापवण्याचा त्यांचा प्रयत्न फुस्स झालेला आहे; परंतु मंदिर बनवण्याचा अध्यादेश काढण्याच्या बहाण्याने निवडणुकांच्या आधी ते गोंधळ घालू शकतात.** दुसरी गोष्ट, लोकांना लालूच दाखवण्यासाठी आणि भरकटवण्यासाठी काही सरकारी भेट देण्याचा प्रयत्न करू शकतात. सर्व अर्थशास्त्रज्ञांच्या ताकिदीनंतर सरकार ज्या प्रकारे रिझर्व बँकेच्या सुरक्षित कोषामधून साडेतीन लाख कोटी हडपण्यास तत्पर दिसत आहे, त्यामागे हाच इरादा वाटतो. भलेही यामुळे भांडवली अर्थव्यवस्था खड्ड्यात जावो. सरकार अगोदरच भारी वित्तीय संकटाचा सामना करत आहे. परिस्थिति अशी झाली आहे की **यावर्षी जवळपास एक कोटी आयकर परतावे थांबवले गेले आहे कारण सरकारजवळ देण्यासाठी पैसा नाही. जीएसटी मुळे कर वसूली वाढण्याचे सर्व दावे फेल झालेले आहेत.** या वित्तीय वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांमध्येच वित्तीय तूट वित्तीय बजेटच्या 104% झालेली आहे. *कामगारांचे वाईट रित्या शोषण केल्यावर सुद्धा उद्योगांची हालत खराब आहे. अंबानी-अडाणी सारख्या काही घराण्यांना सोडून, ज्यांना सारे नियम बाजूला ठेवून सरकारी मदतीचा फायदा पोहोचवल्या जात आहे, बहुतेक भांडवली घराणी तोटा किंवा घसरत्या नफ्याने त्रस्त आहेत.*

2019 च्या निवडणुकांनंतर, सत्तेमधे भाजप येवो किंवा काँग्रेस युती, अर्थव्यवस्थेची स्थिती अजून वाईटच होणार आहे. दोघांचीही आर्थिक धोरणं समानच आहेत. **रोजगार, शेतकऱ्यांच्या खस्ताहाल परिस्थितीचे समाधान दोघांजवळही नाही, खाजगीकरण दोघांनाही करायचेच आहे. कामगार-विरोधी "श्रम सुधारांना" दोघांनाही अजून वाढवायचे आहे. याचे पूर्ण ओझे सामान्य कष्टकरी जनतेवर टाकल्या जाईल.** अशा परिस्थितीमध्ये जनतेमध्ये हताशा आणि असंतोष परत वाढेल. फॅसिस्ट गुंड दल आणि सरकारी यंत्रणेमध्ये बसलेल्या अपराधींच्या विरोधात काँग्रेस सरकार कडून कारवाईची अपेक्षा करणं भोळेपणाच आहे. भाजप आणि काँग्रेस तोंडदेखल्या लढाई व्यतिरिक्त एकमेकांच्या अपराधांवर काहीच कारवाई करणार नाहीत. हे विसरता कामा नये की गुजरात दंगलीनंतर मोदींना क्लिनचिट काँग्रेसच्याच काळात मिळाली होती. 'आजतक' वर प्रसारित स्टिंग ऑपरेशन मध्ये गुजरातचे अनेक नेते, ऑफिसर इत्यादींकडून आपल्या अपराधाच्या खुल्या स्वीकृती नंतर सुद्धा कोणाच्या विरोधात एफआयआर सुद्धा झाला नाही.

याचा अर्थ हा नाही की निवडणुकांमध्ये भाजपच्या हरण्याने काहीच फरक पडत नाही. नक्कीच काँग्रेस त्याच आर्थिक धोरणांना समोर रेटेल. खरतर नोटबंदी जर सोडली, तर मोदी सरकारची सगळी आर्थिक धोरणं काँग्रेसचीच आर्थिक धोरणं आहेत, फक्त त्यांना जास्त बिनधोक पद्धतीने आणि दंडुके मारून लागू करण्यात येत आहे आणि नियम-कायद्यांचा बळी देऊन काही भांडवली घराण्यांना मनमानी लुटीची सूट दिली जात आहे. परंतु फॅसिस्ट टोळी सत्तेबाहेर गेल्यानंतर त्यांच्या गुंड दलांना सत्तेचे संरक्षण कमी होईल आणि आमूलगामी बदलासाठी काम करणाऱ्या शक्तींना सुद्धा काम करण्यासाठी काही वेळ मिळेल. या सवलतीचा लाभ उठवून जर डाव्या शक्ती, परिस्थितीच्या योग्य विश्लेषणावर आधारित संघर्षाचा कार्यक्रम घेऊन जनतेमध्ये जातील, त्यांच्या जीवनाशी निगडित प्रश्नांच्या संघर्षाला अजून समोर घेऊन जातील, धर्मवाद-जातीवादाच्या विरोधात दृढतेने उभ्या राहतील, आणि फॅसिझम विरोधी रॅडिकल सामाजिक आंदोलन उभे करण्याच्या प्रयत्नात लागतील, तर नवीन सरकारच्या कारनाम्यांमुळे उत्पन्न होणाऱ्या जनअसंतोषाचा लाभ परत फॅसिस्टांना मिळण्यापासून रोखू शकतात आणि त्याला भांडवलशाही विरोधी दिशा देऊ शकतात. परंतु भाजप सत्तेबाहेर गेल्याने फॅसिझमचे संकट टळले ह्या गोड गैरसमजामधे अडकून राहिलो तर जनतेचा मोठा हिस्सा निश्चितच फॅसिस्ट शक्तींकड़े जाईल, फॅसिस्ट शक्ती अजून मजबूत होऊन पुढे येतील.

आपल्याला हे विसरता कामा नये की न्यायपालिका, आय.बी., सी.बी.आय, ई.डी आणि संपूर्ण नोकरशाही आणि मुख्यधारेच्या मीडियाच्या मोठ्या हिश्श्याचे फॅसिस्टीकरण करण्यात आलेले आहे. शिक्षण-संस्कृतीच्या संस्थानांमध्ये संघी विचारांचे लोक भरले गेले आहेत, पाठ्यक्रमात बदल करून मुलांच्या मेंदूपर्यंत विष पेरल्या जात आहे, सेनेमध्ये सुद्धा उच्च स्थानावर फॅसिस्टांप्रती एकनिष्ठ असणाऱ्या लोकांना बसवल्या जात आहे. संघी फॅसिस्ट जरी निवडणूक हरले तरी रस्त्यावर आपला रक्तरंजित खेळ सुरू ठेवतील आणि परत सरकार बनवण्यासाठी क्षेत्रीय बुर्झ्वा वर्गाच्या अतिउच्च पतित आणि संधीसाधू पक्षांसोबत युती करण्याचा प्रयत्न करत राहतील. त्यांना चांगल्या प्रकारे माहिती आहे की काँग्रेस किंवा कुठल्याही बुर्झ्वा पक्षाचे कोणतीही आघाडी जर सत्तारूढ़ झाली तर त्यांच्या समोर सुद्धा एकमात्र पर्याय असेल—नवउदारवादी विनाशकारी धोरणांना लागू करणे. या धोरणांना एक निरंकुश सत्ताच लागू करू शकते, त्यामुळे दमन आणि भ्रष्टाचाराचा रस्ता तर भाजपविरोधी बुर्झ्वा पक्षाच्या सत्तेला सुद्धा निवडावा लागेल. अशा परिस्थितीमध्ये भाजप परत धार्मिक कट्टरता, अंधराष्ट्रवाद आणि पुनरुत्थानाचे नारे देत मध्यमवर्गाच्या एका अतिशय-प्रतिक्रियावादी रोमँटिक उभाराला हवा देईल आणि त्या लहरींवर स्वार होऊन तसेच क्षेत्रीय बुर्झ्वा पक्षांना सोबत घेऊन सत्तेपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करेल. काँग्रेस जी नरम हिंदुत्वाची लाईन घेत आहे त्याचा त्याचा सुद्धा लाभ पुढच्या खेपेला भाजपलाच मिळेल.

सांगण्याचा अर्थ हा आहे की फॅसिझम-विरोधी मोर्चाचा प्रश्न कुठल्या निवडणूक मोर्चाचा प्रश्न नाही. फॅसिझम-विरोधी निर्णायक संघर्ष तर रस्त्यावरच होईल. फॅसिस्ट सत्तेमधे राहोत वा न राहोत, त्यांचा उत्पात तोपर्यंत चालू राहील जोपर्यंत भांडवली व्यवस्था अस्तित्वात राहील. रस्त्यावरील फॅसिस्ट विरोधी लढाईच्या मोर्चामध्ये कुठलाच बुर्झ्वा पक्ष सोबत येणार नाही. बंगाल आणि त्रिपुराच्या निकालानंतर सुद्धा, निवडणुक हरण्या-जिंकण्यावर सर्व आशा लावलेल्या पतित डाव्यांनी आपल्या आचरणाने सिद्ध केले आहे की इतिहासापासून कुठलीच शिकवण न घेता ते 1920 आणि 1930 च्या दशकाच्या इतिहासाला परत घडवणार आहेत, जेव्हा जर्मनी आणि इटली मध्ये यांच्या तडजोडी वृत्तीचा लाभ उठवत हिटलर आणि मुसोलिनी सत्तेपर्यंत पोहोचले होते. आज फॅसिझम विरोधी कुठल्याही झुंझार संयुक्त मोर्चामध्ये कामगार वर्गीय सर्व क्रांतिकारी संघटना आणि मंच यांच्या व्यतिरिक्त काही निम्न-बुर्झ्वा रॅडिकल संघटनाच सामील होऊ शकतात. रस्त्यावरील संघर्षामध्ये "पॉप्युलर फ्रंट" सारखी कुठलीही रणनीति कामाला येणार नाही. नक्कीच जोपर्यंत बुर्झ्वा लोकशाही आहे तोपर्यंत निवडणुकांचा भरपूर डावपेचात्मक वापर करायला हवा, परंतु निवडणुकीतील हरण्या जिंकण्याने फॅसिझमला संपवण्याचा विचार आत्मघाती मूर्खता होईल.

**खरी गोष्ट ही आहे की तृणमूल स्तरावर कामांना संघटित करावे लागेल, एक झुंझार प्रगतिशील कामगार वर्गीय सामाजिक आंदोलन उभे करावे लागेल आणि कामगार व रॅडिकल प्रगतिशील युवकांचे फॅसिस्ट-विरोधी दस्ते बनवावे लागतील. कोणाला वाटू शकेल की कामगार वर्गाच्या आंदोलन आणि क्रांतिकारी संघटनांच्या स्थितीला बघून ही एक लांब पल्ल्याची गोष्ट आहे परंतु आपल्याला ही गोष्ट कधीच विसरता कामा नये की जर परिस्थितीचे आकलन आणि त्यावर आधारित कार्यदिशा योग्य असेल तर व्यवस्थेचे संकट वाढण्यासोबत या दिशेवर अंमल करण्याचे परिणाम चमत्कारिक गतीने समोर येतात, क्रांतिकारी कामांचा तेजीने विस्तार होतो आणि व्यवस्थेच्या संकटाला एका क्रांतिकारी संकटामध्ये बदलल्या जाऊ शकते.** याच गोष्टीला संसदीय जडमानव आणि दुनियादार 'प्रगतिशील' शहामृग समजू शकत नाहीत आणि आपल्या घरांच्या दरवाजांवर बसून क्रांतिकारी मनसुब्यांचे हवाई पुलाव बनवत राहतात.

हिंदुत्ववादी फॅसिस्ट शक्तींना भारतीय भांडवलशाही आणि विश्व भांडवलशाहीच्या ज्या संकटाने खतपाणी घातलं होतं, ते संकट केवळ उपस्थितच नाहीये तर येणाऱ्या काळामध्ये अजून गंभीर होणार आहे. कित्येक अर्थशास्त्रज्ञ आणि बुर्झ्वा आर्थिक संस्था ताकीद देत आहेत की एक दशक पूर्वीच्या मंदीपेक्षा सुद्धा भीषण मंदीत जागतिक अर्थव्यवस्था फसणार आहे. अशा परिस्थितीत फॅसिस्ट शक्तींचे, देशातील शासक भांडवलदार वर्ग साखळीमध्ये बांधलेल्या शिकारी कुत्र्यासारखे न केवळ पालनपोषण करत राहील, तर आवश्यकता पडेल तेव्हा साखळी सोडण्यात सुद्धा संकोच करणार नाही. यामुळे फॅसिझमच्या संकटासोबत लढण्याची तयारी चालू ठेवावी लागेल त्यामध्ये तेजी आणावी लागेल.

कुठल्या निवडणुकीच्या हरण्या-जिंकण्याने फॅसिझम विरोधाच्या लढाईमध्ये कुठलेही निर्णायक अंतर येईल या भ्रमाला दूर करण्यासाठी हे लक्षात ठेवणे जरूरी आहे की ज्या काळामध्ये भारतामधे नवउदारवादी धोरणांचे वर्चस्व कायम झाले, तोच हिंदुत्ववादी फॅसिझमच्या प्रभाव-विस्ताराचा काळसुद्धा राहिला आहे. बाबरी मशिदीमधील राम मंदिराचे कुलूप उघडणे आणि अडवाणींची रथयात्रा, गुजरात 2002, पूर्ण देशामधे धार्मिक दंगली, तणाव आणि अल्पसंख्याक लोकसंख्येमध्ये सतत वाढणारा अलगाव आणि नंतर मोदीचे सत्तेमध्ये येणे—या पूर्ण राजकीय घटनाक्रमाला नवउदारवादी धोरणांच्या निर्णायक वर्चस्वाच्या स्थापनेच्या प्रक्रिये सोबत जोडून बघितल्या जाऊ शकते. नवउदारवादी धोरणांना लागू करण्यात आणि नरम हिंदुत्वाची लाईन लागू करण्यात काँग्रेसला सुद्धा कुठलाही संकोच राहिलेला नाही. छोटे भांडवलदार आणि भांडवली भूस्वामींच्या क्षेत्रीय पक्षांनासुद्धा या धोरणांना लागू करण्यात किंवा भाजप सोबत युती करण्यात संकोच राहिलेला नाही; परंतु या पक्षांच्या मागे ना तर कुठले तीव्र प्रतिक्रियावादी सामाजिक आंदोलन आहे ना कुठली कॅडर आधारित संरचना. त्यामुळे, जमिनी स्तरावर जाऊन धार्मिक आधारावर जनसमुदायाला दुभागण्यात, किंवा कामगारांच्या संघटित शक्तीवर किंवा त्यांच्या संघटित होण्याच्या शक्यतेवर मात करण्यात, हे पक्ष भाजप आणि संघ परिवाराएवढे प्रभावी कधीच होऊ शकत नाहीत. ते सत्तेमध्ये आले तरी नवउदारवादी धोरणे लागू करण्यात कुठलाच फरक पडणार नाही, परंतु समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत जनतेत फूट पाडण्यासाठी आणि कष्टकरी जनतेच्या एकजुटतेवर हल्ला करण्यासाठी हिंदुत्ववादी फॅसिस्ट तेव्हा सुद्धा त्याच व्यापकतेने आणि पाशवीपणे काम करत राहतील. कुठल्याही स्थितीत भाजप एखाद्या निवडणुकीच्या मैदानात हरण्याचा अर्थ फॅसिस्ट शक्तींचेच मागे हटणे आहे हे मानणे म्हणजे एक धोकादायक भ्रम असेल.

दुसरीकडे हेसुद्धा लक्षात ठेवावे लागेल की संसदीय डाव्या पक्षांनी कामगार वर्गाला अर्थवाद व संसदीय विभ्रमात अडकवून अराजकीय आणि नि:शस्त्र बनवण्यामध्ये एकदम तिच भूमिका निभावली आहे जी 1920 आणि 1930 च्या दशकामध्ये युरोपीय सामाजिक जनवादी पक्षाने निभवली होती. जर्मनीमध्ये हिटलर आणि इटलीमध्ये मुसोलिनीच्या नेतृत्वामध्ये फॅसिझमच्या सत्तेत येण्यात ह्या पक्षांची सुद्धा भुमिका होती.

पान 8 वर

# मेघालयातील कोळसा खाण अपघातात अनेक कामगारांचा मृत्यू

✍ प्रवीण एकडे

13 डिसेंबर ला मेघालयातील ईस्ट जेंतीया हिल्स येथील कोळसा खाणीत पाणी भरून खाण कोसळल्यामुळे 15 कामगार खाणीत अडकले आहेत. शोधकार्य अजूनही सुरू आहे परंतु इतक्या दिवसांनंतर आता कामगारांच्या वाचण्याची शक्यता नगण्यच आहे. या आधीही अनेक वेळा नफेखोरी मुळे अनेक ठिकाणी अशा दुर्घटना होऊन अनेक कामगारांना आपला जीव गमवावा लागला आहे. खाण कामगारांसोबत होणारे अपघात तर आता नित्याचीच बाब झाली आहे. खाणीतील विषारी वायूंमुळे श्वसनाचे आजार, त्वचेचा कर्करोग ही खूप सामान्य गोष्ट बनली आहे. किड्या मुंगीसारखा प्राण गमावणाऱ्या कामगारांसाठी मात्र या व्यवस्थेला थोडीही सहानुभूती उरलेली नाही.

आसामच्या चिरंग जिल्ह्यातून दुर्घटनाग्रस्त खाणीत काम करायला आलेला सायेब अली हा या घटनेचा एकमेव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. एनडीटीव्ही ला दिलेल्या मुलाखतीत अलीने या घटनेची आपबिती मांडली आहे. सायेब अली म्हणतो दुर्घटनेच्या काही दिवसां अगोदर पासूनच खाणीत पाणी झिरपत होतं आणि या झिरपणाऱ्या पाण्यामुळे कोळसा खूप नरम झाला होता. सर्व कामगारांना आणि खाणींच्या व्यवस्थापकालाही माहित होतं की खाण कधीही कोसळू शकते. अलीने व्यवस्थापकाला झिरपणाऱ्या पाण्याबद्दल इशारा दिला होता पण व्यवस्थापकाने लक्ष दिलं नाही. दुर्घटनेच्या दिवशी 22 कामगार कामावर होते, त्यातले 4 कामगार जमिनीवर काम करत होते तर 18 खाणीत. सायेब अली जेव्हा कोळशाच्या ओझ्यासोबत खाणींच्या बाहेर पडत होता तेव्हा अचानक पाणी वाहण्याचा जोरदार आवाज आला आणि काही कळण्याआधीच खाणीत पाणी भरलं व 17 कामगार खाणीत अडकले. अली नुसार खाणीत 17 कामगार अडकले आहेत. सरकार मात्र कामगारांची संख्या 15 सांगत आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण यंत्रणेने अडकलेल्या कामगारांना काढण्यासाठी पंप लावून पाणी काढण्याचे प्रयत्न केले, पण कमी शक्तीचे पंप असल्यामुळे पाणी कमी होत नव्हते. तेव्हा 100 अश्वशक्ती असलेल्या पंपांची त्यांनी मागणी केली, पण कोणत्याही सरकारला हे पंप तातडीने पुरवावे असे वाटले नाही. शेवटी जानेवारी महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने सरकारला फटकारले की जिवंत वा मृत कसेही या कामगारांना बाहेर काढावे.

**मेघालयातील खाणींमध्ये आसाममधून अनेक बेरोजगार तरुण कामासाठी जातात. उत्तर पूर्वेकडील राज्यांमधील प्रचंड गरिबी आणि बेरोजगारीमुळे या खाणी मृत्यूचा सापळा बनलेल्या असतानाही कामगार अतिशय धोक्यात खाणीत काम करायला तयार होतात.** सायेब अली म्हणतो की खाणीत काम करणाऱ्या सर्व कामगारांना माहीत आहे की खाणीत काम करणं खूप असुरक्षित आणि धोकादायक आहे तरीही कामगार खाणीत काम करायला तयार होतात कारण त्यांच्याकडे दुसरा पर्यायच नाही. त्यांची मिळकत एवढी पण नाही की ते कुटुंबाला सांभाळू शकतील; म्हणून जीवाला धोका असतानाही त्यांना खाणीत काम करावं लागतं.

वाचकांच्या माहितीसाठी खाणीतून कोळसा काढण्याच्या अनेक पद्धती आहेत त्यातीलच एक पद्धत आहे रॅट होल. या पद्धतीत सर्वात आधी 3-4 फूट बोगदा खोदून खाण कामगार त्यात उतरतात आणि जो पर्यंत कोळसा मिळत नाही तो पर्यंत खोदत राहतात. एकदा का कोळसा मिळाला की पूढे आडवं खोदकाम करावं लागतं आणि अशा प्रकारे कोळसा बाहेर काढतात. **बोगदा लहान असल्यामुळं मुलांना आणि शरीराचा आकार लहान असणाऱ्या तरुणांना कोळसा माफिया कामावर ठेवतात. लहान मुलांना कामावर ठेवल्या जातं कारण त्यांच्याकडून कमी पैशात जास्त काम करून घेता येतं. जास्त भांडवल न गुंतवताही जास्त नफा मिळतो म्हणून या पद्धतीचा वापर सर्व देशभरातच कोळसा खाणीत उघडपणे केला जातो.** कोळसा माफिया आणि प्रशासकीय संस्थांमधील परस्परसंबंध आणि जास्तीत जास्त नफा मिळवण्याच्या जीवघेण्या हव्यासापोटी खाण कामगारांच्या जिवासोबत खेळण्याचा डाव सर्रासपणे सुरू आहे. अवैध रित्या सुरू असलेल्या उत्खननाला नाकारणाऱ्या मेघालय सरकारला शेवटी या घटनेनंतर मान्य करावं लागलं की रॅट होल पद्धतीने ईस्ट जेंतीया हिल्स मध्ये खाणकाम सुरू आहे.

पर्यावरणविषयक कार्यकर्त्यांच्या तक्रारीनंतर 2014 साली राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने रॅट होल पद्धतीने होणाऱ्या खाणकामावर बंदी आणली होती. या पद्धतीच्या खाणकामांमुळे पाण्याचे प्रदूषण होते आणि जीवालाही धोका असतो म्हणून राष्ट्रीय हरित प्राधिकरणाने यावर बंदी आणली होती.

खारशिंग नावाच्या माहिती अधिकार कार्यकर्त्या अनेक वर्षांपासून या अवैध बनवेगिरीचं पितळ उघड पाडण्याचं काम करत होत्या. 8 नोव्हेंबर म्हणजे ईस्ट जेंतीया हिल्स येथील कोळसा खाणीत दुर्घटना घडण्याच्या जवळपास 1 महिना आधी अवैध खाणकाम सुरू असताना कोळसा लादलेल्या वाहनांचा फोटो घेत असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. या हल्ल्यात त्या थोडक्यात वाचल्या. त्यांची चूक फक्त एवढीच आहे की त्या अवैध रित्या सुरू असलेल्या खाणकामावर टीका करत होत्या आणि कोळसा माफिया आणि सरकारी बाबूलोकांमधील परस्परसंबंध लोकांसमोर उघड करत होत्या. या हल्ल्यानंतर त्या पोलिकांकडे तक्रार करण्यास गेल्या असता पोलिसानी तक्रारीकडे दुर्लक्ष करून फक्त चोरी आणि खुनाचा प्रयत्न एवढाच गुन्हा नोंदवून घेतला आणि कोळसा माफियांवर काहीच कारवाई केली नाही. या वरून आपण समजू शकतो की खाण माफियांना सरकारचं आणि प्रशासनाचं संरक्षण आहे. खारशिंग म्हणतात की प्रशासनाला या अवैध गोरखधंद्याची माहिती आहे आणि खाण माफियांना प्रशासनाचं आणि राजकीय गुंडांचं संरक्षण असल्याशिवाय हा धंदा चालूच शकत नाही. अनेक खाण माफिया एक तर राजकीय पक्ष्यांचे नेते आहेत किंवा ते राजकीय पक्षांना निवडणुकीत पैसा तरी उपलब्ध करून देतात.

मेघालयातील कोळसा खाणीमध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये 16 ते 20 वर्ष वयाच्या तरुणांची संख्या खूप जास्त आहे. गरिबी आणि बेरोजगारीमुळे या खाणकामगारांनी अशा कामाची निवड केली आहे जे काम त्यांचा एक दिवस जीव घेऊ शकते. या कामगारांचं आयुष्य आणि मुख्यत्वे तरुण कामगारांचं आयुष्य या कोळसाच्या खाणीत उध्वस्त होत आहे. श्रम मंत्रालयाच्या सर्वे नुसार खाणीत काम करणाऱ्या कामगारांचं सरासरी आयुष्य 40 वर्ष आहे. खाणीतून निघणारे वायू मनुष्यासाठी प्रचंड घातक तर आहेतच परंतु नफेखोरीसाठी प्रदूषणावर नियंत्रण न आणता चालत असलेल्या या खाणींमुळे निसर्गाचेही खूप नुकसान होत आहे. हवा, पाणी हे नैसर्गिक घटक या खाणींमुळे विषारी बनले आहेत. माणसाच्या जीवावर उठलेलली ही नफेखोरी एक दिवस पृथ्वीला माणसाच्या राहण्या योग्य ठेवणार नाही.

कोळसा खाणीत होणाऱ्या दुर्घटना काही नवीन नाहीत. 28 मे 1965 धनबाद कोळसा खाणीत स्फोट होऊन 268 खाणकामगारांचा मृत्यू झाला होता. अवैज्ञानिक पद्धतीचा वापर होत असल्यामुळे, कोळसा खाणींमध्ये काम करण्याच्या धोकादायक पद्धतींमुळे, तसेच कोळसा उत्खननामध्ये कमी खाजगी गुंतवणूक होत असल्यामुळे 1973ला खाणींचे राष्ट्रीयकरण करण्यात आलं. तरीही कोळसा खाण दुर्घटना काही कमी झाल्या नाहीत. छोट्या दुर्घटना सोडाच, मोठ्या दुर्घटनांची यादीही प्रचंड आहे. 27 डिसेंबर 1975 च्या चासनाळा खाण दुर्घटनेत खाणीत पाणी घुसल्यामुळे 372 खाण खाणमगारांचा बुडून मृत्यू झाला, 25 जानेवारी 1994 रोजी केंडा, बिहार येथील दुर्घटनेमध्ये 55 कामगारांचा मृत्यू, 1999 मध्ये प्रास्कोल येथे 16 कामगारांचा मृत्यू, 2000 साली कवाडी खाण दुर्घटनेत्त 10 कामगारांचा मृत्यू, 2001 साली बागडीगी खाण दुर्घटनेत 29 खाणकामगारांचा मृत्यू, गोदावरी खाणीत 2003 साली झालेल्या दुर्घटनेत 17 खाणकामगारांचा मृत्यू, 2005 साली सौंडा खाण, झारखंड येथे झालेल्या खाण दुर्घटनेत 14 खाणकामगारांचा मृत्यू, या काही मोठ्या दुर्घटना आहेत. श्रम मंत्रालयाच्या आकड्यानुसार 2009 ते 2013 पर्यंत खाण दुर्घटनेत 752 खाण कामगारांचे मृत्यू झालेले आहेत. एकट्या 2017 मध्ये खाण दुर्घटनेत 122 कामगारांचा मृत्यू झाला आहे. वर दिलेले जे आकडे आहेत ते फक्त दुर्घटना होऊन मृत्यू झालेल्या कामगारांची संख्या आहे. खाणीत दुर्घटना होऊन मृत्यू झालेल्या लोकांपेक्षाही जास्त मृत्यू दरवर्षी विषारी वायूंच्या सानिध्यात असल्यामुळे कोळसा खाणींच्या क्षेत्रात राहणाऱ्या लोकांना विविध प्रकारचे रोग होत असल्यामुळे होतात. कोळसा खाणींच्या क्षेत्रातील नद्या निर्जीव बनल्या आहेत, जमिनीची सुपिकता नष्ट होत आहे, लहान मुलांना आईच्या गर्भात असतानाच विविध प्रकारचे अपंगत्व येत असल्यामुळे कोळसा खाण क्षेत्रातील पिढ्याच बरबाद होत आहेत. या कोळसा खाणी कामगार, कष्टकरांच्या जीवावर उठल्या आहेत.

या सर्व दुर्घटनांमध्ये एक साम्य आहे. या सर्व दुर्घटना खाणकाम करताना योग्य सुरक्षा नसल्यामुळे झाल्या आहेत. मग प्रश्न उभा राहतो खाणकामगारांना योग्य सुरक्षा का उपलबध करून दिल्या जात नाही? पहिली गोष्ट ही की 1973 नंतर जरी सर्व खाणींचं राष्ट्रीयकरण झालेलं असलं तरी कोळसा माफियांची एक समांतर व्यवस्थाही चालतेच. पूर्णपणे राजकीय संरक्षण प्राप्त असलेले हे माफिया कामगारांच्या परिस्थितीचा फायदा घेऊन त्यांच्याकडून काम करवून घेतात. जमिनीतून कोळसा काढून नफा कमावणे एवढेच एकमेव उद्दिष्ट असल्यामुळे खाणीत कमी गुंतवणूक करून जास्त उत्पादन काढतात. मग या साठी अवैज्ञानिक पद्धतींचा उपयोग करून (जसे की ईस्ट जेंतीया हिल्स मध्ये रॅट होल पद्धतीचा उपयोग करण्यात आला होता) कामगारांना असुरक्षित आणि धोकादायक वातावरणात काम करावं लागतं. उत्खननासाठी ज्या आधुनिक उपकरणांची गरज असते त्यावरही खर्च केला जात नाही. या सर्व गोष्टींमुळे खाणीत दुर्घटना होण्याची नेहमीच भीती असते. भितीची पूर्वकल्पना असतानाही कामगार नाईलाजाने (प्रचंड गरिबी, कुटुंबाला सांभाळण्याची जबाबदारी आणि खूप जास्त बेरोजगारी असल्यामुळे) काम करतात. सरकारी नियमानुसार कोळसा खाण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या खाणकामगारांच्या घरच्यांना मदत राशी म्हणून 5.4 लाख ते 8.5 लाख रुपये द्यावे लागतात. असे अनेक प्रसंग आहेत जिथे खाणकामगारांना हे पैसेही दिले जात नाहीत आणि दिले तरीही सरकारी कार्यालयांमध्ये खूप पायपीट केल्या नंतरच. बहुसंख्य खाणकामगार तर कंत्राटी पद्धतीनेच काम करतात त्यामुळे त्यांना हा फायदाही मिळणे दुरापास्त आहे.

**थायलंड देशात जुन महिन्यात एका गुहेत एका उच्चवर्गीय शाळेतील काही मुलं अडकली होती. त्यांना सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मीडिया एकत्र झाला, जगभराचे लक्ष लागले, जगभरातून उत्तमोत्तम पोहणारे आणि बचावदल आणून त्या सगळ्यांना सोडवण्यात आले. याची तुलना मेघालयातील अपघाताशी केली की भांडवली व्यवस्थेचा भेसूर वर्गीय भेदभाव करणारा चेहरा पुन्हा समोर येतो. या व्यवस्थेत भांडवलदारांचा नफा तर वाढतो पण कामगार मात्र स्वतःच्या जीवाला गमावतो. कारखाने, खाणी जिथं जिथं जीवनावश्यक वस्तूंच उत्पादन होतं ते ठिकाण कामगारांसाठी यातना शिबिरापेक्षा कमी नाहीत. कारखान्यांमध्ये, खाणींमध्ये श्रम कायदे पायदळी तुडवले जातात. या भांडवली व्यवस्थेत मुळातच तकलादू असलेले श्रम कायदे सुद्धा फक्त कागदावरच आहेत हेच खरे.**

**"दुसऱ्यांसाठी प्रकाशाचा एक किरण बंदी बनणे, दुसऱ्यांच्या जीवनाला दैदिप्यमान करणे, हे सगळ्यात मोठे सुख आहे जे मानव प्राप्त करू शकतो. यानंतर कष्ट अथवा त्रास, दुर्भाग्य किंवा अभावांना मनुष्य घाबरत नाही. मग मृत्यूचे भय त्याच्या आतून नष्ट होते, आणि खरोखर जीवनाला प्रेम करणे तो तेव्हाच शिकतो. आणि, फक्त तेव्हाच पृथ्वीवर आपले डोळे उघडून तो अशाप्रकारे चालू शकतो ज्यामुळे तो सर्व काही बघू, ऐकू आणि समजू शकेल; फक्त तेव्हाच आपल्या संकुचित कवचातून बाहेर पडून तो बाहेर प्रकाशात येऊ शकतो आणि समस्त मानवजातीच्या सुख आणि दुःखांचा अनुभव घेऊ शकतो. आणि फक्त तेव्हाच तो खरा मनुष्य बनू शकतो."**

**✍ एफ. ज़र्ज़िन्स्की**

**"जगण्यापेक्षा लोक आपला सगळा वेळ जगण्याच्या तयारीमध्ये घालवून बसतात. आणि मग एवढा सगळा वेळ हातातून निघून गेल्यावर ते स्वतःला लुटलेले बघतात तर आपल्या नशिबाला दोष देऊ लागतात."**

**✍ मॅक्सिम गोर्कीची गोष्ट 'म्हातारी इजरगिल' मधील एक पात्र**

**जगभरातील कामगारांचे शिक्षक व चीनी क्रांतीचे महान नेते माओ त्से तुङ यांच्या जन्मदिनी (26 डिसेंबर) निमित्त**

**"प्रत्येक व्यक्ती एक ना एक दिवस जरूर मरतो, पण प्रत्येक माणसाच्या मृत्युचे महत्व वेगवेगळे असते. --- जनतेसाठी प्राण अर्पण करण्याला उत्तुंग पर्वतापेक्षाही जास्त महत्व आहे, पण फॅसिस्टांसाठी तसेच शोषक आणि उत्पीडकांसाठी प्राण देण्याला पंखापेक्षाही हलके महत्व आहे."**



# स्वच्छ भारत अभियानाची नौटंकी आणि स्वच्छता कामगारांचे मृत्यू

✍ **बबन ठोके**

देशभरामध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे मृत्यू आणि जीवनाची हेळसांड चालूच आहे. 9 जानेवारी रोजी पनवेल येथे 2 सफाई कामगारांच्या नालेसफाई दरम्यान गुदमरुन मृत्यू झाला. 26 ऑक्टोबर रोजी मुंबईत काही सफाई कर्मचाऱ्यांचा काम करताना विषारी वायूमुळे गुदमरुन मृत्यू झाला होता. अशा घटना सतत होत असताना आणि मोदी सरकारला पाच वर्षे पूर्ण होत असताना, आता जवळपास विस्मरणात गेलेल्या आणि स्वच्छतेचे मार्केटींग करत चालू केलेल्या 'स्वच्छ भारत अभियाना'चे वास्तव जाणून घेणे आणि त्यासंदर्भात स्वच्छता कामगारांच्या जीवनाची स्थिती समजणे आवश्यक आहे.

मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर 2 ऑक्टोबर 2014 रोजी देशभरात स्वच्छता अभियान चालू करण्यात आले. अगोदरच चालू असलेल्या योजनांचे नवीन नामकरण करून "स्वच्छ भारत अभियान" या नावाने हे अभियान चालू झाले. 2 ऑक्टोबर 2018 रोजी या अभियानाला चार वर्षे पूर्ण झाली आहेत. हे तर जगजाहीरच आहे की **इतर अभियानांप्रमाणे या अभियानामध्ये सुद्धा फक्त प्रचार-प्रसारावरच जोर आहे आणि वास्तविक काम अतिशय कमी आहे.** हे अभियान सुरु होताच नेत्यांनी, विशेषतः भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी, पंतप्रधान नरेंद्र मोदी पासून ते छोट्या-मोठ्या सर्वच नेत्यांनी, या अभियानाला फोटोसेशन मध्ये बदलले. एखाद्या ठिकाणी एकत्र येऊन स्वच्छ जागेवर झाडाच्या पानांचा पाचोळा पसरवला जात असे व तोच कचरा काही मिनिटे फोटोग्राफर, पत्रकार, रिपोर्टर यांच्या उपस्थितीत साफ केला जात असे. यामध्ये राजकीय नेते, सरकारी कर्मचारी, बॉलिवूडमधील अभिनेते-अभिनेत्री खेळाडू पासून ते उद्योगपती व अध्यात्मिक गुरु यांच्यापर्यंत सर्व सफाई कामाला लागले व सफाई अभियानाला नाट्य समारोहात बदलण्यात आले.

काही आरटीआय याचिकांद्वारे खुलासा झाला आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वच्छ भारत अभियानाच्या प्रचारामध्ये 2014-15 या एका वर्षात 100 कोटी रुपये खर्च झाला. केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाने सांगितले आहे की 2014-15 या वर्षात सरकारने जाहिरात व प्रचार-प्रसारावर 2.15 कोटी रुपये, वर्तमान पत्रात जाहिरातीवर 70.80 लाख रुपये, दृकश्राव्य माध्यमांमध्ये जाहिरातीवर 43.64 कोटी रुपये, टी. व्ही. चॅनेल्स मध्ये डी. ए. वी. पी. च्या माध्यमातून जाहिरातीवर 25.88 रुपये खर्च केले आहेत. दूरदर्शन वरील जाहिरातीवर 16.99 कोटी रुपये आणि रेडिओ वरील जाहिरातीवर 5.42 कोटी रुपये खर्च केले आहेत. ही सर्व आकडेवारी 2014-15 या फक्त एक वर्षातील आहे. 2014 पासून आत्ता पर्यंत 60,000 कोटी रुपये या अभियानावर खर्च केले आहेत.

अभियानाची सुरुवात झाली तेव्हा देशभरात मध्यमवर्गातील, उच्च-वर्गातील अनेक जणांना देश सेवेचे भरते आले आणि हातात झाडू घेऊन ते एक दिवसाच्या सफाई कामाला लागले. यापैकी काही भोळसटांना खरोखर वाटले की यामुळे देश स्वच्छ होऊन जाईल. स्वच्छतेच्या, कचरा न करण्याच्या वैयक्तिक सवयींवर प्रचंड जोर देऊन लेख लिहिले गेले, आणि उपदेश करण्यात आले. स्वच्छतेच्या सवयी असल्या पाहिजेत याबद्दल तर काही दुमत असू शकत नाही, परंतु देशाच्या पातळीवर स्वच्छता ठेवण्यासाठी एक कायमस्वरूपी, सुनियोजित यंत्रणा असली पाहिजे आणि त्यासाठी सार्वजनिक गुंतवणूक आवश्यक आहे, याबद्दल मात्र नफेखोर मीडियाने चकार शब्द काढले नाहीत. स्वाभाविकच आहे की **दैनंदिन जीवनामध्ये शहरं, गावं स्वच्छ ठेवण्याचे, आपल्या जीवाची बाजी लावून हे काम खरोखर करणारे सफाई कर्मचारी या सर्व चर्चांमधून गायब होते आणि स्वच्छतेला फक्त एका सामाजिक सवयीच्या भागापूरत्या मर्यादित करणाऱ्या या चर्चा होत्या.** अपेक्षेप्रमाणेच या योजनेचा बोजवारा उडाला आहे, सुखवस्तू लोक आपापल्या घरांमध्ये जाऊन या योजनेला विसरुन गेले आहेत, दरवर्षी काही सरकारी कार्यालयांमध्ये सक्तीने या स्वयंसेवी अभियानाला वर्षातून एक दिवस राबवले जाते आणि औपचारिकता पुर्ण केली जाते.

**वास्तव हे आहे की एकीकडे स्वच्छ भारत अभियानाची दवंडी वाजवली जात असताना दुसरीकडे सफाईसाठी आपले आयुष्य पणाला लावणाऱ्या सफाई कामगारांचे मृत्यूचे चक्र थांबण्याचे काम नाही.** 26 ऑक्टोबर 2018 रोजी डोंबिवली येथील खंबाळपाडा येथील एमआयडीसी परिसरात नाल्याची सफाई करण्यासाठी कामगार मॅनहोलमध्ये उतरले होते. नाल्यात वाहणाऱ्या रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे घातक वायू तयार झाला होता. त्याचाच त्रास सफाई करण्यासाठी गेलेल्या कामगाराला झाला व तो आत गुदमरू लागला. त्यास वाचविण्यासाठी वर उभे असलेले कामगारही नाल्यात उतरले, मात्र त्यांनाही या विषारी वायूमुळे त्रास झाला व तिघांचा गुदमरुन मृत्यू झाला. हे कामगार ठेकेदारी पद्धतीने काम करणारे होते. **आज दिल्ली पासून ते मुंबई पर्यंत सर्वच पालिकांकडे अशा कामगारांच्या मृत्यूची कोणत्याही प्रकारे नोंद केली जात नाही, मोबदला देखील दिला जात नाही व अशा पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना काम करताना सुरक्षेसंबंधी कोणतेही साहित्य पुरविले जात नाही.** मशीनच्या जागेवर माणसाला गटारांमध्ये उतरून साफसफाई करावी लागते, त्यामध्ये कामगारांचे मृत्यू होत आहेत. या घटनेत देखील हेच झाले. रसायनमिश्रित सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांची सफाई करणाऱ्या तिन्ही कामगारांना सुरक्षेची कोणतीही साधने पुरवली नव्हती.

अशा किती कामगारांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे, किंवा आतापर्यंत किती कामगार अशाप्रकारे मरण पावले आहेत याचा निश्चित आकडा कोणत्याही पालिका किंवा राज्य /राष्ट्रीय आयोगाकडे नाही कारण कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांच्या मृत्यूची नोंदच ठेवली जात नाही. 27 मार्च 2014 रोजी सुप्रीम कोर्टाने मरण पावलेल्या कामगारांची ओळख निश्चित करून संबंधित पीडित परिवाराला दहा लाख रुपये भरपाई दिली जावी असा आदेश दिला होता. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाला चार वर्षे होऊन गेलीत. अजून सुद्धा कोणत्याही राज्याकडून यासंबंधी ठोस माहिती दिली गेलेली नाही व आयोगाकडे देखील या संबंधात जाहीर करण्यासाठी निश्चित ठोस आकडा नाही. हे कामगार कोण होते, त्यांची ओळख काय, व यातील किती लोकांना किती भरपाई दिली आहे याची सुद्धा माहिती नाही. कारण तेच—कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांची नोंदच केली जात नाही. आयोगाकडून सांगण्यात येते की मृत्यु झालेल्या कामगारांची ओळख व भरपाई संबंधी माहिती जमा केली जात आहे, पण आमच्याकडे निश्चित आकडा हा राज्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर येत असतो, आणि काही राज्यांनी माहिती दिली आहे पण ती सुद्धा अर्धवट आहे, त्यामुळे यासंबंधी सध्या काही निश्चित जाहीर केले जाऊ शकत नाही.

मॅन्युअल स्कॅव्हेंजिंग ॲक्ट 2013 मध्ये असे सांगण्यात आले आहे की कोणत्याही व्यक्तीला मॅनहोल किंवा गटारीत उतरणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. जर एखाद्या कठीण परिस्थितीत सफाई कामगाराला मॅनहोल किंवा गटारीत पाठवले तर त्यावेळी 27 प्रकारच्या नियमांचे कठोरपणे पालन करावे लागेल. मॅनहोल साफसफाई करत असतांना संबंधित इंजिनीअरची परवानगी असली पाहिजे, जवळ ॲम्बुलन्स असायला पाहिजे जेणेकरुन दुर्घटनेच्या वेळी लवकरात-लवकर रुग्णालयात पोहचविण्यात येईल, मॅनहोल सफाई दरम्यान विशेष पोशाख, ऑक्सिजन सिलेंडर, मास्क, गम बूट, सेफ्टी बेल्ट व आपत्कालीन परिस्थिती मध्ये ॲम्बुलन्सला सूचित करण्यासारख्या नियमांचे पालन करावे लागेल. पण आज अशी बरेच प्रकरणे आहेत ज्यात हे स्पष्ट झाले आहे की खाजगी कंत्राटी पातळीवर यांचे अजिबात पालन केले जात नाही.

आज मुंबईत दर दिवशी दहा हजार मेट्रिक टन कचरा तयार होतो. यामध्ये 40% जैविक विघटन होणारा कचरा, 19% पुनर्प्रक्रिया करण्याजोगा कचरा, 12% अविघटनशील आणि 29% दगड-माती यांचा समावेश असतो.या सर्व कचऱ्याच्या सफाईचा बोजा सफाई कामगारांवर असतो. झोपडपट्ट्या, रस्ते, नाले, गटाराच्या सान्निध्यात सफाईचे काम केल्याने कामगारांना दमा, कॅन्सर, टीबी व इतर श्वसनविकारांना समोर जावे लागते. या आजारामुळे व कामाच्या अमानवी स्वरुपामुळे कामगारांमध्ये व्यसनाधीनता जास्त असते व त्यामुळे बहुसंख्य कामगारांचा वयाच्या चाळिशीतच मृत्यू होतो असे आढळून येते. पालिका या सुद्धा कामगारांच्या मृत्यूची नोंद ठेवत नाही कारण कंत्राटी कामगाराच्या मृत्यूला पालिकेच्या दृष्टिकोनातून लेखी किंमत नसते. 80 टक्के कामगारांचे मृत्यू हे क्षयरोगाने होत आहेत. अनारोग्याच्या वातावरणात काम करणाऱ्या कामगारांची ठराविक कालावधीनंतर वैद्यकीय तपासणी होणे गरजेचे असते. पण ही तपासणी बहुतांश फक्त कागदोपत्री होत असते.

आज जगभरात बहुतांश ठिकाणी मॅनहोल गटाराला मशीन द्वारे साफ केले जाते. आपल्या देशात देखील काही भागात केले जाते. पण मोठ्या प्रमाणात कामगारांना कोणत्याही सुरक्षा साधनाशिवाय सफाई करावी लागते. सफाईच्या नावाने जगभराची नौटंकी करणाऱ्या मोदी सरकारला सफाई कामगारांच्या मृत्यूने काही एक फरक पडत नाही. ही बाब सुद्धा लक्ष देण्यासारखी आहे की सीमेवर मरणाऱ्या सैनिकांच्या शपथा घेणारी भारतीय जनता पार्टी यावर काहीच बोलत नाही की भारताच्या सीमेवर जितक्या सैनिकांना मरण पत्करावे लागते त्यापेक्षा कितीतरी जास्त मृत्यू गटार साफ करताना सफाई कामगारांचे होतात. एकूण सफाई कामगारांपैकी 95 टक्के सफाई कामगार हे दलित आहेत, तरीही स्वतःला दलितांचे तारणहार म्हणवणारे निवडणूकबाज पक्ष आणि भाजपा सरकार सफाई कामगारांच्या मृत्यूवर का गप्प बसतात, हा प्रश्न आज जनतेने त्यांना विचारलाच पाहिजे. कारण या सर्व नेत्यांसाठी हे प्रश्न म्हणजे फक्त निवडणुकांमध्ये जातीचे समीकरणच असतात. आजच्या व्यवस्थेमध्ये सफाई सारखे अत्यंत महत्वपूर्ण काम पार पाडणाऱ्या सफाई कामगारांना त्यांचे घटनात्मक, कायदेशीर अधिकार सुद्धा नफ्यासाठी नाकारले जातात. तेव्हा आपण मोदी सरकारचे स्वच्छ भारत अभियानाचे ढोंग ओळखले पाहिजे आणि सफाई कर्मचाऱ्यांच्या लढ्याशी नाते जोडले पाहिजे.

# भारतीय इतिहास काँग्रेस 2018 रद्द : कारण ते घाबरतात इतिहासाला!

**पान 11 वरून**

शकतो. अचानक रद्द करण्याचा घटनाक्रम यामध्ये राजकीय दबावाच्या शक्यतेकडे इंगित करतो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये 28-30 डिसेंबर 2018 दरम्यान 79वे इतिहास महासंमेलन आयोजित होणार होते. दरवर्षी होणाऱ्या या काँग्रेसमध्ये देशभरातील युवक, संशोधक विद्यार्थी, आणि बुद्धिजीवी सहभागी होतात, इतिहासाशी जोडलेले शोध निबंध प्रस्तुत करतात आणि चर्चा आयोजित केल्या जातात. यावेळी ठरलेल्या तारखेच्या 15 दिवस अगोदर आईएचसी सोबत चर्चा न करता पुणे विद्यापीठाने याला स्थगित करण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. यावर आईएचसी द्वारे पत्र लिहून या पद्धतीचा विरोध केला गेला आणि याला एक बेजबाबदार पद्धत संबोधून पुणे विद्यापीठावर आरोप लावण्यात आला की प्रशासनाला इतिहास काँग्रेसचे आयोजन करण्याची इच्छा नाहीय्रे व आता काँग्रेसला रद्दच समजण्यात यावे कारण कोणतेही तार्किक कारण न देता स्थगित करण्यातून हेच दिसून येते. पुणे विद्यापीठ प्रशासनाने याचे कारण निधीची कमतरता सांगितले पण ही गोष्ट अनेक प्रश्नांना जन्म देते. विद्यापीठाला निधीच्या कमतरतेची माहिती काही दिवस अगोदरच मिळाली का? हे पटण्याजोगे वाटतच नाही कारण काँग्रेसची जागा आणि तारीख 10 महिने अगोदरच ठरवली जाते आणि त्याच वेळी आर्थिक स्थितीचेही आकलन माहित असते. दुसरा प्रश्न हा पण आहे की जर आपण मानले की विद्यापीठामध्ये निधीची कमतरता होती, तरी सुद्धा विद्यापीठाने आईएचसी सोबत यावर अगोदरच चर्चा करुन काही उपाय शोधण्याचा प्रयत्न का नाही केला? त्यांनी सर्व विद्यार्थी, संशोधक आणि बुद्धीजीवींना त्यांचे शोधनिबंध तयार होण्याअगोदर, प्रवासाची व्यवस्था होईपर्यंत या गोष्टीची माहिती का नाही दिली? याच दरम्यान इर्फान हबीब आणि रोमिला थापरांसारख्या प्रख्यात इतिहासकारांनी पुणे विद्यापीठाने दिलेल्या कारणावर संशय व्यक्त केला आहे आणि म्हटले आहे की सरकारच्या दबावामुळेच असे झाले आहे कारण इतिहास काँग्रेसद्वारे शिकवला जात असलेला इतिहास प्रस्थापित सरकारच्या डोळ्यात खुपतो आहे आणि कार्यक्रमाच्या काही दिवस अगोदरच त्याला स्थगित करणे संशयास्पद आहे. तसेच, पुणे विद्यापीठाच्या एका माजी कुलगुरुंनी टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या आपल्या वक्तव्यात असे म्हटले आहे की निधीच्या कमतरतेचे कारण असूच शकत नाही कारण विद्यापीठ कोणताही कार्यक्रम हाती घेण्यापूर्वीच ठरलेल्या निधीपेक्षा जास्त निधीचे आयोजन करत असते. इथे आम्ही सांगितले पाहिजे की अशा कोणत्याही मोठ्या कार्यक्रमासाठी यूजीसी, भारतीय इतिहास शोध परिषद सारख्या संस्थाही निधी देतात आणि माजी कुलगुरुंच्या वक्तव्याला आधार बनवले तर एखाद्या मुख्यमंत्र्यांकडूनच 1 कोटी पर्यंतची आर्थिक मदत मिळते.

**खरेतर इतिहास काँग्रेसला रद्द करणे याच फॅसिस्ट सरकारचे एक पाऊल आहे ज्यांना असा इतिहास हवाय जो त्यांच्या घृणेच्या आणि खोटारडेपणाच्या राजकारणाचा स्वामिभक्त सेवक असेल, असा इतिहास नाही जो स्वातंत्र्याच्या अगोदरच्या त्यांच्या काळ्या कारनाम्यांना उघड करेल, त्यांच्या खोट्या राष्ट्रवादाला ध्वस्त करेल, त्यांच्या फॅसिस्ट-धर्मवादी राजकारणाला विरोध करेल, प्रश्न विचारायला शिकवेल. विज्ञान आधारित तर्कसंगत पद्धतीने विचार करणे या सरकारांसाठी धोकादायक आहे म्हणून ते अशा कोणत्याही स्वतंत्र काँगेसला सहन करु शकत नाहीत. अशा सत्तेची ताकद जनतेच्या अज्ञानात निहीत असते, त्यामुळे असे सरकार नेहमीच सत्यशोधनाला विरोध करेल.**

# क्रांतिकारी सोवियत संघातील आरोग्य सेवा

✍ मुनीश मैंदोला

आजच्या नवीन पिढीला क्रांतिकारक सोव्हिएत संघाच्या समाजवादी मॉडेलबद्दल (1917-1956) एक तर काहीही माहिती नाही किंवा भांडवली प्रसारमाध्यमांमध्ये समाजवादाबद्दलचा जो कुत्सा-प्रचार केल्या जातो फक्त तोच माहिती आहे—जो माहिती नसण्याच्या समानच असतो. बरेच लोक ज्यांना समाजवादाची विचारधारा आणि तिच्या यशाबद्दल जाणूनही घ्यायचे असते, ते बऱ्याचदा इंटरनेट आणि विकिपीडिया किंवा हिस्टरी चॅनेल, जिओग्राफी चॅनेल इत्यादींमधून त्याची सुरुवात करतात. **भांडवली चॅनेल/मीडिया/इंटरनेट यांवर सचेतन-अचेतन स्वरूपात समाजवादाच्या विचारधारेबद्दल भ्रम पसरवण्याचे काम केले जाते आणि समाजवादाच्या प्रचंड यशांना जाणून बुजून कमी करणे किंवा गायबच करून टाकण्याचं षड्यंत्र केले जाते जेणेकरून लोकांनी भांडवली शोषण आणि लूटीला सहन करणंच आपलं नशीब समजावं आणि भांडवलशाहीला एकमात्र पर्याय असलेल्या समाजवादाकडे दुर्लक्ष करावं.** अशा परिस्थितीत आवश्यकता आहे की नव्या पिढीला समाजवादाच्या यशाबद्दल सांगितलं जावं. या क्रमात आपण सोवियत संघातील 1917 ते 1956 मधील काळाची तपासणी करत हे समजून घेण्याचा प्रयत्न करू की ह्या काळात सोवियत संघात आरोग्य क्षेत्रामध्ये काय काय साध्य करण्यात आले.

1956 च्या विसाव्या पार्टी काँग्रेसनंतर निकिता ख्रुश्चेव्हने समाजवादासोबत गद्दारी करून तिथे भांडवलशाही परत प्रस्थापित केली. त्यानंतर तिथे समाजवादी धोरणं आणि व्यवस्थेला तोडून श्रमाच्या लुटीवर टिकलेली आधीची भांडवली धोरण पुन्हा सुरू केली गेली. परिणामी काही काळातच तेथील परिस्थिती परत झारकालीन रशिया किंवा कुठल्याही इतर भांडवली देशाप्रमाणे झाली. आजच्या भांडवली रशियात, फक्त श्रीमंत लोकांसाठीच उत्कृष्ट आरोग्यसेवा उपलब्ध आहेत, सामान्य जनतेच्या वाट्याला श्रीमंतांचं उरलं-सुरलं येतं आणि हीच परिस्थिती आजच्या भारताची किंवा इतर कोणत्याही भांडवली देशाची आहे.

**सोवियत संघात आरोग्य सेवा-सुविधा सर्व जनतेसाठी निशुल्क उपलब्ध होत्या;** तिथे ना गोरखपुर प्रमाणे ऑक्सिजन सिलेंडर च्या अभावी लहान मुलं मरत होती, ना भूक कुणाचा जीव घेत होती. सोवियत रशियात गृहयुद्धाच्या (1917-1922) काळात आरोग्य सेवा फारच मागे पडली होती. 1921 मध्ये जेव्हा गृहयुद्धात सोवियत सत्ता जिंकली तेव्हा रशियामध्ये सर्व ठिकाणी युद्धामुळे प्रचंड वाईट परिस्थिती होती. देशभरात टायफॉईड आणि देवी सारख्या आजारामुळे अनेक लोक मरत होते. साबण, औषधे, आहार, घर, शाळा, पाणी इत्यादी तमाम मुलभूत सुविधांचा चारही दिशांनी दुष्काळ होता. मृत्युदर कित्येक पट वाढला होता आणि प्रजनन दर कमी झाला होता. चारही दिशांनी अव्यवस्थेची परिस्थिती होती. संपूर्ण देश आरोग्य कर्मचारी, दवाखाने, खाटा, औषधं, विश्रामगृह ह्या सगळ्यांच्या अभावाच्या समस्येशी झगडत होता. या परिस्थितीत सोवियत सत्तेने एका केंद्रीकृत आरोग्यव्यवस्थेला स्वीकारण्याचा निर्णय घेतला, जिचे लक्ष्य नजिकच्या काळात उपचार करणे आणि दूरच्या काळात रोग थांबवणे, रोगांपासून बचावाची साधने आणि पद्धती विकासावर भर देणे हा होता जेणेकरुन लोकांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारावी. या व्यवस्थेचे उद्दिष्ट नागरिकांना त्यांच्या राहण्याच्या आणि कामाच्या ठिकाणी सर्व मूलभूत आरोग्य सुविधा उपलब्ध करून करून देणे होतं, जेणेकरून त्यांना दुरच्या शहरांमध्ये नाही तर घराजवळ उपचार मिळेल. देशांतर्गत सर्वात प्रथम सहायता स्टेशन, नंतर पॉली क्लिनिक, जिल्हा आणि शहरांमध्ये मोठे दवाखाने तयार करण्यात आले. सर्व सरकारी विभाग, कारखाने, खाणी, शेती इत्यादींमध्ये काम करणारे कामगार, शेतकरी, कर्मचारी, नागरिक यांना त्यांच्या काम करण्याच्या आणि राहण्याच्या ठिकाणी आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या व लोकांना त्यांच्या आरोग्य हक्क आणि अधिकारांबद्दल जागृत करण्यात आलं. सोवियेत संघाच्या राज्य घटनेमध्ये 1936 मध्ये लिहिण्यात आलं की जनतेला मोफत आरोग्य सुविधा देणे हे सरकारचं कर्तव्य आहे आणि ह्याला पूर्ण देशामध्ये लागू करण्यात आलं. सोवियत संघात आजारांवर फक्त उपचार नाही तर रोगांवर नियंत्रण ठेवण्यासाठी रोगांच्या प्रतिबंधावर योग्य लक्ष देण्यात आले. देशभरात विविध प्रकारचे दवाखाने खोलण्यात आले ज्यांच्यात दारूबंदी, टीबी व अन्य प्रकारच्या रोगाशी लढण्याची कौशल्ये उपस्थित होती. 1919 मध्ये सोवियत संघात लसीकरण अनिवार्य करण्यात आले, त्याचा परिणाम लगेच दिसून आला आणि मृत्युदर कमी झाला. सोवियत संघात 1917 मध्ये 17,785 डॉक्टर होते जे 1928 मध्ये वाढून 63,219 झाले. 1917 मध्ये आरोग्यावरील खर्च 128 मिलियन रुबल पासून वाढून 1928 पर्यंत 660 मिलियन रुबल पर्यंत पोहोचला. 1917 मध्ये दवाखान्यातील खाटांची संख्या 1,75,000 होती जी 1928 मध्ये वाढून 2,25,000 झाली. त्यानंतर पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या (1932-1933) शेवटापर्यंत डॉक्टरांची संख्या वाढून 76,000 झाली, दवाखान्यातील खाटांच्या संख्येत अर्ध्यापेक्षा जास्त वाढ झाली आणि नर्सेसची संख्या 2,56,000 पासून वाढून 57,50,000 झाली. सोबतच 14 नवी वैद्यकीय महाविद्यालये व 133 सेकंडरी वैद्यकीय महाविद्यालय खोलण्यात आले. झारकालीन रशियामध्ये 9 शिशू आणि मातृत्व कल्याण केंद्र होती जी 1938 मध्ये वाढून 4,384 झाली. माता आणि मुलांसाठी मोठ्या प्रमाणात किंडरगार्डन, नर्सरी, विश्रामगृह इत्यादी बनवले गेले. स्टालिन काळात सर्व प्रकारचे उपचार- दवाखान्यातील उपचार, फिजियोथेरेपी, रेडिओथेरपी, सॅनिटोरिम इलाज, दंतचिकित्सा, मातृत्व सेवा इत्यादी सोव्हिएत मधील जनतेला मोफत उपलब्ध होते. 1937 मध्ये सोव्हिएत संघात सार्वजनिक आरोग्याचे बजेट 1913 च्या 75 पट होते. 1913 मध्ये आरोग्यसेवांवर प्रतिव्यक्ती खर्च केवळ 90 कोपेक होता जो 1937 मध्ये वाढून 60 रुबल झाला. 1938 पर्यंत बालमृत्यू दर 50 टक्क्यांनी कमी झाला, क्षयरुग्णांची संख्या 80 टक्क्यांनी कमी झाली, सीफिलिस रुग्णांची (गुप्तरोग) संख्या 90 टक्क्यांनी कमी झाली. 1937 मध्ये मृत्युदर 1913 मधील मृत्यू दराच्या 40 टक्क्यांनी कमी झाला होता, म्हणजे लोकांचं आयुर्मान वाढलं होतं. याव्यतिरिक्त सोव्हिएत संघात 1938 मध्ये खाद्य उद्योगाचे एकूण उत्पादन 1913 च्या झारकालीन रशियाच्या जवळपास 6 पट होते आणि जनतेच्या खूप मोठ्या भागाला उत्तम पौष्टिक भोजन उपलब्ध करून दिल्या जात होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटापर्यंत फळांचा खप 3 पट आणि मांसाचा खप 5 पट वाढला होता.

ह्या सोवियत प्रणालीने आपली श्रेष्ठता आणि उपयोगिता 1941 ते 1945 काळातील दुसऱ्या महायुद्धात सिद्ध केली, जेव्हा तेथील आरोग्य कर्मचारी अनेक लाख आजारी आणि घायाळ सैनिकांना परत मोर्चावर पाठवण्यात यशस्वी झाले. आरोग्याच्या क्षेत्रात सोवियेत संघाने सगळ्यात मोठं आणि महत्वाचं काम केलं ते गरिबी आणि बेरोजगारी मुळापासून संपवण्याचं. खरंतर अनेक आजारांचं मूळ कारण गरिबी आणि बेरोजगारी असते, त्यामुळेच आरोग्यासंबंधी इतर अनेक प्रश्न तयार होतात. सोव्हिएत संघात सगळ्यांना रोजगार देण्यात आला, मोफत शिक्षण, चिकित्सा, आवास इत्यादी सुविधा दिल्या गेल्या, जनतेला सन्मान, निश्चिंततेचं, सुख-समृद्धीचं जीवन देण्यात आलं, त्यामुळे सोव्हिएत संघात आरोग्य क्षेत्रात वरील प्रमाणे चमत्कारिक बदल घडवणे आणि प्रचंड यशाला गवसणी घालणे शक्य झाले. भांडवली देशांमध्ये श्रम करणाऱ्या जनतेला जाणून बुजून गरिब ठेवण्यात येते, कित्येक प्रकारचे कर लावून त्यांना लुटल्या जाते, त्यामुळे तेथे गरिबीमुळे उत्पन्न होणारे आजार जनतेला त्रस्त करून सोडतात. गरिब उपचार-प्रतिबंध यांच्या अभावी मरतो कारण चांगला उपचार खूप महाग असतो जो फक्त श्रीमंतच खरेदी करू शकतात. सोवियत संघात ह्याच्या उलट सगळ्यांना रोजगार, नि:शुल्क शिक्षण आणि स्वास्थ्य सुविधा देऊन लोकांची अनेक भूक व कुपोषणजन्य आजारांपासून सुटका करण्यात आली. तुम्ही ह्याची तुलना आजच्या भारतासोबत करा. मागच्या 70 वर्षात जवाहरलाल नेहरू पासून नरेंद्र मोदी पर्यंत सर्वांच्या नेतृत्त्वातील भारतीय भांडवलशाही जनतेला मूलभूत आरोग्य सेवा-सुविधा देण्यात पूर्णतः अयशस्वी आणि निकामी सिद्ध झाली आहे.

**अनुवाद: निखिल एकडे**

# पाच राज्यातील विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपची हार

पान 5 वरून

भारतामध्ये संसदीय डाव्यांनी हिंदुत्ववादी कट्टरपंथ विरोधी संघर्षाला मात्र निवडणुकीतील हार-जीत किंवा काही परंपरागत प्रतिकात्मक विरोधाचा मुद्दा बनवले आहे आणि आता तृणमूल स्तरावर कष्टकऱ्यांना सोबत घेऊन फॅसिस्ट कॅडरचा प्रभावी विरोध तयार करण्याची क्षमता ते गमावून बसले आहेत. क्रांतिकारी डाव्यांच्या विस्कळीत शक्तींकडे पाहिले तर त्यांच्या विचारधारात्मक कमजोरींमुळे आणि फार काळापासून तुटातुटी-व्यवधानाच्या कारणाने सध्या तरी त्या प्रभावी हस्तक्षेपाच्या स्थितीमध्ये नाहीत. अशा परिस्थितीमध्ये फॅसिझम विरोधी नव्या लामबंदीची सुरवात एकदम नव्या पद्धतीने सुरू करण्याचे कठीण आव्हान आपल्यासमोर आहे. भांडवलाच्या शक्तींनी राज्यसत्तेच्या यंत्रणेद्वारे आपले वर्चस्व स्थापित करण्यासोबतच वर्गयुद्धात आपल्या फॅसिस्ट लांडग्यांद्वारे समाजात अनेक रूपांमध्ये आपले खंदक खोदले आहेत आणि बंकर बनवले आहेत. यांच्या मुकाबल्यासाठी आपल्याला वैकल्पिक शिक्षण, प्रचार आणि संस्कृतीच्या आपल्या तंत्राद्वारे प्रति वर्चस्वासाठी संघर्ष करावा लागेल. कामगार वर्गाला राजकीय स्तरावर शिक्षित संघटित करावे लागेल आणि मध्यमवर्गाच्या रॅडिकल तत्त्वांना त्यांच्यासोबत उभे करावे लागेल. संघटित क्रांतिकारी कॅडर शक्तीच्या मदतीने आपल्यालासुद्धा आपले खंदक खोदून आणि बंकर बनवून, भांडवल आणि श्रमशक्तीमधील मोर्चा बांधून चालणाऱ्या दीर्घकालिक वर्गयुद्धामध्ये, भांडवलाच्या भाडोत्री गुंड फॅसिस्टांसोबत संघर्ष करावा लागेल. ही रणनीती राजकारणाच्या क्षेत्रांमध्येच नाही तर समाज आणि संस्कृतीच्या प्रत्येक मोर्च्यावर आपल्याला लागू करावी लागेल. मोदी सरकारच्या कारनाम्यांनी मोहभंगाच्या कारणाने देशांमध्ये कष्टकरी जनता आणि विद्यार्थी-युवक रस्त्यावर उतरून आपला विरोध व्यक्त करताहेत. संघपरिवाराद्वारे पसरवल्या जात असणाऱ्या या विषाविरुद्ध बुद्धिजीवी-लेखक-कलाकारांपासून सामान्य नागरिक सुद्धा सतत आवाज उठवत आहेत. या विरोधात सुद्धा विद्यार्थी-युवक समोरच्या फळीमध्ये आहेत. नरेंद्र मोदीचा पाखंडी मुखवटा छिन्नविछीन्न झाला आहे. देशातच नाही विदेशातही त्याची थू-थू होत आहे आणि देशांमध्ये संघ परिवाराद्वारे पसरविण्यात येणाऱ्या घृणेच्या वातावरणाची तीव्र टीका होत आहे. परंतु फक्त या कारणांनीच धर्मवादी फॅसिझम आपल्या खुराड्यापर्यंत मर्यादीत राहणार नाही.

**भांडवली पक्षांमधून कुठल्याही नवीन सरकारचे बनणे कष्टकरी जनतेसाठी सापनाथाच्या जागी नागनाथाला खुर्चीवर बसवणे सिद्ध होईल.** दरोडेखोरांच्या यांच्या एका टोळीच्या जागी दुसऱ्या टोळीचे दरोडेखोर त्यांना लुटतील. देशी-विदेशी भांडवलदारांची लूट न केवळ चालू राहील तर ती अजून जास्त वाढत जाईल. उदारीकरण खाजगीकरणाचे धोरण ना तर सरकारच्या षडयंत्राचा परिणाम आहे ना जगभरातील भांडवलदारांची सनक. हे जागतिक भांडवलशाहीच्या विकासाच्या आंतरिक तर्काने उत्पन्न झालेले धोरण आहे. बाजार आणि नफ्याच्या व्यवस्थेच्या गतिकीच्या नियमाने ते संचालित होत आहे. सध्याच्या भांडवली संरचनेमध्ये याला कुठलाही पर्याय नाही. या धोरणांना फक्त एकाच परिस्थितीमध्ये उलटल्या जाऊ शकते. तात्कालिक भांडवली रचनेला नेस्तनाबूद करुन. बाजार आणि नफ्यावर टिकलेल्या संपूर्ण भांडवलशाही व्यवस्थेला नेस्तनाबूद करून. कामगारांना याच रस्त्यावर समोर जाण्याची तयारी करावी लागेल.

ह्याच्या तयारीमध्ये क्रांतिकारी शक्तींना भांडवली निवडणुकांच्या मंचाचा सुद्धा यथासंभव वापर करावा लागेल. हे सत्य आहे की भांडवली निवडणुकांद्वारे व्यापक कष्टकरी जनतेला बेरोजगारी, महागाई, भ्रष्टाचार आणि गरिबी पासून स्वातंत्र्य मिळू शकत नाही. हे त्या क्रांतीद्वारेच संभव आहे जिची गोष्ट शहीद भगतसिंगाने केली होती आणि त्या क्रांतीच्या परिणामी संपूर्ण उत्पादन, राज्यकारभार आणि समाजाच्या संरचनेवर खऱ्या अर्थाने कामगार कष्टकऱ्यांचा हक्क असेल. परंतु हे सत्य आहे की प्रस्थापित व्यवस्थेच्या मर्यादांना उघड करणे, तिच्या जनविरोधी चरित्राचा भांडाफोड करणे आणि कायदे संमत अधिकारांना सुद्धा एका मर्यादेपर्यंत प्राप्त करण्यासाठी कामगार,कष्टकऱ्यांच्या स्वतंत्र राजकीय पक्षाला निवडणुकीमध्ये उतरवणे गरजेचे आहे. भांडवली व्यवस्थेमध्ये होणाऱ्या निवडणुकांना बघावं तर देशामध्ये जवळपास 75 टक्के औद्योगिक आणि शेतमजूर तथा गरीब शेतकऱ्यांचे संसदीय व्यवस्थेमध्ये कुठलेच प्रतिनिधित्व नाही. मागील सत्तर वर्षांमध्ये आपण पाहिले आहे की काँग्रेस, भाजप, सपा, बसपा, आम आदमी पक्ष आणि नकली लाल झेंड्यावाले संसदीय डावे पक्ष वास्तवात वेगवेगळ्या भांडवलदार वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. कामगारवर्ग आणि सामान्य कष्टकरी जनतेजवळ कुठलाही पर्याय नसतो, त्यामुळे कधी या तर कधी त्या निवडणूकबाज भांडवली पक्षाला मत देण्यासाठी त्यांचा नाईलाज असतो. काँग्रेसच्या शासनाला लोक कंटाळतात आणि त्यांच्या धोरणाला शिक्षा देण्यासाठी भाजपला मत देतात आणि मग भाजपच्या भांडवल धार्जिण्या धोरणांना शिक्षा देण्यासाठी काँग्रेसला मत देतात. परंतु याने कामगार वर्गाच्या हितांवर फरक पडत नाही आणि त्यांना ते हक्क सुद्धा मिळू शकत नाहीत ज्यांचा वायदा भांडवली व्यवस्थेमध्ये केला जातो. किमान वेतन, रोजगाराचा अधिकार, सर्वांना समान शिक्षणाचा अधिकार व पिण्याच्या पाण्याचा हक्क आणि आपले अन्य लोकशाही व नागरिक अधिकार, हे हक्क मिळणे तर दूर देशाच्या विशाल कष्टकरी जनतेच्या जीवनाचे हे मूलभूत प्रश्न राजकीय मुद्दे सुद्धा बनू शकत नाही. याचे हे महत्त्वाचे कारण आहे की समाजाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये कामगार वर्गाच्या स्वतंत्र राजकीय पक्षाची उपस्थितीच नाहीये.

**'कामगार बिगुल' ची वेबसाइट**
**www.marathi.mazdoorbigul.net**
**फेसबुक पेज**
**www.facebook.com/kamgarbigul**

# बुलंदशहर मधील हिंसा, कोणाचे षडयंत्र?

पान 1 वरून

27 लोकांचे नाव घेतले आहे. नंतर 5 डिसेंबर रोजी बजरंग दलाचे संयोजक व इन्स्पेक्टर सुबोध कुमारच्या हत्येमधील मुख्य आरोपी योगेश राजचा एक व्हिडिओ समोर आला. व्हिडिओ मध्ये योगेश राज स्वत:ला निर्दोष सांगत आहे आणि म्हणत आहे की घटनेच्या वेळी तो स्याना येथील ठाण्यामध्ये एफ. आय. आर. नोंदवायला गेला होता. जागरण वृत्तपत्रानुसार स्याना ठाण्याच्या मुंशींनी सांगितले की योगेश राजने 12:43 ला एफ.आय.आर. नोंदवली होती ज्याची सीपीआई घेऊन तो 12:50 ला ठाण्यातून निघून गेला. जमाव आणि पोलिसांची झडप जवळपास 1 वाजता सुरू झाली आणि 1:35 वाजता इन्स्पेक्टर सुबोध कुमारांना गोळी मारली गेली. ही घटना जिथे घडली ते ठिकाण पोलिस ठाण्यापासून 11 किलोमीटर लांब आहे. 12:50 ते 1:35 च्या दरम्यान 45 मिनिटांच्या कालावधीमध्ये 11 किलोमीटर जाणे अवघड नाही. पोलिसांचे म्हणणे आहे की योगेश ठाण्यातून निघून सरळ घटनास्थळी पोहोचला आणि लोकांना भडकवायला लागला.

हा रिपोर्ट लिहिला जाई पर्यंत पोलिस योगेशला अटक करू शकले नव्हते (नंतर 2 जानेवारीला अटक झालेली आहे— अनुवादक). नवभारत टाईम्सच्या बातमीनुसार पोलिसांना त्यांच्या मोबाईलचे लोकेशन दिल्ली आणि तिच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये मिळाले आहेत. वर्तमानपत्राच्या न्यूज पोर्टलने लिहिले आहे की एका मोठ्या पोलिस अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की योगेश राज 6 डिसेंबर पर्यंत दिल्लीतील एका हिंदू संघटनेच्या नेत्याच्या घरामध्ये आश्रय घेऊन होता. प्रश्न हा आहे की जर पोलिसांना त्याचे लोकेशन माहित होते तर अटक का केली जात नव्हती? पोलिसांवर "वरून" दबाव होता काय?

**दुसरीकडे सुमित आणि सुबोध कुमारच्या शवांचे पोस्टमार्टेम झाले तर आणखी आश्चर्यचकीत करणारे तथ्य समोर आले. त्यांच्या पोस्टमार्टेम नुसार दोघांनाही .32 बोअरच्या पिस्तुलाने गोळी मारली गेली होती. प्रश्न असा निर्माण होतो की दोघांनाही एकाच हत्याराने एकाच व्यक्तीने तर गोळी मारली नाही ना?**

घटनेचा आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे. ज्यामध्ये दिसतेय की शेतामध्ये उभ्या असलेल्या एका पोलिसाला पाहून संतप्त जमाव दगडफेक करत ... मारा-माराचा आवाज देत आहे. लक्षात घेण्यासारखी गोष्ट अशी आहे की इन्स्पेक्टर सुबोध हेच दादरीमधील अखलाख हत्याकांडाचे तपास अधिकारी होते. अखलाखला सुद्धा गोहत्येच्या अफवेने पेटलेल्या जमावाद्वारे मारले गेले होते. आताच सुबोध कुमारचा एक जुना व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये ते म्हणताहेत की अखलाख हत्याकांडाच्या तपासाला प्रभावित करण्यासाठी त्यांच्यावर सातत्याने दबाव टाकला जात होता. उघड आहे की ते बुलंदशहर मधील घटनेच्या अगोदरपासूनच कट्टरपंथी हिंदू संघटनांच्या निशाण्यावर होते.

जागरण वृत्तपत्राने लिहिले आहे की गुप्तहेर खात्याच्या रिपोर्टमध्ये समोर आले आहे की सहा तरुण घटनास्थळापासून तब्बल 500 मीटर लांब बसलेले होते. या सर्व तरुणांचे चेहरे झाकेलेले होते जेणेकरून त्यांना कोणी ओळखू नये. त्यामुळे रिपोर्ट मध्ये या युवकांची नावे लिहिलेली नाहीत. अंदाज आहे की हे सहा युवक संपूर्ण घटनाक्रमाचे सुत्रधार असू शकतात. त्यांचा शोध सुरू आहे. हे तरूण कोण होते आणि कोणत्या उद्दिष्टाने तेथे बसले होते हा गंभीर प्रश्न आहे.

घटना ज्या ठिकाणी घडली ती जागा चिरगांवठी गावाच्या पोलिस ठाण्याजवळ आहे. नवभारत टाईम्सच्या बातमीनुसार गावातील प्राथमिक आणि ज्युनियर माध्यमिक शाळेमध्ये तीन डिसेंबरला 150 हून अधिक विद्यार्थ्यांना वेळेच्या आधीच सकाळी सव्वा अकरा वाजताच मध्यान्ह भोजन दिले गेले होते. शाळेत मध्यान्ह भोजन वाटप करणाऱ्या राजपाल सिंह यांनी सांगितले की त्यांना भोजन लवकर वाटायचे आणि मुलांना घरी पाठवायचे आदेश मिळाले होते. याशिवाय शिक्षकांना सुद्धा लवकर घरी निघून जाण्यास सांगण्यात आले होते. आदेशाचे कारण सांगण्यात आले की त्या दिवशी परिस्थिती खराब होऊ शकते.

बीबीसी हिंदीने लिहिले आहे की "गावाच्या अगदी शेजारी जर रात्री डझनभर पशूंची हत्या झाली असेलही, तरी दोन मोठ्या प्रश्नांचे उत्तर कोणाकडेच नाही. पहिला हा की डझनभर पशूंना मारण्यासाठी किती लोक पोहोचले होते आणि कुठून आले होते? नंतर ते गायब कसे झाले? दुसरा हा की डझनभर जनावरांना मारते वेळी जो गोंगाट माजतो, त्याला रात्रीच्या शांततेमध्ये कोणीही गाववाल्याने का नाही ऐकले? या सर्व गोष्टी आहेत ज्या गहन प्रश्न उभे करतात.

एवढी मोठी घटना घडल्यानंतर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी पोलिस अधिकाऱ्याच्या हत्येची कसून चौकशी करण्याऐवजी पोलिसांना गोहत्येचा तपास लावण्याचे आदेश दिले. जर गोहत्या झाली तर त्याची जबाबदारी पोलिस आणि प्रशासनाची राहील. मुख्यमंत्र्यांनी गोहत्येची जबाबदारी तर निश्चित केली परंतु गायीच्या नावाने झालेल्या माणसांच्या हत्येची जबाबदारी कुणाची राहील? योगीने लवकरात लवकर गो हत्याऱ्यांना पकडण्याचे आदेश दिले आणि माणसांच्या हत्येला अतिशय निर्लज्जपणे 'दुर्घटना' घोषित केले.

याच दरम्यान पोलिसांनी हिंसेच्या खटल्यामध्ये एकूण 27 जणांचे नाव घेतले आहे. ज्यापैकी 4 जणांना अटक झाली आहे. गुन्हा दाखल असलेल्यांपैकी मुख्य आरोपी योगेश राज हा बजरंग दलाचा जिल्हा संयोजक आहे. बजरंग दलाचा दंगली भडकावण्याचा इतिहास जुना आहे. काही वर्षांपूर्वी ऑस्ट्रेलियन मिशनरी ग्राहम स्टेन्स आणि त्याच्या दोन मुलांना जिवंत जाळण्यामध्ये सुद्धा याच संघटनेचा कार्यकर्ता दारासिंहला शिक्षा झाली होती. गुजरात दंगल असो वा मुझफ्फर नगर दंगल, प्रत्येक ठिकाणी आर.एस.एस.च्या या संघटनेचे नाव पुढे येत राहिले आहे. दोन वर्षांपूर्वी बातमी आली होती की हे संघटन उत्तर प्रदेशच्या विविध शहरांमध्ये 'आत्मरक्षा शिबिर' नावाने दहशतवादी प्रशिक्षण केंद्र चालवत आहे. या केंद्रांमध्ये म्हणायला तर आत्मरक्षा शिकवण्याची गोष्ट केली जाते पण प्रत्यक्षात इथे अल्पसंख्यांकांविरोधात राग पसरवला जातो आणि त्याला तापवत त्यांच्या हत्यांसाठी शस्त्रांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

उघड आहे की हे सर्व अचानक नाही झालेले. याची तयारी खूप काळापासून सुरू होती. पण खोटारडेपणाचा तर आर.एस.एस. आणि त्याच्या सहकारी संघटनांनी कारखानाच उघडला आहे. **हिटलरचा प्रचार मंत्री गोबेल्स याने म्हटले होते की जर एखादं खोटं शंभर वेळा मांडलं तर ते सत्य बनते. आर.एस.एस. सहीत जगातील सर्व फॅसिस्ट संघटना याच मुलमंत्रावर चालतात आणि आर.एस.एस.ला तर यामध्ये विशेष हातखंडा प्राप्त आहे. आर.एस.एस.ची स्थापना 1925 मध्ये झाली होती. त्या वेळी, जेव्हा संपूर्ण देश इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळवण्याची लढाई लढत होता, आर.एस.एस.ने इंग्रजांशी सहयोगाची निती अवलंबली होती. इंग्रज देशामध्ये हिंदू-मुसलमानांना आपापसात लढवत राज्य करत होते, त्यांची सेवा करताना आर.एस.एस.ने हे तंत्र चांगल्या पद्धतीने शिकून घेतले. गोरक्षा समित्या सुद्धा या संघटनेने त्याच वेळी बनवायला सुरू केल्या होत्या आणि तेव्हापासूनच मुसलमान यांच्या निशाण्यावर राहिले आहेत. गोबेल्सच्या पावलांवर चालत शंभर नाही तर कोट्यवधी वेळा ही गोष्ट सांगितली आहे की मुसलमानांपासून देशाला धोका आहे, ते विदेशी आहेत. त्यांना देशातून हाकलून दिले पाहिजे, मारून टाकले पाहिजे. तसेच हे मुसलमान जाणूनबुजून गोमांस खातात कारण हिंदूंना चिडवता यावे. परंतु जे विदेशी म्हणजे इंग्रज प्रत्यक्षात गोमांस खात होते, देशाला गुलाम बनवून बसले होते त्यांचे पाय मात्र आर.एस.एस. चाटत होते.** आता काही वर्षांपासून म्हणजे बाबरी मशिद पाडल्या पासून त्यांनी आपल्या शक्तिमध्ये सातत्याने वाढ केली आहे आणि याच दरम्यान त्यांच्या खोट्या प्रचारामध्ये सातत्याने वाढ होत आली आहे. आता सर्वच ठिकाणी सातत्याने दंगली आणि धार्मिक हिंसा घडण्याच्या बातम्या येत राहिल्या आहेत. गुजरात दंगलींच्या अगोदर सुद्धा हे लोक अशा घाणेरड्या घटना घडवत राहिले आहेत परंतु त्यानंतर तर जणू अशा घटनांचा पूरच आला आहे. कधी दंगली, कधी विरोधकांची दिवसा-ढवळ्या सुनियोजित हत्या, तर कधी गायीच्या नावाने, तर कधी लव्ह जिहादच्या नावाने, तर कधी मंदिर-मशिदीच्या नावाने मॉब लिंचिंग!

"अच्छे दिनाचा" वायदा करून सत्तेत आलेल्या मोदी सरकारने मागील साडे चार वर्षांमध्ये "अच्छे दिन" आणण्याचं काम फक्त भांडवलदारांसाठी केले आहे. निवडणुकीतील आपल्या वायद्यांची थट्टा उडवत मोदी कधी बेरोजगारांना भजी तळण्याचा सल्ला देतात तर कधी नोटबंदी सारखी संकटं निर्माण करत आहेत. आता निवडणुका जवळ आहेत तर सांप्रदायिक तणाव सातत्याने वाढवला जात आहे आणि याचे कारण सुद्धा स्पष्ट आहे. संपूर्ण जगासह भारत सुद्धा आर्थिक अरिष्टाच्या घेऱ्यात आहे. भांडवली व्यवस्थेला यातून बाहेर येण्याचा कोणताच मार्ग सापडत नाहीये. वास्तवात होते असे की भांडवलशाहीमध्ये सर्व संपत्ती मूठभर लोकांच्या ताब्यात येते आणि बहुसंख्यांक कष्टकरी, कामगार, शेतकरी आणि कनिष्ठ मध्यमवर्ग सातत्याने दळला जात असतो. जेव्हा भांडवली संकट येते तेव्हा परिस्थिती अजूनच खालावत जाते. मोठ्या प्रमाणावर कामगार कपात केली जाते, बेरोजगारी वाढते, छोटे उद्योग बंद होऊ लागतात. भुकबळी, बेरोजगारीने त्रस्त असलेल्या जनतेमध्ये असंतोष वाढत जातो आणि याच वेळी एखादी योग्य क्रांतिकारी शक्ती नेतृत्व देण्यासाठी असेल तर क्रांती होण्याची शक्यता सुद्धा वाढू लागते. अशात भांडवलदार वर्गाकडे एकच पर्याय उरतो. तो असतो फॅसिझमला शरण जाण्याचा. फॅसिझम ही एक प्रतिक्रियावादी सामाजिक चळवळ असते जी आपला आधार समाजाच्या सर्वच स्तरांवर मजबूत बनवते. अधिकांशत: मध्यम वर्गावर आणि शक्य तेवढ्या कामगार वर्गावर सुद्धा. ही जनतेचं लक्ष्य मुख्य प्रश्नांवरून हटवण्यासाठी एका काल्पनिक शत्रूला निर्माण करते. जर्मनीमध्ये हिटलरच्या पक्षाने यहूदींना शत्रू म्हटले होते. भारतामध्ये आर्.एस.एस. मुस्लिम आणि इतर अल्पसंख्यांकांना शत्रू म्हणते. फॅसिझम खोटा प्रचार करतो की कथित शत्रूच समस्यांचे मूळ कारण आहेत आणि खऱ्या समस्या सुद्धा भुकबळी, निरक्षरता, महागाई, आणि बेरोजगारी नाहीत तर लव्ह जिहाद, गोहत्या, आणि मंदिर-मशिद आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी तो 'फायनल सोल्युशन' देतो की या कथित शत्रूंना मारून टाकले पाहिजे. याच खोट्या गोष्टींचा कोट्यवधी वेळा प्रचार करून त्याला सत्य बनवण्याचा प्रयत्न केला जातो. फॅसिझम जुन्या काळाच्या महानतेचा गौरव करतो, आपल्या धर्म आणि कुळाला सर्वश्रेष्ठ म्हणतो. देश-धर्म धोक्यात असल्याचे सांगतो, युद्ध आणि सेनेचं गुणगान करतो, उथळ प्रकारच्या देशभक्तीचा प्रचार करतो. यामुळे लोकांना वाटते की अहा, हाच तर स्वर्ग आहे ! जेव्हाकी वास्तवात हा घृणीत नरक असतो. लोकांच लक्ष विचलित करून आणि आपापसात भांडायला लावून फॅसिझम आपल्या भांडवली मालकांना दोन्ही हातांनी जनतेचे श्रम आणि देशाच्या संसाधनांच्या लुटीची खुली सूट देतो.

मोदी सरकार आणि संघ परिवार खरेतर हेच करत आहेत. परंतु आपल्याला फॅसिस्टांच्या या घाणेरड्या षडयंत्राला बळी न पडता त्यांचं बिंग फोडलं पाहिजे. शहिद-ए-आजम भगतसिंहानं म्हटलं होतं की "लोकांना आपापसात भांडण्यापासून रोखण्यासाठी वर्गीय जाणीवेची गरज आहे. गरीब, कष्टकरी, व शेतकऱ्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे की तुमचे खरे शत्रू भांडवलदार आहेत, म्हणून तुम्ही त्यांच्या हातचलाखीपासून जपून राहिले पाहिजे आणि त्यांना बळी पडून काही केले नाही पाहिजे. जगातील सर्व गरिबांचे, भलेही ते कोणत्याही जाती, धर्म, रंग वा राष्ट्राचे असोत - अधिकार एकच आहेत. तुमचे हित यातच आहे की तुम्ही धर्म, रंग, वंश आणि राष्ट्रीयता व देशांचे भेदभाव संपवून एकजूट व्हा आणि शासनाची सत्ता आपल्या हाती घेण्याचा प्रयत्न करा. या प्रयत्नांमुळे तुमचं काहीच नुकसान होणार नाही. याने एखाद्या दिवशी तुमच्या बेड्या तुटतील आणि तुम्हाला आर्थिक स्वातंत्र्य मिळेल."

हीच गोष्ट लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. ***प्रत्येक जात व धर्माशी संबंधित देशातील कष्टकरी जनतेने त्यांच्या भूलथापांना बळी न पडता, त्यांचे इरादे निकामी केले पाहिजेत आणि त्यांना सडेतोड उत्तर देत आपली एकजूट कायम ठेवली पाहिजे.***

**अनुवाद: प्रवीण सोनवणे**

**"एक सच्चा व्यक्ती रस्ता तिथे शोधत नाही जिथे सुख आणि सुविधा असतात तर तिथे शोधतो जिथे त्याचे कर्तव्य त्याला बोलावत असते. असा मनुष्य खऱ्या अर्थाने एक असली मनुष्य असतो कारण त्याचे आजचे स्वप्न उद्या वास्तव बनेल; कारण अशा व्यक्तीने इतिहासातील उलथापुलथींचा अभ्यास केलेला असतो आणि त्याला माहित असते की कशाप्रकारे जुन्या सभ्यता आणि राजमुकूट संघर्षांच्या ज्वाळेत जळून राख झालेत, वर्षानुवर्षे चालत आलेल्या रक्त आणि खूनांनी भरलेल्या संघर्षांचा विनाअपवाद एकच अर्थ आहे की भविष्य त्यांचे आहे जे आपल्या कर्तव्यात अग्रसर आहेत."**

**✍ कुबा चे महान क्रान्तिकारी जोस मार्ती**

**बिगुल व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअ‍ॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअ‍ॅप चॅनेल जॉईन करावा -**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**

# तुमच्या समाजाचा ऱ्हास

✍ राहुल सांकृत्यायन

मनुष्य सामाजिक प्राणी आहे. मानव आणि प्राण्यांमध्ये अंतर एवढेच की मानव आपल्या हित आणि अहितासाठी अधिकत: आपल्या समाजावर अवलंबून असतो. खरेतर प्राणीजगताचे मोठ-मोठे शक्तीशाली शत्रू असताना तसेच वेळोवेळी येणाऱ्या हिमयुगासारख्या महाभयंकर नैसर्गिक संकटांपासून बचावात त्याच्या मेंदूने जे सहाय्य दिले आहे, त्यामध्ये मानवाचे समाजाच्या स्वरूपातील संघटन अतिशय सहाय्यक ठरले आहे. समाजाने सर्वात अगोदर दुबळ्या माणसांच्या शक्तींना शेकडो माणसांच्या ऐक्याद्वारे खुप वाढविले. तेव्हाच त्याने, आपल्या नैसर्गिक आणि इतर शत्रूंपासून रक्षण मिळवत असताना, आपल्यातूनच अशा शत्रूंना ज्न्म दिला की ज्यांनी त्या नैसर्गिक आणि पाशविक पशूंपेक्षाही जास्त, मनुष्य-जीवनाला नरकासमान बनवण्याचे काम केले आहे.

समाजाचे पहिले कर्तव्य आहे समुहातील व्यक्तींच्या बाबतीत न्याय करणे. **न्यायाचा अर्थ हा असला पाहिजे की प्रत्येक व्यक्ती आपल्या कष्टाच्या फळाचा उपभोग घेऊ शकेल. परंतु आम्ही याच्या उलट पाहत आहोत.**

धन ते आहे जे माणसाच्या जीवनासाठी अत्यंत गरजेचे आहे. अन्न, वस्त्र, निवारा या त्याच वस्तू आहेत ज्यांना धन म्हटले पाहिजे. वास्तविक धनाचे उत्पादक तेच आहेत जे या वस्तूंना निर्मितात. शेतकरी खरा धनाचा निर्माणकर्ता आहे. तो मृदेला गहू, तांदूळ, कापसाच्या रुपात परिवर्तित करतो. दोन तास रात्र शिल्लक असतानाच तो शेतावर पोहोचतो, ज्येष्ठाची रणरणती दुपार असो अथवा माघ-पौषाची हाडं गोठवणारी थंडी, तो नांगर जुंपतो, ढेकळं फोडतो, त्याचे अंग घामाने निथळून निघते, त्याच्या एका-एका हाताला सात सात घट्टे पडतात, फावडे चालविता-चालविता त्याला दम लागतो, परंतु तेव्हासुद्धा तो तशाच प्रकारे मशागत करत राहतो. कारण त्याला माहित आहे की धरणी आईच्या इथे लाच चालत नाही. ती स्तुती प्रार्थनेच्या द्वारे आपले हृद्य खोलू शकत नाही. ही मूल्यरहीत माती सोन्याचे गहू, रूप्याचे तांदुळ आणि द्राक्षांच्या मोत्यांच्या रूपामध्ये तेव्हाच परिवर्तित होते जेव्हा ती पाहते की शेतकऱ्याने तिच्यासाठी आपल्या रक्ताचे किती घडे खर्चले, किती वेळा त्याचं अंग मोडून निघाले आणि कुदळ हातातून अनायासे गळून पडली.

गहू आपोआप एका जागी दहा-वीस मण ठेवलेला मिळत नाही. तो पंधरा-पंधरा वीस-वीस दाण्यांच्या रूपात आणि तो सुद्धा वेगवेगळ्या ओंब्यांमध्ये संपूर्ण शेतामध्ये विखुरलेला असतो. शेतकरी त्याला गोळा करतो, ओंब्यांपासून वेगळं करतो. दहा-दहा, वीस-वीस मणाच्या ढिगांना एका ठिकाणी पाहिल्यावर एकदा त्याचे मन पुलकित होऊन उठते. महिन्यांच्या भुकेने अर्धमेली त्याची मुलं अधाशी डोळ्यांनी त्या राशींना पाहतात. ते समजतात की दु:खाची अंधारी रात्र सरणार आहे आणि सुखाची सकाळ समोर येत आहे. त्यांना काय माहित की त्यांची ही राशी, जिला त्यांच्या माता-पित्याने एवढ्या कष्टाने निर्माण केले, त्यांच्या खाण्यासाठी नाहीये. हे खाण्याचे अधिकारी सर्वात अगोदर ते स्त्री-पुरुष आहेत ज्यांच्या हातांना एक सुद्धा घट्टा नाहीये, ज्यांचे हात गुलाबासारखे लाल आणि लोण्यासारखे मऊ आहेत. ज्यांची ज्येष्ठाची दुपार खसच्या ताट्यांमध्ये, विजेचे पंखे किंवा शिमला आणि नैनिताल मध्ये जाते. हिवाळा त्यांच्यासाठी थंडीचा त्रास घेऊन येत नाही, तर मऊ चादरी आणि महागड्या ओव्हरकोटांनी संपूर्ण शरिराला झाकलेल्या या लोकांसाठी आनंदाचे सर्व मार्ग उघडतो. आळशी आणि रिकामटेकडी ही मोठी माणसं —जमीनदार, सावकार, मील-मालक, मोठ-मोठ्या पगारावाले नोकर, पंडित आणि दुसऱ्या सर्व प्रकारचे परजीवी —शेतकऱ्यांच्या कष्टाच्या या कमाईच्या जेवणावर सर्वांच्या अगोदर हक्क बजावतात.

**कामगार भोंगा वाजताच डोळे चोळत-चोळत कारखान्यांकडे धावतात. अलिकडील काही दिवसांअगोदर पर्यंत तर कामाच्या तासांवर कोणतेच निर्बंध नव्हते आणि आतासुद्धा जास्त कामगार असलेल्या कारखान्यांवरच हे नियम लागू आहेत.** तिथे तीन आणे, चार आणे रोजावर तो खपतो आहे. याच तीन-चार आण्यांमध्ये त्याला बायको, तीन-चार मुलं आणि म्हाताऱ्या आई वडिलांची सुद्धा काळजी वाहायची आहे. एक दिवस सुद्धा निश्चिंत होत पोट-भर खाणे त्याच्यासाठी हराम आहे आणि याही पलीकडे जर तो आजारी पडला तर त्याला नोकरीला मुकावे लागते. जर म्हातारा किंवा अपंग झाला तर त्याला आणि त्याच्या मुलाबाळांना आकाशाखाली भीक देणारे सुद्धा कोणीच नाही. हेच नाही, कालपर्यंत कारखाना चोवीस तास चालत होता, आज मालकाकडे बातमी येते की वस्तूंचे भाव पडले, आता त्यांना मुद्दलाच्या भावातसुद्धा कोणीच विकत घेणारा नाहीये; तेव्हा कारखान्याला टाळे लावले जाते. कामगार, त्याची मुलं-बाळं, दाण्या-दाण्यासाठी हुंदके देऊन रडू लागतात. जेव्हा त्याला काम मिळत होते आणि रोजंदारी मिळत होती तेव्हासुद्धा त्याचे जीवन नरकापेक्षा वेगळे नव्हते आणि बेकारी तर जिवंतपणीच मरण आहे. अशा हाल अपेष्टांना सहन करत कामगार तयार करतो भारीतील भारी कपडे, साखर, मिठाई आणि हजारो तऱ्हेची सुख-चैनीची साधनं. तो आपल्या हातांनी उभारतो मोठ मोठे महाल, बंगले, बगीचे, भारी रस्ते. परंतु त्याला स्वत:ला काय मिळते? त्याचं झोपडं कदाचित पावसात शाबूत रहात असावं. त्याच्या शरीराला झाकण्यासाठी चिंधड्या सुद्धा मिळत नाहीत. त्याने स्वत:च बनविलेल्या कितीतरी वस्तू त्याला स्वप्नवत वाटतात आणि कामगारांच्या हाडा-घामाने आणि चिंतेने तयार झालेल्या बनलेल्या या वस्तूंचा उपभोग कोण घेतो? त्याच्या रक्ताच्या चिखलातून उभ्या राहिलेल्या गगनचुंबी वास्तूमध्ये कोण वास्तव्य करतो? तेच मोठ-मोठे परजीवी— जमीनदार, सावकार, कारखान्यांचे मालक, मोठमोठ्या पगारांवाले नोकर, पुरोहित.



शेतकरी आणि कामगार यांच्यासाठी आपले तारुण्य धुळीस मिळवितात, झोपेचा त्याग करतात, आपल्या स्वत:च्या आरोग्याचा सत्यानाश करतात, पण तो त्यांना भुके-नागडे ठेवून समाधानी होत नाही, तर पदोपदी त्यांना अपमानित करणे आपलं कर्तव्य समजतो. शेतकरी आणि कामगार गरीब का आहेत? कारण त्यांनी आपली कमाई कुटुंब आणि मुला-बाळांना उपाशी ठेवून त्या परजीवींना हसत हसत दिली आहे. त्यांच्याच रक्ताने मोठी झालेली ही पोटं गरिबांनाच नावं ठेवतात. त्यांच्या भाषेमध्ये गरिबांसाठी वेगळे शब्द आहेत. 'तुम्ही'ची तर बातच काय 'तू' सुद्धा त्यांच्यासाठी वापरलेले जाऊ शकत नाही. "अबे", "ए" असेच त्यांना संबोधित केले जाते. घाणेरड्यातील घाणेरड्या शिव्यांना त्यांच्यासाठी वापरणे श्रीमंतीचा अभिमान, शान आहे. त्यांच्यामुळेच गरिबीची शिकार असलेला कामगार आणि शेतकरी त्यांच्यासमोर खाटेवर बसू शकत नाही; खडाव, चप्पला घालू शकत नाही, छत्री घेऊ शकत नाही. खेड्यातील शेतकऱ्यांची अब्रू आणि मालमत्ता जमीनदारांच्या हातात आहे. तो त्याला जसे पाहिजे तसे नाक रगडायला लावतो.

ही तर झाली वास्तविक खऱ्याखुऱ्या धनाच्या उत्पादकांची अवस्था आणि परजीवी? कामगार शेतकऱ्यांची कमाई त्यांच्यासाठी अर्पित आहे. ते हा विचार करण्याची पर्वा करत नाहीत, तमा बाळगत नाहीत की त्यांचा लाखोंचा कर आणि नफा कशाप्रकारे मिळविला गेलाय. काय हा विचार करण्याचे ते कष्ट घेतात का, की या एक-एक रुपयाला जमा करण्यासाठी शेतकऱ्याने किती वेळा आपल्या मुलांना उपाशी ठेवले? किती आयांनी स्वत:ला नागडे ठेवले? किती रोग्यांनी आजार आणि औषधे न मिळाल्याने स्वत:चे प्राण गमावले? जर त्यांना असा विचार असता तर कधीच दोन हजाराच्या फोर्ड कारच्या जागी तीस हजाराची रोल्स रॉईस खरेदी करणे पसंत केले नसते. महिन्याकाठी हजार-हजार रुपये मोटारीच्या तेलात फुंकले नसते. हाकिमांच्या मेजवान्या आणि विलासितेच्या जलशांमध्ये लाखोंचा चुराडा केला नसता.

हा सर्व अन्याय असून सुद्धा कुणाला काही फरक पडत नाही. समाजाचे पंच म्हणतात की, श्रीमंत-गरीब पूर्वीपासून सातत्याने चालत आले आहेत, जर सर्वांना समान केलं तर कोणालाच काम करणं आवडणार नाही; दुनियेला चालवण्यासाठी श्रीमंत-गरीब राहणं आवश्यक आहे. समाजाच्या बेड्या तुरुंगाच्या बेड्यांपेक्षाही मजबूत आहेत. त्यांना सामान्य डोळ्यांनी पाहता येऊ शकत नाही. परंतु जिथे समाज कायद्याच्या विरुद्ध—जरी तो कायदा अगदी अन्यायावर आधारित का असेल ना—काही गोष्ट, घटना घडली की समाज हात धुवून मागे पडतो. विहिरीत पाणी आहे, काठावर पोहरा दोरी ठेवलेली आहे, एकीकडे मंदिराच्या अंगणात भक्तिभावाने डोलत-डोलत लोक रामायण वाचताहेत- 'जाति-पाँति पूछे नहिं कोई। हरि के भजै सो हरि के होई।" गीता वाचली जात आहे – "विद्या विनय-सम्पन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि। शुनि चैव श्वपाके च पण्डिता समदर्शिनः॥' (विद्या आणि शील संपन्न, ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा आणि चांडाळ सर्वांमध्ये पंडित माणसे समदर्शी असतात.) महात्मा आणि पंडित लोक भावूक होऊन अर्थ सांगत आहेत—"जे काही आहे ती सर्व ईश्वराची देणगी आहे, सियाराम मय सद जग जानी! करहु प्रणाम जोरी जूग पाणी! चराचर विश्व सर्व ईश्वराचे रुप आहे, जे आहे त्यामध्ये काही भेद नाही." असे वाटते की चहू दिशेने समदर्शिता, विश्व-बंधुत्व आणि प्रेमाचा महासमुद्र उसळ्या मारतोय. त्याचवेळेला ज्येष्ठाच्या दुपारी तहानेने व्याकुळ झालेला चांभार येतो, त्याचे पाऊल विहिरीच्या दिशेने पडते, भक्तांपैकी कोणीतरी त्याची जात ओळखतो, महात्मा आणि भक्तीरसात डबडबलेल्या सर्व श्रोत्यांचा पारा चढतो, डोळे लाल होतात आणि सर्वजण जणू काही कच्चा खाऊन टाकण्यासाठी त्या निरपराध व्यक्तीकडे धाव घेतात. त्याचा अपराध काय? विहिरीतून पाणी पिणे गुन्हा आहे काय? समदर्शिता आणि विश्वबंधुत्वाच्या वायुमंडळात विहिरीतून पाणी काढून पिणे महापाप आहे? आणि ही मंडळी काहीच मिनिटे अगोदर जो राग आळवीत होती त्यानुसार काय असे करणे योग्य होते? त्या व्यक्तींपैकी एका-एकाला वेगवेगळं विचारा— "तुमच्या वचनात आणि कर्मात, बोलण्यात आणि वागण्यात एवढं अंतर का?" हिंडून-फिरून तुम्ही याच मतावर पोहचाल कि समाज त्यांच्याकडून तसेच करवून घेऊ इच्छितो.

एका वरच्या उच्च जातीतील आई-वडीलांची एक छोटीशी मुलगी आहे. समाजाने दबाव टाकला आहे की तिचा विवाह आठ दहा वर्षाच्या वयापर्यंत व्हावा. अकराव्या वर्षी ती मुलगी विधवा होते. मग तोच समाज म्हणतो कि आता तिचा विवाह होऊ शकत नाही. आता तिला आजन्म ब्रह्मचारी राहावे लागेल आणि आपल्या इंद्रियावर संयम ठेवावा लागेल. कसले ब्रह्मचर्य आणि इंद्रिय संयम? ज्याचे पालन करण्यात विश्वमित्र आणि पराशर, शृंग आणि व्यासासारखे मोठ-मोठे ऋषी बिलकुल असमर्थ ठरले? आज सुद्धा त्याच विधवा मुलींचा पन्नास वर्षाचा म्हातारा बाप हा एका स्त्रीच्या निधनानंतर दुसरीशी विवाह करायला तयार आहे. त्याच्या पंचवीस वर्षाच्या भावाच्या पत्नीला मरून महिन्यापेक्षा जास्त दिवस नाहीत परंतु दुसऱ्या लग्नाची बोलणी पक्की होत आहेत. तर मग काय समाजाची अक्कल मेली आहे? काय त्याच्या डोळ्यावर पडदा पडलाय? काय त्यांना माहित नाही की या अबोल बालिकेकडून आयुष्यभर ब्रह्मचर्य

पान 2 वर

### लेखकाचा परिचय

*राहुल सांकृत्यायन खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरुद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरुंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.*

*जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.*

*राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."*

*राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं गतिरोध. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.*

*समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरुद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरुद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रुढी-परंपरांच्या विरुद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.*

# रिझर्व बँक व सरकार : आपापसातील तणावाचे कारण काय?

पान 12 वरून

देतील, त्यांना लगेच अनुत्पादक घोषित नाही केले तर एकूण कर्जाची संख्या वाढेल, अनुत्पादक कर्जाचे प्रमाण घटेल, बँका वरवर निरोगी दिसू लागतील. सरकार दावा करू शकेल की त्यांनी अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर काढले.

उद्योग सुद्धा नवीन रोकड मिळाल्याने काही काळ सुदृढ दिसू लागतील, कर्जाच्या वसूलीचा दबाव घटल्यामुळे अतिरिक्त फायदाही होईल. नोटबंदी/जीएसटी नंतर बेचैन असलेले संघ परिवार समर्थक तुटपुंजे भांडवलदार निवडणुकीच्या वेळी खुश आणि उपकाराखाली दबलेले असतील.

**पण नवीन कर्ज देण्याने उद्योगांची समस्या दूर होईला का?**

काही दिवस अगोदरच विविध बाजार विश्लेषकांच्या विश्लेषणातून हे समोर आले होते की खरी समस्या औद्योगिक नफ्याचा दर कमी होणे आहे, कारण भांडवलाची गुंतवणूक ज्या मोठ्या प्रमाणात झाली आहे, उत्पादनाचा स्तर त्या प्रमाणात वाढू शकला नाही आणि सरासरी प्रति युनिट भांडवलावर नफा सतत खाली जात आहे. मॉर्गन स्टॅनली आणि सीएलएसए नुसार निफ्टी/सेंसेक्स मधील कंपन्यांचे एकूण भांडवलावर उत्पन्न म्हणजेच प्रति युनिट नफ्याचा दर घसरत आहे. या वर्षी हा गेल्या वर्षाच्या तुलनेत 5.5% ने अजून कमी होईल, जी 11 तिमाह्यांमध्ये सर्वात मोठी घट आहे. एक अजून विश्लेषक संस्था एमके ग्लोबल नुसार नफ्याचा दर गेल्या दहा वर्षांमध्ये कमी होत आहे—सर्वात मोठ्या कंपन्यांसाठी हा दर 25% वरून निम्मा होऊन 12.5% वर आला आहे, पण इतर कंपन्यांसाठी तर हा दर बिनधोक गुंतवणूकीपेक्षा म्हणजे बँकेत जमा होणाऱ्या उत्पन्नापेक्षाही कमी झाला आहे, जसे लघु-मध्यम उद्योगांसाठी तर हा दर फक्त 5-6% वर पोहोचला आहे. याचा अर्थ असा की हा चक्रीय प्रश्न नसून संरचनागत प्रश्न आहे.

**पण बँक कर्जावरचे व्याज तर भांडवलदार उत्पादनातून प्राप्त नफ्यातूनच चुकवतो. हे व्याज आता जवळपास 9-10% आहे. उद्योगांमध्ये लागलेल्या भांडवलाचा जवळपास 80% भाग हा बँक, इत्यादी भांडवलदारांकडूनच येतो. मग एकूण भांडवलावर उत्पादनापासून लाभ जवळपास 5-6% असेल तर 80% वित्तीय भांडवलावर 9-10% दराने कसे व्याज चुकवता येईल?** हेच औद्योगिक-वित्तीय संकटाचे मूळ आहे ज्याचे शिकार काही मक्तेदार भांडवलदार सोडले तर बाकी सगळे आहेत. 2-3 वर्षे अगोदरपर्यंत अमेरिकन-युरोपियन-जपानी केंद्रीय बँकांच्या अथाह रोखीच्या प्रवाहाने जागतिक ठोक बाजारात व्याजाचे दर जवळपास शून्यावर पोहोचवले होते, तेव्हा भारतीय भांडवलदारांनी मोठ्या प्रमाणात विदेशी चलनामध्ये स्वस्तात कर्ज घेऊन संकट टाळले होते, पण आता तिथेही व्याज दर वाढत आहेत, सोबतच डॉलरही महाग होत आहे; दोघांच्या संयुक्त प्रभावामुळे आता त्या कर्जाची गुंतवणूक सुद्धा 8-10% वर पोहोचत आहे.

त्यामुळे सरकार बँकांच्या तिजोरीचे तोंड उघडून त्यात जी रोख टाकेल आणि वसूलीमध्ये सूट देईल, तो तात्कालिक दिलासाच असेल कारण वसूली अनिश्चित काळापर्यंत तर टाळणे शक्य नाही. पण उत्पादनाच्या विस्ताराची शक्यता कुठे आहे? खरेदीदार कुठे आहेत? नफा वाढेल कसा? श्रमिकांना अजून कमी मजूरी देऊन, कमी कामगारांकडूनच जास्त उत्पादन करवून नफ्याला किती वाढवले जाऊ शकते, जेव्हाकी मजूरी अगोदरच फार कमी आहे, आणि अगोदरच कामगारांचे रक्त बेहिशोब शोषले गेले आहे?

नफा वाढणार नाही, भांडवल अजून वाढेल, तर नफ्याचा दर अजून खालीच जाणार, कर्ज चुकवले जाणार नाहीत, उद्योग आणि बँका दिवाळखोर होतील, याला काही काळ टाळले जाऊ शकते, अनिश्चितपणे नाही.


या संघर्षाची अजून एक बाजू ही आहे की भांडवली आर्थिक सिद्धांतकारांच्या एका मोठ्या कंपूनुसार बाजाराच्या स्पर्धेत जे भांडवलदार कमजोर पडतील, पुरेसे भांडवल गोळा करू शकणार नाहीत, त्यांना बुडू देणेच योग्य आहे. भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये सरकारने बाजाराच्या प्रक्रियेत लक्ष दिले नाही पाहिजे. सरकारचे काम कराच्या पैशातून भांडवलदार वर्गाच्या सत्तेचे नियमन करणे आणि तिला कायम ठेवणे आहे. सरकारने कराच्या रकमेला इतर कोणत्याही कामी वापरले नाही पाहिजे—ना जनकल्याणाच्या कामांमध्ये, ना कोण्या भांडवलदाराच्या बचावात. कमजोर भांडवलदारांना बाजूला करतच भांडवलशाही जास्त काळ मजबूत राहिल. मौद्रिक अर्थ शास्त्रज्ञ (राजन, पटेल, आचार्य, इत्यादी सगळे याच समुहात आहेत) विशेषत: असे म्हणत आलेत की सरकार आर्थिक तोट्यामध्ये नसले पाहिजे. आचार्य पेक्षाही जास्त जोरात ही गोष्ट दुसरे डेप्युटी गव्हर्नर विश्वनाथन यांनी म्हटली की कर्जदारांना वाचवणे रिझर्व बँकेचे काम नाही. मग रघुराम राजन सुद्धा त्यांच्या बचावात मैदानात उतरले आणि म्हटले की इथे रोखीचा नाही तर दिवाळखोर होण्याचा प्रश्न आहे, त्यामुळे याचे उत्तर रिझर्व बँकेची तिजोरी खोलून नाही, तर भांडवलदारांद्वारे अजून भांडवल गुंतवल्याने होईल जे त्यांनी बाजारातून गोळा केले पाहिजे किंवा जर सरकार मदत करु इच्छिते तर टॅक्स लावून पैसा गोळा करावा. पण एक दुसरा कंपू सुद्धा आहे. विसाव्या शतकात वाढत्या भांडवली संकटाच्या आणि कामगारवर्गीय क्रांत्यांच्या सुरुवातीनंतर जॉन मेनार्ड कीन्स, इत्यादी भांडवली अर्थशास्त्रज्ञ नवीन विचार घेऊन आले. कीन्सचे प्रसिद्ध वक्तव्य आहे - 'दूरच्या काळात तर आपण सर्वच मरून जाऊ.' म्हणजेच काही मोठ्या भांडवलदारांना बुडू दिले तर भांडवलशाहीची संपूर्ण इमारतच कोसळून पडेल. यामुळेच भांडवली सरकारांचे कर्तव्य आहे की कुठूनही रक्कम गोळा करून तोट्याचे बजेट म्हणजेच कर्ज घेऊन सुद्धा भांडवलदारांच्या बचावामध्ये पावले उचलावीत. खरेतर तिसरा रस्ता अवलंबला जातो.जेव्हा प्रश्न जनतेसाठी शिक्षण, आरोग्य, घरासारख्या सुविधांवर खर्चाचा असतो तेव्हा संपूर्ण भांडवलदार वर्ग एक मुखाने मौद्रिक धोरणांचा समर्थक बनतो—गरिब मजूर, शेतकऱ्यांना खिरापत-सबसिडी, रेशन का, त्यामुळे ते कामचोर बनतात, जसे काही दिवस अगोदर मद्रास हायकोर्टाने सुद्धा म्हटले! सगळे खाजगी करा, जो विकत घेऊ शकतो, तो घेईल. पण जेव्हा एखाद्या भांडवलदारावर संकट येते तेव्हा अर्थव्यवस्थेला वाचवण्याच्या नावाने नव-नवे कर लाऊन भांडवली सरकार त्यांच्या बचावाची तरतूद करतात. या धोरणावर सरकार आणि रिझर्व बँक या दोघांमध्येही सिद्धांताच्या स्तरावर एकमत आहे. या तात्विक सहमतीनंतरही आता डोकेफोडेची गरज काय? कारण आहे की सरकार आता या सहमतीला तोडत आहे; पेट्रोल डिझेलपासून जीएसटी पर्यंतचे सर्व प्रकारचे कर लावणे आणि कर वसूलीमध्ये वाढीच्या सगळ्या दाव्यांनंतर सरकार भांडवलदारांच्या मदतीलायक रकमेची तरतूद करू शकत नाहीये; ओएनजीसी, एलआयसी सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना तर अगोदरच दुहून झाले आहे. आता रिझर्व बँकेच्या भांडवलावर म्हणजे नोट छापण्याच्या तिच्या क्षमतेचा वापर करू पाहत आहे. ही स्थिती भारतातच नाहिये. काही दिवस अगोदर ट्रंप सुद्धा फेडरल रिझर्वच्या पावेल यांच्यावर राग काढून चुकले आहेत, तिकडे इंग्लंडमध्ये थेरेसा मे या बँक ऑफ इंग्लंडवर भडकल्या आहेत. का?

**मार्क्स ने खूप अगोदरच सांगितले होते की सगळे भांडवली अर्थशास्त्रज्ञ संकटाचे निदान चलन, रोख, कर्जाच्या क्षेत्रात शोधतात, पण संकटाचे कारण हे नाही. खरे संकट तर उत्पादनाच्या क्षेत्रात आहे; अति उत्पादन आणि नफ्याच्या घसरत्या दराची वृत्ती—चलन, रोख, कर्जाचे संकट निर्माण करते. मूळ संकटाचे निदान भांडवलशाहीमध्ये शक्य नाही. त्यामुळे कोणत्या तरी तात्कालिक उपायाच्या शोधात आपापसात ही तणातणी चालू आहे.**

अनुवाद: अभिजित

**"माझ्यासाठी ही कल्पना करणे सुद्धा अवघड आहे की एक बेरोजगार, भुकेला माणूस कुठल्या प्रकारे 'व्यक्तिगत स्वातंत्र्याचा' आनंद उपभोगू शकतो. वास्तविक पाहता स्वातंत्र्य केवळ तेच असू शकते जिथे एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीचे शोषण आणि उत्पीडन नसेल; जिथे बेरोजगारी नसेल, आणि व्यक्तीला स्वतःचा रोजगार, स्वतःचे घर आणि दररोजची भाकरी हिसकावून घेतली जाण्याची भीती नसेल. केवळ अशाच समाजात, कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात व्यक्तिगत आणि अन्य कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य अस्तित्वात येऊ शकते."**

**विश्व सर्वहाराचे महान नेता जोसेफ स्तालिन (१८ डिसेंबर १८७८ – ५ मार्च १९५३)**



# भारतीय इतिहास काँग्रेस 2018 रद्द : कारण ते घाबरतात इतिहासाला!

✍ राखी

**'अभ्यास व्यर्थ आहे तुमचा**
**आणि विज्ञान वांझ,**
**असेच करत राहिलात अभ्यास**
**न करता समर्पित**
**आपले ज्ञान**
**संपूर्ण मानवतेला'**

बर्टोल्ट ब्रेख्तच्या या ओळी वाचताना आणि आजच्या काळाकडे बघून असे वाटू लागले आहे की आपल्या भविष्याची स्थिती चिंताजनक आहे. ज्याप्रकारे आपल्या शिक्षण व्यवस्थेला पोकळ बनवले जात आहे, जिथे वैज्ञानिकता आणि तर्कनिष्ठतेला काहीच जागा नाही, जिथे प्रश्न विचारण्याच्या परंपरेलाच मारले जात आहे—ही स्थिती अनेक गंभीर परिणामांकडे इशारा करते. ही चिंता अजून वाढते जेव्हा सरकारं आपल्या इतिहासात आणि विज्ञानात हस्तक्षेप करून त्यांना शासक वर्गाचे सेवक बनवण्याच्या प्रयत्नात लागतात. विशेषत: भाजप शासनकाळात याचे सर्वात वाईट अनुभव मिळाले आहेत. मग गोष्ट अटल बिहारी वाजपेयींच्या शासन काळाची असो किंवा मग 2014 मध्ये आलेल्या मोदी सरकारची, **दोन्हीही काळात इतिहास आणि विज्ञानाची दुरवस्थाच बघायला मिळते. 2014 पासूनच आर.एस.एस. आणि भाजपचा इतिहासासोबत छेडखानी करण्याचा आणि त्याला बदलण्याचा पूर्ण प्रयत्न होताना दिसतो ज्याचा आधार तर्कसंगत सत्य नसून फक्त कल्पना आहेत.** या संघी इतिहास लिखाणाचे उदाहरण आपल्याला व्हाट्सअप विद्यापीठामध्ये अनेकदा बघायला मिळते. उदाहरणार्थ आग्र्याचा ताजमहाल शहाजहानने न बनवता एका हिंदु राजाने बनवला होता आणि जे अगोदर तेजोमहालय नावाचे मंदिर होते, ज्याला नंतर शहाजहानने ताब्यात घेऊन ताजमहाल बनवले; दुसरे प्लास्टिक सर्जरी सारखे तंत्रज्ञान वैदिक काळापासूनच भारतात होते ज्याचा आधार वेदांमध्ये आहे, जिथे हत्तीच्या डोक्याला गणपतीच्या धडावर शिवाने लावले होते; आपल्याकडे वैदिक काळापासूनच विमान बनवण्याचे तंत्रज्ञान होते ज्याला युरोपियन लोकांनी चोरले, इत्यादी. अशा अनेक 'ज्ञानवर्धक' गोष्टी व्हाट्सअप विद्यापीठामध्ये लिहिल्या आणि पसरवल्या जातात आणि लोकांपर्यंत असा दुष्प्रचार करत त्यांच्यामध्ये धर्मवादाचे बीज रोवण्याचे काम करतात. हे फक्त व्हाट्सअप विद्यापीठापर्यंतच मर्यादित नाही, तर अशाप्रकारच्या काल्पनिक इतिहासाला बुद्धिजीवी आणि पुस्तकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात हे सरकारही मागे नाही जेणेकरून अशी जनता आणि युवक तयार व्हावेत जे तर्कपूर्ण प्रश्न विचारू शकणार नाहीत, जे त्यांच्या 'फोडा आणि राज्य करा'च्या राजकारणाचे एक हत्यार बनतील. आपण 2015 साली झालेल्या विज्ञान परिषदेला कसे विसरू शकतो जिथे विज्ञानाला थट्टेचा विषय बनवण्यात आले आणि वैदिक काळातच विमान बनवण्याचे विज्ञान असल्याचा शोधप्रबंध वाचण्यात आला. राजस्थानातील ती पुस्तके आज प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचली आहेत जी बलात्कारी बाबा आसारामला महान संत म्हणतात, ज्यांच्यामध्ये कट्टर हिंदुत्ववादी नेते आणि इंग्रजांना अनेकदा माफीनामा लिहिणारे, इंग्रजांना सहाय्य करणारे सावरकर यांना स्वतंत्र्याच्या लढाईच्या मुख्य नेत्याच्या रुपात दाखवले गेले आहे, ज्यांच्यामध्ये हल्दीघाटीच्या लढाईत राणा प्रताप यांना विजयी घोषित करण्यात आले आहे. अशा अनेक उदाहरणांवरुन हे स्पष्ट आहे की हे संघी हाफचड्डीवाले इतिहास आणि विज्ञानाला किती घाबरतात आणि इंग्रजांची दलाली करणे, क्रांतिकारकांची हेरगिरी करणे, दंगली पसरवण्याच्या आपल्या काळ्या इतिहासाला बदलून आपल्या त्या कारनाम्यांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न करत राहतात. याच अजेंड्याला धरून भाजप सरकार अशा शोध परिषदांवर कब्जा करू पाहत आहे, ज्या स्वतंत्र रुपात इतिहास आणि विज्ञानाचा शोध करतात. भारतीय इतिहास काँग्रेस आत्तापर्यंत या हल्ल्यांपासून वाचली होती आणि गेल्या महासंमेलनामध्ये तर भारतीय इतिहास काँग्रेसने इतिहासाच्या मिथ्याकरणाच्या विरोधात एक प्रस्ताव सुद्धा पास केला होता. आता ही इतिहास काँग्रेसच सरकारच्या हस्तक्षेपाची शिकार होताना दिसून येत आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये आयोजित होणाऱ्या इतिहास काँग्रेसच्या आयोजनाला पहिले स्थगित आणि नंतर रद्द करण्याच्या मामल्याला याच प्रकाशात पाहिले पाहिजे. भारतीय इतिहास काँग्रेस (आईएचसी) 2018ला तिच्या नियोजित तारखेच्या 15-20 दिवस अगोदर रद्द करण्यात आले. कारणे हे दिले गेले की विद्यापीठाकडे निधी नाहिये. नंतर असाही तर्क ऐकण्यात आला की तिथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ

पान 7 वर

# रिझर्व बँक व सरकार : आपापसातील तणावाचे कारण काय?

## अर्थव्यवस्थेची बिघडत जाणारी अवस्था: भारताची भांडवली अर्थव्यवस्था अति-उत्पादन आणि नफ्याच्या घटत्या दराच्या गर्तेत फसली आहे.

✍ **मुकेश असीम**

शेवटी 10 डिसेंबर रोजी रिझर्व बँकेचे गव्हर्नर उर्जित पटेल यांचा राजीनामा दिला. 11 डिसेंबर रोजी सरकारने अर्थ मंत्रालयाचे माजी सचिव आणि नोटबंदीमध्ये प्रमुख भुमिका निभावणारे शक्तिकांत दास यांना गर्व्हर्नर नियुक्त केले. यामुळे सरकार आणि रिझर्व बँक यांच्यामध्ये अर्थव्यवस्थेच्या संकटावरून चाललेल्या तणावाचा एकमात्र उपाय झाला, जो सध्याच्या व्यवस्थेत शक्य होता. हा मुद्दा चर्चेत तेव्हा आला होता जेव्हा, 25 ऑक्टोबर रोजी, रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर विरल आचार्य यांनी एका भाषणात म्हटले होते की **केंद्रिय बँकेच्या स्वायतत्तेचा सन्मान न करणारी सरकारं कधीना कधी बाजाराच्या रागाची शिकार होतात, अर्थव्यवस्थेला आग लावतात आणि एका महत्वाच्या आर्थिक संस्थेला कमजोर केल्यामुळे त्यांना एक दिवस पश्चाताप करणे भाग पडते.** याच्या उत्तरात अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सुद्धा रिझर्व बँकेवर तीव्र हल्ला चढवला आणि तिच्यावर मुक्तहस्ते कर्ज वाटून बरबाद होत असलेल्या बँकिंग व्यवस्थेकडे डोळेझाक करण्याचा आरोप लावला. हे सुद्धा समोर आले की अर्थ मंत्रालयाने तीन पत्रे लिहून रिझर्व बँक कायद्याच्या कलम 7 नुसार रिझर्व बँकेला आदेश देण्याच्या आपल्या अधिकाराच्या धमकीचा वापरही केला होता. यातूनच बातम्या येऊ लागल्या की सरकार उर्जित पटेल यांना काढून टाकू शकते किंवा ते स्वत:च राजीनामा देऊ शकतात. लक्षात घ्यावे की आत्तापर्यंत कोणत्याही सरकारने या अधिकाराचा वापर केला नव्हता. स्पष्ट आहे की याअगोदर भांडवली अर्थव्यवस्थेचे अंतर्विरोध इतके सघन आणि तीव्र झालेले नव्हते की सत्तेच्या विविध अंगांमधील तणाव या हद्दीपर्यंत वाढेल.

**नवीन गव्हर्नरच्या नियुक्तीच्या लगेच नंतर आलेली वक्तव्ये या वादाच्या कारणाबद्दल बरेच संकेत देतात. उद्योगपतींची प्रमुख संस्था कन्फेडेरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (सी.आय.आय.) ने नवीन गव्हर्नरच्या नियुक्तीला 'उद्योगांच्या मनोबळात मोठी वृद्धी' असे सांगत विश्वास व्यक्त केला आहे की ते 'अर्थव्यवस्थेमध्ये रोखीच्या कमतरतेला दूर करण्यासाठी लगेच पावले उचलतील.' इतर अनेक विश्लेषकांचे म्हणणे आहे की ते बँकांसाठी नियमांना ढील देतील तसेच भांडवली गुंतवणूक कमी करण्यासाठी व कॅशचा प्रवाह वाढवण्यासाठी व्याज दर कमी करतील.** तरीही भांडवली व्यवस्थेच्या दोन अंगांमधील हा संघर्ष इतका तीव्र का झाला यासाठी आपल्याला यातील काही महत्वपूर्ण मुद्यांना समजणे गरजेचे आहे. ***ही गोष्ट तर आता भांडवली मीडियासाठी छापणे अशक्य झाली आहे की भारतातील भांडवली अर्थव्यवस्था अति-उत्पादन आणि नफ्याच्या घसरत्या दराच्या भोवऱ्यात खोलवर फसली आहे. याचाच परिणाम आहे की वित्तीय़ बाजारातच परतावा आणि कर्जासाठी रोख पैशाचे संकट नाही, तर खुद्द सरकारची आर्थिक स्थितीच संकटात आहे.*** एकीकडे कष्टकरी जनता आणि मध्यमवर्गावर करांचा बोजा वाढत गेल्याने भांडवलदारांकडून टॅक्स वसूलीमध्ये कमतरता, दुसरीकडे अनुत्पादक प्रशासकीय खर्च, फौज-हत्यारांवर खर्च आणि भांडवलदारांना विविध प्रकारची सूट वाढवल्यामुळे संपूर्ण वर्षात बजेटमध्ये जितक्या वित्तीय तोट्याचा (6.24 लाख कोटी रुपये) अंदाज होता, त्यापेक्षा जास्त आता वर्षाच्या पहिल्या 7 महिन्यातच 104% तोटा (6.48 लाख कोटी) झाला आहे. कारण हे की एकीकडे निवडणूक खर्च तर वाढलेलाच आहे, पण टॅक्स वसूली अंदाजापेक्षा बरीच कमी आहे. टॅक्स उत्पन्न 7 महिन्यांमध्ये वार्षिक उत्पन्नाच्या फक्त 44% आहे. सार्वजनिक संपत्तीच्या विक्रीमुळे करबाह्य उत्पन्न अंदाजाच्या 52% झाले आहे, नाहीतर अवस्था अजून वाईट असती. स्थिती ही आहे की ऑक्टोबर 2018 मध्ये सरकारी उत्पन्न ऑक्टोबर 2017 पेक्षाही कमी आहे. मीडिया मध्ये अशाही बातम्या आल्या आहेत की उत्पन्न-कर आणि जीएसटीचा रिफंड (परतावा) सुद्धा थांबवून ठेवला आहे जेणेकरून या वर्षी आर्थिक स्थिती सांभाळता यावी.

सर्वसाधारण निवडणुकांच्या अगोदर जेव्हा जास्त खर्चाची गरज पडणार आहे, तेव्हा सरकारची स्थिती ही आहे की शक्य त्या प्रत्येक जागेहून रकमेची तजवीज करण्यात घाम निघत आहे. ओएनजीसी, इत्यादी सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या-बँकांकडे जो राखीव साठा होता, त्याच्यावर अगोदरच कब्जा केला गेला आहे किंवा कॉर्पोरेट कर्जमाफी मध्ये ते चुकते झाले आहेत. आता रिझर्व बँकेचा नंबर आहे—तिच्याकडे जो राखीव साठा आहे त्याचा एक मोठा हिस्सा अंतरिम लाभांशाच्या रुपात देण्यासाठी सांगितले गेले आहे. स्थिती इथपर्यंत पोहोचली आहे की चुपचाप हुकूम बजावणारे उर्जित पटेल यांची हिंमत सुद्धा तुटली कारण त्यांचे भांडवली मुद्रेचे अर्थशास्त्र म्हणते आहे की यानंतर संकटाला थांबवण्यासाठी काहीच शिल्लक राहणार नाही. हा असंतोषच रिझर्व बँकेच्या आजी-माजी संचालकांच्या वक्तव्यांच्या रुपाने खुल्या रुपात समोर आला. इथपर्यंत की नवउदारवादी धोरणांचे समर्थक असलेल्या बुर्झ्वा अर्थतज्ञांचा एक हिस्सा सुद्धा संकटाचा आकार-प्रकार तसेच त्याच्याशी लढण्याच्या मोदी सरकारच्या नग्न लुटीच्या पद्धतीने आश्चर्यचकीत झाला आहे. हाच असंतोष रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर जनरल विरल आचार्य यांच्या 25 ऑक्टोबरच्या वक्तव्यातून समोर आला.

**पहिला मुद्दा तर जवळपास अडीच लाख कोटींच्या कर्जाच्या वीज प्रकल्पांचा आहे जे आपले बँक कर्ज परत करू शकत नाहियेत, पण या कर्जांना अजून बँकांनी औपचारिक पद्धतीने अनुत्पादक (एनपीए) घोषित केले नाहिये.** 12 फेब्रुवारीच्या रिझर्व बँकेच्या सर्क्युलर नुसार 6 महिने कर्ज वसुली नियमित न झाल्यास त्याला अनुत्पादक कर्ज घोषित करुन बँकांना त्याविरोधात दिवाळखोरी कायद्याच्या तरतुदींनुसार कारवाई करणे आवश्यक होते. पण सरकारची तशी इच्छा नाहिये. उलट अर्थ मंत्रालयाच्या निर्देशांनुसार खुद्द एस.बी.आय.ने सर्वोच्च न्यायालयात म्हटले आहे की या कर्जांचा एक हिस्सा (अदानी, टाटा, आणि एस्सारचे कर्ज यात सामील आहेत) माफ करायला ती तयार आहे.

**दुसरा मुद्दा, वाईट स्थितीने संकटात फसलेल्या 11 सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा आहे, ज्यांच्याकडे भांडवलाची मोठी कमतरता आहे, ज्यामुळे रिझर्व बँकेने त्यांना नवीन कर्ज देण्यावर बंदी घातली आहे.** या बंदीला हटवून बँकांद्वारे लघु उद्योग क्षेत्राला कर्ज देण्याची सरकारची इच्छा आहे. रिझर्व बँकेसमोर समस्या आहे की भांडवलदारांच्या लुटीनंतर सार्वजनिक बँकांची स्थिती अशी नाहीच की त्या जास्त कर्ज देऊ शकतील. पण नोटबंदी, जीएसटीच्या परिणामाने अर्थव्यवस्थेमध्ये एकाधिकार वाढल्यामुळे लहान-मध्यम उद्योगांवर जो गंभीर परिणाम झाला आहे त्यामुळे संघाच्या जुन्या विश्वासू तुटपुंज्या (मध्यमवर्गीय) वर्गामध्ये अस्वस्थता आहे. चलन योजनेच्या जुमल्याने त्यांना लुभावणे शक्य झाले नाही. निवडणुकीच्या ठीक अगोदर त्यांना खुश करण्यासाठी भाजप लहान-मध्यम उद्योजकांना बँक कर्जाच्या अटींमध्ये ढील देऊ पाहत आहे.

**तिसरा मुद्दा आहे की बँकांपासून ते गैर-बँक वित्तीय कंपन्यांपर्यंत संपूर्ण आर्थिक क्षेत्रात कर्ज आणि रोखीचे मोठे संकट चालूच आहे. त्याच्याशी लढण्यासाठी सरकार आणि रिझर्व बँक दोघेही लाखो कोटींची रोकड उपलब्ध करुन देत आहेत, पण संकट मात्र वाढतच चालले आहे.** संकटाच्या उपायांवर मोदी-जेटली यांचे कॉंग्रेस नियुक्त रघुराम राजनच नाही तर आपल्या नियुक्त आवडत्या पांगरिया, अरविंद सुब्रह्मण्यम नंतर आता उर्जित पटेल/विरल आचार्य सोबतही संघर्ष आणि हिरमुसणे झाले आहे, पण इलाज काही मिळत नाही. कारण भांडवलशाहीमध्ये संकटाचे कारण रोख, कर्ज, आणि मुद्रेची कमतरता नाही. ही तर संकटाची लक्षणं आणि परिणाम आहेत. संकटाचे कारण तर भांडवली उत्पादन पद्धतीत आहे जिथे प्रत्येक भांडवलदार अधिक नफ्यासाठी अचल किंवा स्थिर भांडवलामध्ये—मशिन/तंत्रज्ञान—अधिकाधिक गुंतवणूक करून कमी चल भांडवल किंवा श्रम शक्तीच्या प्रयोगातून अधिकाधिक उत्पादन करण्याचा प्रयत्न करतात. यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तीय क्षेत्राकडून कर्ज घेऊन भांडवल एकत्र केले जाते. पण वाढत्या अचल भांडवलावर नफा मिळवण्यासाठी विक्री सुद्धा त्याच प्रमाणात वाढली पाहिजे. पण सर्व भांडवलदारांनी असे केले तर सगळ्यांची विक्री वाढणे शक्य नाही कारण गरज असूनही क्रय क्षमतेच्या अभावाने लोक बाजारात पडलेल्या मालाला विकत घेऊ शकत नाहीत. हेच भांडवलशाहीचे अति उत्पादन आहे. ही स्थिती आज समोर आहे. मागच्या आर्थिक संकटाला टाळण्यासाठी सरकार आणि रिझर्व बँकेच्या प्रोत्साहनाने सार्वजनिक बँकांनी भांडवलदारांना उप्तादन क्षमता वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज दिले. या वाढलेल्या उत्पादन क्षमतेने बनवलेला माल बाजारात विकला गेला नाही—अनेक उद्योग जवळपास 70% क्षमतेवरच काम करू शकत आहेत, शेवटी नफ्याचा दर घटू लागला आणि ते कर्जाचे हप्ते चुकवण्यात असमर्थ झाले. हेच कर्ज आणि रोखीच्या संकटाचे मूळ कारण आहे, ज्याला फक्त रिझर्व बँकेने चलनप्रसार केल्याने सोडवले जाऊ शकत नाही. जेव्हा संकट उत्पादन व्यवस्थेत असेल तेव्हा कर्ज आणि चलनप्रसाराने त्याला काही काळ तर टाळले जाऊ शकते, पण सोडवले जाऊ शकत नाही. टाळण्याचे काम सुद्धा युपीएच्या काळात झाले, पण आता तर ते सुद्धा होत नाहीये. आता भांडवली व्यवस्थेत याचा एकच उपाय आहे—काही उद्योग दिवाळखोर होऊन बंद होणार, बेरोजगारी प्रचंड वाढणार.


मग यामध्ये रिझर्व बँकेच्या भांडवली कोषाचे प्रमाण आणि सार्वजनिक बँकांवर नियंत्रणाचे मुद्देही जोडले गेले. ही बातमी येऊ लागली की अर्थ मंत्रालयाच्या मतानुसार हा भांडवली कोष गरजेपेक्षा मोठा आहे आणि यामध्ये अजून पैसे टाकून रिझर्व बँक सरकारला दिल्या जाणाऱ्या लाभांशाला कमी करत आहे, त्यामुळे गरजेपेक्षा अधिक भांडवल कोष सरकारच्या खात्यात पाठवला गेला पाहिजे. मुद्दा चर्चेत आल्यावर आणि परिणामी अनेक विश्लेषकांनी सरकारच्या आर्थिक स्थितीच्या संकटावर प्रश्न उपस्थित केल्यावर, सरकारने अशा कोणत्याही मनसुब्याला नाकारणे चालू केले. वस्तुस्थिती ही आहे की वृद्धीच्या मोठमोठ्या दाव्यांनंतरही सरकारची टॅक्स वसूली वाढत नाहीये, जेव्हाकी निवडणुकीच्या वर्षात मोठमोठे खर्च समोर आहेत. त्यामुळे मोठ्या वित्तीय तुटीचा सामना करणारे सरकार, रिझर्व बँकेच्या तीन लाख कोटींपेक्षा मोठ्या राखीव भांडवलाच्या एका हिश्श्याला लाभांशाच्या रुपात मिळवण्यासाठी दबाव टाकत आहे, ज्याच्याशी रिझर्व बँक सहमत नाही कारण तिच्या मते येणाऱ्या संकटांशी लढण्यासाठी तिच्याकडे असलेला राखीव कोष समाप्त होईल.

19 नोव्हेंबरच्या बोर्डाच्या 9 तासांच्या दीर्घ बैठकीतच मोदी-जेटलींनी रिझर्व बँकेकडून अनेक सवलती मिळवल्या. रिझर्व बँकेच्या राखीव कोषाच्या मामल्यात एक संयुक्त समिती बनवली गेली आणि तोट्यातील बँकावर कडक नियंत्रण हटवणे व लघु-मध्यम उद्योगांना कर्जाच्या शर्तींमध्ये ढील देण्यावर रिझर्व बँकेने विचार करण्याचा भरवसा दिला. पण रोखीच्या कमतरतेशी लढणाऱ्या सरकारसाठी सर्वात मोठा दिलासा होता—बँकांच्या 9% भांडवल आवश्यकतेच्या 0.625% वाढीला 2020 पर्यंत टाळणे. आता नवीन भांडवल टाकल्याशिवाय—जे करण्याच्या स्थितीत सरकार नाहीये—बँका 3.7 लाख कोटींचे नवीन कर्ज देऊ शकतील. रिझर्व बँकेने हे सुद्धा मानले की लघु-मध्यम उद्योगांना कर्ज देण्याच्या अटींमध्ये ढील दिली जाईल आणि वसुली न झाल्यास 25 कोटींपर्यंतचे कर्ज लगेच अनुत्पादक (एनपीए) घोषित होऊ नये म्हणून उपाय केले जातील.

याचा परिणाम काय होईल? बँका नवीन कर्ज

पान 11 वर

**"नागरिक अवज्ञा आपली समस्या नाहीये. आपली समस्या आहे नागरिकांची आज्ञाधारकता. आपली समस्या आहे की जगभरात लोक नेत्यांच्या, हुकूमशहांच्या आदेशांचे पालन करत आलेत .. आणि या आज्ञाधारकतेमुळे कोट्यवधी लोक मारले गेले आहेत. ... आपली समस्या ही आहे की जगभरात गरिबी, भूकबळी, अज्ञान, युद्ध आणि क्रूरतेचा सामना करणारे लोक आज्ञाधारक बनून आहेत. आपली समस्या ही आहे की लोक आज्ञाधारक बनलेले आहेत जेव्हा तुरुंग सामान्य चोरांनी भरलले आहेत आणि मोठे चोर देश चालवत आहेत. ही आमची समस्या आहे"**



**हॉवर्ड झिन, प्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार आणि कार्यकर्ते (1922-2010)**

• संपादक मंडळ – सोमनाथ केंजळे, सत्यनारायण • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 204, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 9156323976, 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखला, मुंबई - 9820017588 कडून मुद्रित